Website : www.dainikmahasagar.in
Epaper : www.epaper.dainikmahasagar.in

मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

e-mail : nagpurpost@gmail.com ● mahasagarngp@gmail.com

संपर्क
संपादकीय : 9922970023; वितरण : 8888647753
जाहिरात : 7447735851 / 9326906062
नागपूर कार्यालय संपर्क : 7447735851
नागपूर मुख्य कार्यालय : कॉटन मार्केट, नागपूर – 440018

महासागर | NAGPUR POST
महासागर व NAGPUR POST ची जोडी, वाचतांना येईल वाचनाची गोडी
महासागर (मराठी) आणि NAGPUR POST (English)
घरपोच पाठविण्याची सुविधा.
महासागर किंमत Rs. 3
Nagpur Post Rs. 3 = 6
4 रुपयात

* वर्ष ५१ * अंक १९४ * * अकोला * | सोमवार, दिनांक ६ जानेवारी २०२५ | ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)

## युपी-बिहारमध्ये थंडीमुळे १० जणांचा मृत्यू

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. ५ :**
जम्मू-काश्मीर आणि हिमाचल प्रदेशात झालेल्या हिमवृष्टीमुळे संपूर्ण उत्तर भारतात थंडीचा प्रभाव वाढत आहे. गेल्या 24 तासांत उत्तर प्रदेशात 8 आणि बिहारमध्ये 2 जणांना थंडीमुळे जीव गमवावा लागला आहे.
देशातील 14 राज्यांमध्ये सलग दुसऱ्या दिवशी दाट धुके पाहायला मिळत आहे. दिल्लीत शनिवारी 9 तास शून्य दृश्यमानतेची नोंद झाली. 4 जानेवारीला दिल्लीत 800 हून अधिक उड्डाणांना उशीर झाला. रविवारी (5 जानेवारी) सकाळीही 160 उड्डाणे वेळापत्रकानुसार उडू शकली नाहीत. म्हणजेच 3 दिवसांत 900 हून अधिक उड्डाणे प्रभावित झाली. अनेक जिल्ह्यांमध्ये तापमान 2 ते 3 अंशांनी घसरण्याची शक्यता आहे.

अग्राग्रलेख
खरीखरी..

## दिल्लीचे त्रिकूट

अखेर दिल्ली विधानसभेची निवडणूक तोंडावर आली. आता हे स्पष्ट झालेले आहे की, दिल्ली विधानसभेच्या निवडणुकीत आम आदमी पक्ष, काँग्रेस आणि भाजप आपसात लढणार आहेत. थोडक्यात इंडिया आघाडीमध्ये बिघाडी सुरू झालेली आहे. गेल्या दोन-तीन निवडणुकांचा विचार केला. तर लोकसभेची निवडणूक सोडल्यास इंडिया आघाडीत परस्परांशी कोणत्याही प्रकारचे सामंजस्य नव्हते. हरियाणा आणि महाराष्ट्रात त्यामुळेच भारतीय जनता पक्षाला मस्तपैकी दणदणीत विजय मिळाला. त्यामुळेच इंडिया आघाडीतील काँग्रेससह सर्वच पक्षांना हात चोळत बघत बसावे लागले. महाराष्ट्रात तर जी परिस्थिती सध्या निर्माण झालेली आहे ती अभूतपूर्व आहे. या राज्यात विरोधी पक्ष कधीही एवढा कमजोर नव्हता. आता दररोज नव्या नव्या वावड्या उठत आहेत. त्यामध्ये दोन्ही राष्ट्रवादी पक्ष एकत्र होणार ही असो किंवा उद्धव ठाकरे पुन्हा भाजपशी घरोबा करणार ही असो. या दोन्ही वावड्यांमध्ये किती खरे आहे किती खोटे आहे, ते अजून बाहेर यायचे आहे. तरीही कुठे ना कुठे, काही ना काहीतरी शिजत आहे एवढे मात्र खरे आहे. सध्याच्या दिल्ली विधानसभेच्या निवडणुकीत काँग्रेसने ज्या पद्धतीने आम आदमी पक्षावर टीका केलेली आहे. त्यावरून काँग्रेसलाही आता इंडिया आघाडी कायम ठेवण्यास फारसा रस आहे असे दिसत नाही. ममता बॅनर्जी आधीच आपली वेगळी चूल मांडून बसलेल्या आहेत. अखिलेश यादव यांचे अजूनही तळ्यात-मळ्यात सुरूच आहे. अशा पद्धतीने जर निवडणूक लढण्यात आली. तर काहीही न करता भारतीय जनता पक्षाचे पारडे आपोआपच विजयाकडे झुकू लागलेले दिसते आहे. काल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ज्या कठोर शब्दात आपवर टीका केली. ती पाहता आम आदमी पक्षाला आता स्वबळावरच दिल्लीची निवडणूक लढवावी लागेल. इंडिया आघाडीतील घटक पक्ष या टीकेमुळे आपला दिल्लीत किती मदत करतील. त्यासोबतच या सवार्चा दिल्लीतील मतदानावर काय परिणाम होईल, याचाही विचार करणे गरजेचे आहे. आता तिन्ही पक्षांच्या तलवारी निवडणुकीच्या तोंडावर बाहेर निघालेल्या आहेत. अरविंद केजरीवाल यांनी तर आपले मुख्यमंत्री पद सोडून दिलेले आहे आणि ते प्रचारात उतरलेले आहेत. विजय मिळाला तरच आपण मुख्यमंत्रीपदी बसू, असा निर्धार करूनच आम आदमी पक्ष आपल्या अस्तित्वाची लढाई लढत आहे. गेल्या निवडणुकीत आम आदमी पक्षाला हरियाणा आणि महाराष्ट्र या दोन्ही राज्यांनी चांगला झटका दिला होता. आता हे सर्वांना ठाऊक आहे की, आम आदमी पक्षाला मिळणारी मते ही मुलतः काँग्रेसला मिळणारी मते होती. पण आता राहुल गांधी यांच्या झंझावातामुळे आणि प्रियांका गांधी यांच्या घणाघातामुळे काँग्रेस दिल्लीमध्ये पुन्हा आपली जुनी शक्ती परत मिळवू पाहत आहे. दिल्लीच्या मतदारांचा अजून तरी केजरीवाल यांच्या आप कडून भ्रमनिरास झालेला नाही. आम आदमी पक्षाने दिल्लीत मोफत वीज, मोफत पाणी, आणि शिक्षणाचे बाजारीकरण थांबवल्याने जनतेला आम आदमी पक्षाबद्दल अजूनही आशा वाटते. यामध्ये एक गोष्ट मात्र नक्की आहे. ती म्हणजे जर या निवडणुकीत काँग्रेस उठून उभी राहिली. तर त्याचा फटका आम आदमी पक्षाला बसू शकतो. ही गोष्ट आम आदमी पक्षाला ठाऊक नाही, असे अजिबात नाही. त्यांनीही तशीच जय्यत तयारी केलेली असेल आणि काहीतरी रणनीती आखलेली असेल. दिल्लीतील या त्रिकुटाच्या लढाईत काय होते, ते पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. त्यामुळेच आता पुढील महिन्यात होणा?या निवडणुकीत चांगलीच रंगत येईल, यात शंका नाही.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

## संतोष देशमुख हत्या प्रकरणी
# जनआक्रोश मोर्चा !

■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. ५ :**
सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणी विविध मागण्यासाठी पुणे शहरामध्ये सर्व पक्षीय मोर्चा काढण्यात आला.
या मोर्चामध्ये सर्वपक्षीय, सर्व जाती - धर्मीय नागरिक, राज्यभरातील प्रमुख नेते सहभागी झाले. संतोष देशमुख यांचे कुटुंबीय देखील सहभागी झाले होते.
मोर्चाला संबोधित करताना भाजपाचे आमदार सुरेश धस यांनी धनंजय मुंडे यांच्यावर जोरदार हल्ला चढवला. त्यांचा राजीनामा घ्याच, अशी मागणी देखील त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांच्याकडे केली आहे. टीका करणाऱ्यांना उत्तर देण्याची मला गरज वाटत नसल्याचे सुरेश धस म्हणाले.




मृत सरपंच संतोष देशमुख यांचे भाऊ धनंजय देशमुख यांनीही बेछूट आरोप केलेत. ही सर्व संघटित गुन्हेगारी आहे आणि यावर कायमचा ताळेबंदे लावून महाराष्ट्राला आदर्श दाखवायचा असेल तर मुख्यमंत्र्यांनी आम्हाला दिलेल्या आश्वासनाप्रमाणे आणि अधिवेशनात सांगितल्या प्रमाणे संतोष देशमुख यांना लवकरात लवकर न्याय द्यावा, अशी मागणी धनंजय देशमुख यांनी केली. या प्रकरणातील सर्व आरोपींचा सीडीआर बाहेर काढा. गुन्हेगारांचे कोणीही पाठराखण करणार नसल्याचे मुख्यमंत्र्यांनी दाखवून द्यावे, असे आवाहन देखील धनंजय देशमुख यांनी केले आहे.
माझ्या वडिलांवर जो अन्याय झाला त्या अन्यायाच्या विरोधात न्याय मिळवण्यासाठी सर्वजण एकत्र आले आहेत. आरोपींना कठोरात कठोर शिक्षा झालीच पाहिजे, अशी मागणी वैभवी देशमुख हिने केली.
माणुसकीला काळीमा फासणारी ही घटना असल्याचे सांगत गेले काही दिवस जनतेचा जनप्रक्षोप आपण रस्त्यावर पाहत आहोत, संतोष हत्या प्रकरणी आरोपींना कठोर शासन व्हायलाच हवे, आरोपी सुटू नयेत असे ज्योती मेटे म्हणाल्या.

## दोषींना कदापीही सोडणार नाही..
### सीएम फडणवीसांचा इशारा

■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. ५ :**



बीड प्रकरणात सरकार आणि पोलीस पूर्ण शक्तीने कारवाई करत आहेत. काहीही झाले तरी या प्रकरणात कोणी कोणाला वाचवण्याचा प्रयत्न केला तरी आम्ही कोणालाही वाचवू देणार नाही, असा स्पष्ट इशारा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिला. ते नागपूर येथे प्रसार माध्यमांसोबत बोलत होते. या प्रकरणात कोणालाही वाचवले जाणार नाही, असा या प्रकरणाच्या अनुषंगाने जे लोक दादागिरी आणि हफ्ते वसुली करतात, असा सगळ्यांवर आम्ही जरब बसवण्याचे ठरवले आहे. त्यामुळे, या संदर्भात योग्य कारवाई सुरु आहे, राजकारण न करता बीड नीट चौकशी करू द्यावी, सगळी चौकशी पूर्ण होवू द्यावी, असेही ते म्हणाले.
संतोष देशमुख प्रकरणाच्या हत्येच्या निषेधार्थ बीड, परभणी आणि पुण्यात मोर्चा निघाला आहे. तर अंजली दमानिया यांनी धनंजय मुंडे आणि पंकजा मुंडे यांचे कार्यकर्ते माझा छळ करत असल्याचा आरोप केला. याबाबत विचारले असता मोर्चे काढण्याचा सगळ्यांना अधिकार असल्याचे फडणवीस म्हणाले. अंजली दमानिया यांची काहीही तक्रार असेल तर त्यांनी ती पोलिसांकडे द्यावी, पोलीस यावर निश्चित कारवाई करतील, असेही त्यांनी स्पष्ट केले.
एकतर आरोपी कुठेही गेले असतील आणि त्यांना कोणीही मदत केली असेल तरी त्यांच्यावर कारवाई होत आहे. मदत करणाऱ्यांनाही आम्ही सोडत नाही. या प्रकरणाची नीट चौकशी करू द्यावी, सगळी चौकशी पूर्ण होवू द्यावी, आम्ही कुठल्याही दोषींना सोडणार नाही. याचा उपयोग कुठल्याही राजकारणाकरीता करू नये, असेही ते यावेळी म्हणाले.

## एचएमपीव्ही सामान्य व्हायरस
### केंद्र सरकारची स्पष्टोक्ती

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. ५ :**
चीनमध्ये कोविड-सदृश विषाणू ह्युमन मेटाप्न्युमोव्हायरस (एचएमपीव्ही) च्या वाढत्या प्रकरणांमध्ये भारत सरकारने शनिवारी संयुक्त देखरेख गटाची बैठक घेतली. बैठकीनंतर, सरकारी गटाने सांगितले की फ्लूचा हंगाम लक्षात घेता चीनची परिस्थिती असामान्य नाही.
श्वासोच्छवासाच्या आजारांच्या बाबतीत कोणत्याही वाढीला सामोरे जाण्यासाठी देश पूर्णपणे तयार आहे. या हंगामात फरश आणि ल्टढश हे सामान्य इन्फ्लूएंझा विषाणू आहेत, ज्यामुळे चीनमध्ये फ्लूचे प्रमाण वाढत आहे. सरकार परिस्थितीवर बारीक लक्ष ठेवून आहे. तसेच, हल्ड ला चीनमधील परिस्थितीबद्दल वेळोवेळी अपडेट देण्यास सांगितले आहे.
सरकारने म्हटले आहे की



आयसीएमआर आणि आयडीएसपी द्वारे इन्फ्लूएंझा सारखे आजार आणि इन्फ्लूएंझासाठी तीव्र तीव्र श्वसन आजारासाठी भारतात एक मजबूत पाळत ठेवणारी यंत्रणा आहे. दोन्ही एजन्सींच्या डेटावरून असे दिसून येते की क्छक आणि रअफक्क प्रकरणांमध्ये कोणतीही असामान्य वाढ झालेली नाही. नागरिकांनी घाबरून जावू नये, असेही सरकारने म्हटले आहे.

## कोयना धरण परिसराला भूकंपाचे धक्के

■ **वृत्तसंस्था, सातारा, दि. ५ :**
कोयना धरण परिसर रविवारी सकाळी ६ वा.५६ मिनिटांनी भूकंपाच्या सौम्य धक्क्यानं हादरला. या भूकंपाची तीव्रता २.४ रिश्टर स्केल एवढी नोंदली गेली आहे. नव्या वर्षात राज्यात झालेला हा पहिला भूकंप आहे.
भूकंपामुळे कोयना धरणाला कोणताही धोका पोहोचला नसल्याचा निर्वाळा धरण व्यवस्थापनाने दिला आहे.

## तटरक्षक दलाचे हेलिकॉप्टर कोसळले
### ३ ठार

■ **वृत्तसंस्था, पोरबंदर, दि. ५ :**
गुजरातमधील पोरबंदर येथे रविवारी दुपारी भारतीय तटरक्षक दलाचे हेलिकॉप्टर कोसळले.
या अपघातात ३ जणांचा मृत्यू झाला. एएनआय या वृत्तसंस्थेनुसार, तटरक्षक दलाचे हेलिकॉप्टर ध्रुव नियमित उड्डाण करत होते.
पोरबंदर हवाई पट्टीवर उतरताना हेलिकॉप्टर कोसळले. हेलिकॉप्टर पडताच त्याला आग लागली. भारतीय तटरक्षक दलाने सांगितले की, हेलिकॉप्टरमध्ये २ पायलटसह ३ लोक होते. सर्वांचा मृत्यू झाल्याची माहिती मिळत आहे. गेल्या वर्षी २ सप्टेंबर रोजी भारतीय तटरक्षक दलाचे प्रगत हलके हेलिकॉप्टर (ध्रुव) पोरबंदर किनाऱ्याजवळ अरबी समुद्रात पडले होते.

## शिक्षणात खासगीकरण योग्य नाही

■ **वृत्तसंस्था, चेन्नई, दि. ५ :**



काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी आयआयटी मद्रासच्या विद्यार्थ्यांची भेट घेतली. एका विद्यार्थ्यासोबतच्या संभाषणाचा व्हिडिओ शेअर केला.
त्यात राहुल गांधींनी लिहिले की, सरकारांनी शिक्षण क्षेत्रात खर्च वाढवला पाहिजे. खासगीकरण आणि आर्थिक मदतीतून दर्जेदार शिक्षण मिळू शकत नाही. संसाधने सर्वांमध्ये न्याय्य पद्धतीने वाटली पाहिजेत. विकास सर्वांसाठी समान असावा. यातून समाजातील कोणताही घटक वगळू नये. भाजपचे लोक विकासाबाबत अधिक आक्रमक आहेत. सामाजिक बाबींवर काँग्रेसचा विश्वास आहे की समाज जितका सामंजस्यपूर्ण असेल. लोक कमी लढतील.

## खंडणीसाठी धनंजय मुंडेंच्या बंगल्यावर बैठक
### तारीख सांगत सुरेश धस यांचा खळबळजनक आरोप

■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. ५ :**
पवनचक्की कंपनीकडे खंडणी मागण्यासाठी धनंजय मुंडे यांच्या सरकारी बंगल्यावर बैठक झाली होती. नंतर निवडणुकीसाठी या कंपनीकडून ५० लाख रुपये घेण्यात आले, असा गंभीर आरोप सुरेश धस यांनी केला. तसेच ही माहिती खोटी निघाली, तर मी राजकारण सोडेन, असे आव्हानही धस यांनी दिले.
सुरेश धस यांनी हा दावा करताना तारखांचा देखील उल्लेख केला. तसेच धनंजय मुंडेंना मंत्रिमंडळातून बाहेर काढावे, अशी मागणी देखील केली.
१४ जून रोजी अवादा कंपनीचे अधिकारी आणि वाल्मीक कराड, नितीन बिक्कड यांची मुंडेंच्या परळीतील बंगल्यावर बैठक झाली. या बैठकीनंतर थेट धनंजय मुंडे यांची भेट घेण्यासाठी अवादा कंपनीच्या शुक्ला नावाचा अधिकारी मुंडे यांचे स्वीय सहाय्यक प्रशांत जोशी यांच्याकडे प्रयत्न करत होते. मला डावलून थेट धनंजय मुंडेंची भेट घेण्याचा प्रयत्न केल्याने ही बाब वाल्मीक कराडला खटकली. त्यामुळे वाल्मीकने जोशीला खडसावले.
त्यानंतर १९ जून रोजी आवादा कंपनी आणि आय एनर्जी या कंपनीच्या अधिकाऱ्यांची धनंजय मुंडे यांच्या मुंबईतील बंगल्यावर बैठक झाली. या बैठकीत कंपनीच्या अधिकाऱ्यांकडे ३ कोटी रुपयांची खंडणी मागितली. त्यानंतर कंपनीच्या अधिकाऱ्यांनी आपल्या वरिष्ठांना ही बाब फोनवर सांगितली. वरिष्ठांनी ३ कोटींऐवजी २ कोटी रुपये देण्याची सहमती दाखवली.
त्यानंतर निवडणुकीसाठी आता लगेच ५० लाख रुपये द्या, अशी मागणी कंपनीकडे करण्यात आली आणि कंपनीने यांना ५० लाख रुपये दिले. हे पैसे तेव्हा धनंजय मुंडेंनी घेतले की वाल्मीक कराड याने हे मला माहीत नाही. धनंजय मुंडे यांच्या सरकारी बंगल्यावर खंडणीसाठी बैठका झाल्या, असा गंभीर आरोप सुरेश धस यांनी केला आहे.

## पाडापाडीच्या राजकारणाचा ठाकरे गटाला मोठा फटका
### राजन साळवींचा लवकरच भाजपात प्रवेश

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ५ :**
लोकसभा निवडणुकीतील पाडापाडीच्या राजकारणाचा फटका शिवसेना ठाकरे गटाचे माजी आमदार राजन साळवी यांना विधानसभा निवडणुकीत बसल्याची चर्चा रंगू लागली आहे. आपली नाराजी व्यक्त करण्यासाठी मातोश्रीवर जावून साळवी यांनी उध्दव ठाकरे यांची भेट घेतल्यानंतर ठाकरे यांनी राजन साळवी यांनाच झापल्याने राजन साळवी यांचे भाजपात जाणे आता जवळपास निश्चीत झाले आहे.
राजापुर विधानसभा निवडणुकीत माजी आमदार राजन साळवी यांना पराभवाचा सामना करावा लागला होता. मात्र त्यांना पाडण्यासाठी माजी खासदार विनायक राऊत यांनीच शिवसेना शिंदे गटाचे उमेदवार किरण सामंत यांना मदत केल्याचा आरोप माजी आमदार राजन साळवी यांनी केला आहे. आज उद्धव ठाकरे यांनी त्यांना खरीखोटी सुनावल्यानंतर राजन साळवी आता भाजपावासी होणार आहेत.

## शरद पवार यांच्या हेलिकॉप्टरमध्ये बिघाड

■ **वृत्तसंस्था, चिपळूण, दि. ५ :**
शरद पवार यांच्या हेलिकॉप्टरमध्ये तांत्रिक बीघाड झाल्याची घटना समोर आली आहे. शरद पवार हे चिपळूण दौऱ्याला गेले असता तेथून परत येत असताना ही घटना घडली आहे.
हेलिकॉप्टर मध्ये तांत्रिक बिघाड झाल्यामुळे हेलिकॉप्टरला सलग तीन वेळा उड्डाण करण्याचा प्रयत्न करावा लागला. अखेर तिसऱ्या प्रयत्नात हेलिकॉप्टरचे यशस्वी उड्डाण झाले. चिपळूण येथे आयोजित कृषी प्रदर्शनाचे उद्घाटन शरद पवार यांच्या हस्ते करण्यात आले.
हा कार्यक्रम झाल्यानंतर शरद पवार परतीच्या प्रवासाला निघाले असता हेलिकॉप्टरमध्ये हा तांत्रिक बिघाड झाल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे हेलिकॉप्टर दहा फुटांवर तब्बल दहा ते पंधरा मिनिटे अडकून पडले होते. उड्डाण घेण्यासाठी शरद पवार यांच्या हेलिकॉप्टरला सलग तीन वेळा प्रयत्न करावे लागले. अखेर तिसऱ्या प्रयत्नामध्ये या हेलिकॉप्टरने उड्डाण केले.
शरद पवार हेलिकॉप्टर मध्ये बसल्यानंतर प्रशासकीय अधिकाऱ्यांची धावपळ संपली होती. मात्र हेलिकॉप्टरमध्ये झालेल्या तांत्रिक बिघाडामुळे प्रशासकीय अधिकाऱ्यांची चांगलीच तारांबळ उडाली. मात्र काही वेळाने हेलिकॉप्टरने यशस्वी उड्डाण केले.

## स्वातंत्र्यवीर सावरकारांनंतर आता दाभोलकरांच्या नावासाठी आग्रह
### उद्घाटनीय स्थळाला नाव देण्याची अंनिसची मागणी

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ५ :**
२१ ते २३ फेब्रुवारीदरम्यान दिल्लीत होणाऱ्या साहित्य संमेलनाच्या एका प्रवेशद्वाराला स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे नाव दिल्याचे स्पष्ट झाल्यानंतर आता विज्ञान भवनातील उद्घाटनीय स्थळाला दिवंगत विचारवंत डॉ. नरेंद्र दाभोलकर यांचे नाव देण्यात यावे, अशा मागणीचे पत्र महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या पुणे शाखेने साहित्य महामंडळाच्या अध्यक्ष उषा तांबे यांना पाठवले आहे.
अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या पत्रानुसार, साहित्य संमेलनाचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते दिल्लीतील विज्ञान भवनात होणार आहे आणि डॉ. नरेंद्र दाभोलकर हे आग्रही विज्ञानवादी होते. दाभोलकरांनी लिहिलेली १२ पुस्तके प्रकाशित झाली आहेत. तसेच साने गुरुजींनी सुरू केलेल्या साधना या साप्ताहिकाचे ते अनेक वर्ष संपादक होते.
समाजाला विवेकशील करण्यात दाभोळकरांचे मोठे योगदान आहे. त्यांचे हे सर्व समाजाभिमुख कार्य लक्षात घेता साहित्य संमेलनाच्या विज्ञान भवनातील उद्घाटनीय स्थळाला डॉ. दाभोलकरांचे नाव देणे सर्वार्थाने योग्य ठरेल, असेही या पत्राद्वारे समितीच्या राज्य कार्यकारणीचे सल्लागार सदस्य श्रीपाल ललवाणी, पुणे शहर कार्याध्यक्ष अनिल वेल्हाळ यांनी महामंडळाचे लक्ष वेधले आहे. सोबतच महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी यांनाही यासाठी पुढाकार घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

**शरद पवारांनाही साकडे**

अंधश्रद्धा, अनिष्ट रुढी, परंपरा मोडीत काढण्यासाठी दाभोलकरांनी आयुष्यभर लोकप्रबोधन केले. महाराष्ट्र जादूटोणाविरोधी विधेयक विधिमंडळात मंजूर व्हावे, यासाठी मोठा लढा उभारला आणि अखेर समाजहितासाठी लढता-लढता ते शहीद झाले. एक विज्ञानवादी मराठी माणूस म्हणून दाभोलकरांचा देशपातळीवर मोठा लौकिक होता. त्यामुळे राष्ट्रीय राजधानीत होणाऱ्या या संमेलनाच्या उद्घाटनीय स्थळाला दाभोलकरांचे नाव देण्यासाठी स्वागताध्यक्ष म्हणून आपण स्वतः पुढाकार घ्यावा, अशी विनंती अंनिसने शरद पवार यांना पत्राद्वारे केली आहे.

## भारताने अडीच दिवसांत गमावली सिडनी कसोटी

■ **वृत्तसंस्था, सिडनी, दि. ५ :**
सिडनी कसोटीत भारतीय संघ ऑस्ट्रेलियाविरुद्ध ६ विकेटने पराभूत झाला आहे. या पराभवासह भारतीय संघाला बॉर्डर-गावस्कर करंडक स्पर्धेत ३-१ असा पराभव पत्करावा लागला आहे.
या मालिकेत ऑस्ट्रेलियाने १० वर्षांनंतर भारताचा पराभव केला. यापूर्वी कांगारूने २०१४-१५ मध्ये एमएस धोनीच्या नेतृत्वाखाली टीम इंडियाकडून मालिका जिंकली होती.
रविवारी, सामन्याच्या तिसऱ्या दिवशी भारताने ऑस्ट्रेलियाला १६२ धावांचे लक्ष्य दिले होते, जे ऑस्ट्रेलियन संघाने दुसऱ्या डावात ४ विकेट गमावून पूर्ण केले. ट्रॅव्हिस हेड ३४ आणि ब्यू वेबस्टर ३९ धावांवर नाबाद राहिले.
उस्मान ख्वाजाने ४१ आणि सॅम कोन्स्टासने २२ धावा केल्या. भारताकडून प्रसिद्ध कृष्णाने ३ बळी घेतले. दिवसाच्या पहिल्या सत्रात भारतीय संघ दुसऱ्या डावात सर्वबाद १५७ धावांवर आटोपला. तत्पूर्वी, ऑस्ट्रेलिया पहिल्या डावात १८१ धावांत सर्वबाद झाला होता, तर भारताने पहिल्या डावात १८५ धावा केल्या होत्या.



## मुंबई मराठी पत्रकार संघाच्या पत्रकार दिन सोहळ्यात विविध पुरस्कारांचे वितरण

### दिनदर्शिका प्रकाशन आणि पुरस्कारविजेत्या छायाचित्रकारांचा सत्कार

**मुंबई, दि.५ प्रतिनिधी**

मुंबई मराठी पत्रकार संघातर्फेâ येत्या ६ जानेवारी, २०२५ रोजी आयोजित पत्रकार दिन सोहळ्यात विविध पुरस्कारांचे वितरण केले जाणार आहे. महनीय प्रवक्ते आणि ज्येष्ठ संपादक साहित्यिक महावीर जोंधळे यांच्या हस्ते हे पुरस्कार दिले जातील. याचवेळी पत्रकार संघाने आय़ोजित केलेल्या छायाचित्र स्पर्धेतील पुरस्कार विजेत्या छायाचित्रांच्या दिनदर्शिकेचे प्रकाशनही होईल, अशी माहिती संघाचे अध्यक्ष श्री. संदीप चव्हाण यांनी दिली.

**पुरस्कार प्राप्त मानकरी पुढीलप्रमाणे आहेत - मंगेश मोरे (दै. सामना), घन:श्याम भडेकर (ज्येष्ठ पत्रकार), सचिन लुंगसे (दै. लोकमत), विनोद राऊत (दै. सकाळ), पांडुरंग म्हस्के (दै. सकाळ)**

सोमवार, दि. ६ जानेवारी, २०२५ रोजी सायंकाळी ५.०० वाजता पत्रकार भवन, आझाद मैदान, मुंबई ४०० ००१ येथे यानिमित्त आयोजित समारंभात पुरस्कारविजेत्या छायाचित्रकारांचा तसेच 'महाराष्ट्र विधानसभा निवडणूक अंदाज-२०२४ चे निकाल विजेते श्री. नंदू धुरंधर, श्री. संजीव उपरे तसेच श्री. गुरुदत्त लाड यांचाही यावेळी सत्कार करण्यात येणार आहे. सदर कार्यक्रम सर्वांसाठी खुला असून लोकांनी मोठ्या संख्येने या कार्यक्रमास उपस्थित राहावे, असे आवाहन संघाचे कार्यवाह श्री. शैलेंद्र शिर्के यांनी केले आहे.

# कल्याण-डोंबिवलीसाठी 357 कोटींच्या पाणीपुरवठा योजनेस मान्यता

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची घोषणा

**मुंबई, दि.५ प्रतिनिधी**

कल्याण डोंबिवली शहरासाठी अमृत योजनेअंतर्गत ३५७ कोटी रुपयांच्या पाणीपुरवठा योजनेला मंत्रिमंडळाने मान्यता देण्याची घोषणा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गुरूवारी मंत्रिमंडळ बैठकीनंतर पत्रकारांशी बोलताना केली. आजच्या निर्णयामुळे कल्याण डोंबिवली शहरासह नव्याने समाविष्ट २७ गावांना सुरळीत पाणीपुरवठा होण्यासाठी मदतच होणार असून याबद्दल त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचेही आभार मानले.

नुकत्याच पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीच्या प्रचारात आपण मुख्यमंत्री य नात्याने कल्याण डोंबिवली करांना वाढीव पाणीपुरवठा महायुतीचे सरकार आल्यास पूर्ण करू असा शब्द दिला होता.तो आज पूर्णत्वास गेल्याचे समाधान असल्याची भावनाही उपमुख्यमंत्री शिंदे यांनी व्यक्त केली. अमृत अभियानांतर्गत पाणीपुरवठा, पर्जन्य जलवाहिनी, नागरी परिवहन व हरित क्षेत्र विकास इ.पायाभूत सुविधांची निर्मिती शहरांमध्ये करण्यात येत आहे.त्यानुसार कल्याण डोंबिवली शहराच्या पाणीपुरवठा प्रकल्पास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. कल्याण डोंबिवली शहराच्या



पाणीपुरवठा प्रकल्पातील महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने सुधारित तांत्रिक बदल प्रस्तावाला राज्यस्तरीय तांत्रिक समिती तसेच राज्यस्तरीय उच्चाधिकार सुकाणू समितीच्या बैठकीमध्ये मंजूरी देण्यात आली होती. त्यास अनुसरूनच आज प्रत्यक्षात या प्रकल्पाला प्रशासकीय मान्यता देण्यात आल्याचेही शिंदे यांनी यावेळी आवर्जून नमूद केले.

या योजनेचा लाभ कल्याण डोंबिवली शहरासह नव्याने समाविष्ट २७ गावांना होणार असून त्यामुळे सुरळीत पाणीपुरवठा होण्याबरोबरच १०५ दलघमी साठवण क्षमता देखील निर्माण होणार असल्याची माहितीही उपमुख्यमंत्री शिंदे यांनी यावेळी दिली.

## निकृष्ट दर्जाच्या खाद्य पदार्थप्रकरणी हॉटेलचा परवाना रद्द

**मुंबई, दि. ५ प्रतिनिधी**

ख्रिसमस, थर्टी फर्स्ट, नवीन वर्षांच्या स्वागतासाठी मुंबईकरासह लाखो पर्यटक जल्लोष मुड मध्ये असतात. थर्टी फर्स्ट नवीन वर्षाच्या स्वागतामध्ये मग्न असताना, मुंबईकरांना निकृष्ट दर्जाचे खाद्यपदार्थ, हॉटेल रेस्टॉरंट क्लबमध्ये अस्वच्छता आढळून आल्याने एका हॉटेलचा परवाना रद्द तर एका हॉटेलवर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. ५ ते ३१ डिसेंबरदरम्यान अन्न व औषध प्रशासन विभागाने विशेष मोहीम हाती घेतली होती, त्यात हॉटेल रेस्टॉरंट क्लब या आस्थापनाची झाडाझडती घेतल्याचे एफडीएचे सह आयुक्त मंगेश माने यांनी सांगितले.

३१ डिसेंबर रोजी थर्टी फर्स्ट नवीन वर्षांच्या स्वागतासाठी येणाऱ्या पर्यटकांचे पाय आपसूकच हॉटेल रेस्टॉरंट क्लबमध्ये चमचमीत पदार्थांचा आस्वाद घेण्यासाठी वळतात. मुंबईकर पर्यटकांची गर्दी हॉटेल, रेस्टॉरंट व क्लब कॅन्टीन चालवणाऱ्या अन्न व्यवसायिकाकडून निकृष्ट दर्जाच्या अन्न पदार्थाचा पुरवठा होवु नये. तसेच अन्न विषबाधेच्या घटना घडू नये यासाठी जनतेस निर्भेळ, सकस व गुणवतापूर्ण अन्नपदार्थ उपलब्ध करुन जनतेची अन्न सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी ५ ते ३१ डिसेंबर २०२४ या कालावधीत हॉटेल / रेस्टॉरंट/ क्लब कॅन्टीन या आस्थापनांची तपासणी मोहिम अन्न व औषध प्रशासनाने हाती घेतली होती. या मोहीमेतंर्गत हॉटेल, रेस्टॉरंट क्लब व कॅन्टीन या आस्थापनांच्या एकूण ६३ तपासण्या करण्यात आल्या. यात ८ औपचारिक अन्न नमुने व ७० सर्व्हेक्षण अन्न नमुने तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठविण्यात आले. मात्र तपासण्यांपैकी एकूण ६१ प्रकरणांत तपासणीत त्रुटी आढळल्याने सुधारणा नोटीस पाठविण्यात आलेल्या आहेत. एका प्रकरणी परवाना निलंबन करण्यात आला असून एका हॉटेल चालकांकडून ३० हजारांचा दंड वसूल करण्यात आला आहे. तर १ प्रकरणात २१ हजार ६०० रुपयांचा मुदतबाह्य बीयरचा साठा सापडला.

## कामगार संघटनेचे यश एकनिष्ठेवर अवलंबून असते : गोविंदराव मोहिते

**मुंबई, दि. ५ प्रतिनिधी**

कामगार संघटनेच्या लढ्याचे यश एकसंघपणे लढण्यावर अवलंबून असते आणि ही गोष्ट केवळ एकनिष्ठेतूनच साध्य होऊ शकते अन्यथा नाही, असे गौरवोद्गार राष्ट्रीय मिल मजदूर संघाचे सरचिटणीस गोविंदराव मोहिते यांनी उपाध्यक्ष बजरंग चव्हाण यांच्या अमृतमहोत्सवीवर्षा निमित्त सत्कार समारंभात बोलताना काढले.

राष्ट्रीय मिल मजदूर संघाचे उपाध्यक्ष बजरंग चव्हाण यांनी ७५ व्या वर्षात पदार्पण केले. त्यावद्दल संघटनेच्या वतीने त्यांचा गोविंदराव मोहिते यांच्या हस्ते शाल, पुष्पगुच्छ देऊन हृद्य सत्कार करण्यात आला. मजदूर मंझीलमध्ये आयोजित करण्यात आलेल्या समारंभाला महागाव सहकारी पतपेढीचे अध्यक्ष, ॲड. सूर्यकांत कडाकणे आणि विविध संघटना

संस्थांचे पदाधिकारी, कार्यकर्ते याप्रसंगी आवर्जुन उपस्थित होते. गोविंदराव मोहिते आपल्या भाषणात उपाध्यक्ष बजरंग चव्हाण यांनी गेल्या ५२ वर्षात संघटना एकसंघ ठेवण्यासाठी जो मोलाचा वाटा उचलला त्याचा आवर्जून उल्लेख केला. संघटनेचे अध्यक्ष आमदार सचिनभाऊ अहिर कार्यक्रमा निमित्ताने बाहेर असल्याने त्यांनी दूरध्वनीद्वारे बजरंग चव्हाण यांना अमृतमहोत्सवी वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

बजरंग चव्हाण यांनी कामगारांच्या भविष्य निर्वाह निधीच्या प्रश्नावर असेल किंवा संनियंत्रण समितीमध्ये कामगारांची बाजू मांडताना कामगारांचे हित प्रथम जोपासले आहे, असे सांगून गोविंदराव मोहिते आपल्या भाषणात पुढे म्हणाले, श्रीछत्रपती शिवाजी मंदिर व महागाव सहकारी पतपेढीचे संचालक किंवा स्प्रिंग मिल कामगारांचे पुढारी म्हणून त्यांनी केलेले काम निश्चितच नाव लौकीक करणारे आहे. खजिनदार निवृत्ती देसाई, उपाध्यक्ष रघुनाथ आण्णा शिर्सेकर, सुनिल बोरकर, सेक्रेटरी शिवाजी काळे, सुरेश मोरे, विलास डांगे, मोहन पोळ, ममता घाडी, लेखक काशिनाथ माटल आदींनी आपल्या भाषणात बजरंग चव्हाण यांच्या सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, सहकार आणि कामगार आदी क्षेत्रातील कामावर प्रकाश झोत टाकून त्यांच्या बहुआयामी व्यक्तिमत्त्वाची ओळख करून दिली.

# 1 एप्रिल ते 31 डिसेंबरपर्यंत 5 हजार 847 कोटी रुपये मालमत्ता करांचे संकलन

**मुंबई, दि.५ प्रतिनिधी**

१ एप्रिल ते ३१ डिसेंबर या नऊमाहीत एकूण ५ हजार ८४७ कोटी ६८ लाख रुपये इतक्या रकमेच्या मालमत्ताकरांचे संकलन करण्यात आले असून सोमवार ३० डिसेंबर रोजी एका दिवसात १७३ कोटी लाख ५९ लाख रूपये तर मंगळवार ३१ डिसेंबर रोजी २६० कोटी २८ लाख रूपयांचा कर भरणा मालमत्ताधारकांनी केला आहे. गत आर्थिक वर्ष (२०२३- २४) मधील मालमत्ता कर भरण्याची अंतिम मुदत ही २५ मे २०२४ पर्यंत होती. त्यामुळे मागील आर्थिक वर्षातील सुमारे १ हजार ६६० कोटी रुपये रक्कम देखील यात



समाविष्ट आहे. याचाच अर्थ विद्यमान आर्थिक वर्षाचे (२०२४-२५) कर संकलन हे ४ हजार १८७ कोटी १९ लाख रुपये इतके झाले आहे. विद्यमान आर्थिक वर्षाचे (२०२४-२५) मालमत्ता कर संकलन उद्दिष्ट्य हे सुमारे ६ हजार २०० कोटी रुपये इतके आहे. त्या तुलनेत आतापर्यंत ६८ टक्के कर संकलन झाले आहे. शहरातील मालमत्ताधारकांना दिलेल्या मुदतीत कर भरणा करता यावा, यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या कर निर्धारण व संकलन विभागाच्या वतीने वेळोवेळी व्यापक जनजागृती करण्यात येत आहे. मालमत्ताधारकांच्या सोयीसाठी शनिवारी देखील प्रशासकीय विभाग (वॉर्ड) कार्यालय तसेच नागरी सुविधा केंद्र सुरू ठेवण्यात आली होती. तसेच यासंबंधीत अडचणींचा निपटारा करण्यासाठी कर निर्धारण व संकलन विभागाचे अधिकारी, कर्मचारी अविरत कार्यरत आहेत. सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाचा मालमत्ता कर भरण्यासाठी अंतिम देय ३१ डिसेंबर हा होता. कर भरणा करण्यासाठी पालिकेचे मुख्यालय, सर्व प्रशासकीय विभाग कार्यालयांमधील नागरी सुविधा केंद्रे रात्री उशिरापर्यंत सुरू होती. त्यामुळे सोमवार ३० डिसेंबर रोजी १७३ कोटी ५९ लाख रूपये, मंगळवार ३१ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी ८ वाजेपासून मध्यरात्री १२ वाजेपर्यंत या वेळेत २६० कोटी २८ लाख रूपयांचा मालमत्ता कर नागरिकांनी भरला.

## म्हाडाची 10 घुसखोरांना घरे खाली करण्याची नोटीस

**मुंबई, दि. ५ प्रतिनिधी**

लॉटरीत न विक्री झालेल्या म्हाडाच्या मानखुर्द येथील ३४ घरांमध्ये घुसखोरी झाल्याचे उघडकीस आले आहे. त्या पार्श्वभूमीवर म्हाडाने कारवाई करीत १० जणांना तत्काळ सदनिका खाली करण्याचे निर्देश दिले आहेत. सदनिका खाली न केल्यास कडक कारवाई केली जाईल, असे बजावले आहे.

उर्वरित २४ घुसखोरांनी म्हाडाच्या कारवाईविरोधात अपिलीय अधिकाऱ्याकडे दाद मागितली आहे. त्यामुळे पुढे काय निर्णय होणार, याकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहेत. म्हाडाने २०१८मध्ये घरांच्या विक्रीसाठी काढलेल्या लॉटरीत मानखुर्द येथील घरांचा समावेश केला होता; मात्र ३४ घरांची विक्री न झाल्याने ती पडून होती. कोरोना काळात या घरांमध्ये घुसखोरी झाली. त्यांच्याविरोधात कारवाई सुरू करीत म्हाडाच्या सक्षम प्राधिकृत अधिकारी-२ यांनी संबंधितांना घरे खाली करण्याचे निर्देश देतानाच गुन्हे दाखल करण्याची कार्यवाही सुरू केली होती; मात्र ३४ पैकी २४ घुसखोरांनी सक्षम प्राधिकृत अधिकाऱ्यांच्य निर्णयाविरोधात अपिलीय अधिकाऱ्याकडे दाद मागितली आहे. त्यानुसार आता सहसचिव दर्जाच्या अधिकाऱ्यासमोर त्यावर सुनावणी होणार असल्याची माहिती म्हाडाच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने दिली. दरम्यान, इतर १० घुसखोरांवर कारवाई अटळ असल्याचे दिसत आहे.

# कोस्टल रोडवर आता चार मजली भूमिगत पार्किंग

**मुंबई, दि. ५ प्रतिनिधी**

मुंबईकरांचा प्रवास वेगवान करणारा कोस्टल रोड पूर्ण क्षमतेने लवकरच सेवेत येणार असताना आता या ठिकाणी तब्बल चार मजली पार्किंगची सुविधा करण्यात येणार असल्याचे पालिकेने जाहीर केले आहे. या ठिकाणी दुमजली पार्किंग सुविधा होणार होती. मात्र आता चार मजली सुविधा होणार असून विशेष म्हणजे 'बेस्ट'च्या गाड्यांनाही या ठिकाणी पार्किंगची सुविधा उपलब्ध केली जाणार आहे. याबाबत एल ॲण्ड टीकडून प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराला नवीन आराखडा सादर करण्यात आल्याची माहिती अतिरिक्त आयुक्त अमित सैनी यांनी दिली.

मुंबईकरांचा प्रवास वेगवान करण्यासाठी प्रिन्सेस स्ट्रीट ते वरळी सी लिंक असा एकूण १०.५८ किमी लांबीचा कोस्टल रोड बांधण्यात येत आहे. या कोस्टल रोडमुळे ४० मिनिटांचा प्रवास अवघ्या ९ ते १० मिनिटांत होणार असून वेळेची ७० टक्के तर इंधनाची ३४ टक्के बचत होणार आहे. या प्रकल्पात १७५ एकर मोकळी जागा उपलब्ध होणार आहे. या ठिकाणी पालिका उद्यान, वॉकिंग मार्ग, पार्किंग अशा सुविधा तयार करणार आहे. प्रस्तावित रेसकोर्समधील सेंट्रल पार्कमध्ये येणाऱ्या पर्यटकांच्या बसगाड्यांचे पार्किंगही हाजी अली पार्किंगमध्ये करण्याचे नियोजन असल्याने आराखड्यात बदल करण्यात आला आहे. मार्च २०२५ पर्यंत हे काम सुरू होणार आहे. यामध्ये हाजी अली येथील रजनी पटेल चौक येथे होणाऱ्या पार्किंगलगत बेस्ट बससाठी थांबाही दिला जाणार आहे. त्यामुळे हाजी अली दर्गा तसेच रेसकोर्समधील सेंट्रल पार्कमध्ये किंवा कोस्टल रोडजवळील नजारा पाहण्यासाठी मुंबईकर पर्यटकांना सुविधा उपलब्ध होणार आहे.

## बँकेच्या वसुलीदाराचा जाच; वाहनचालकाची आत्महत्या

**मुंबई, दि. ५ प्रतिनिधी**

कर्जाचा हप्ता थकल्यामुळे बँकेच्या वसुलीदाराच्या जाचाला कंटाळून एका २७ वर्षीय चालकाने आत्महत्या केल्याचा आरोप त्याच्या कुटुंबीयांनी केला आहे. ही घटना मालाड परिसरात घडली आहे. याप्रकरणी आत्महत्या केलेल्या चालकाच्या भावाने दिलेल्या तक्रारीवरून विजय ओहोळ (४७) या वसुलीदाराविरोधात कुरार पोलिसांनी बीएनएस कायद्याचे कलम १०८ अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे.

तक्रारदार सुनील जायसवाल (४०) हे मृत सूरज जायसवाल (२७) याचे मोठे बंधू आहेत. त्यांनी पोलिसांना दिलेल्या तक्रारीनुसार, सूरजने चोलामंडलम बँकेकडून १५ लाखांचे कर्ज घेऊन आयशर वाहन खरेदी केले होते. या कर्जाला सुनील हे जामीनदार होते. सुनील यांना २२ नोव्हेंबर रोजी 'चोलामंडलम बैंक से बोल रहा हू, आपके भाईने आयशर गाडी का हप्ता भरा नही है. हमारा फोन नहीं उठा रहा है इसलिये में आप से बात कर रहा हू, असा एका व्यक्तीचा फोन आला. त्यानंतर सुनीलने सूरजला फोन केला मात्र त्याने फोन उचलला नाही. सूरजने हप्ता न भरल्याने बँकेने सुनील यांना फोन करायला सुरुवात केली. २९ आणि ३० डिसेंबर रोजी कांदिवली पश्चिमला विजय ओहोळने सुनील यांची भेट घेतली. त्यावेळी गाडी तुम्ही घेऊन जा, आम्हाला हप्ता भरणे शक्य नाही, असे सुनीलने विजयला सांगितले. ३१ डिसेंबरला सकाळी ६ वाजता तो गाडी पार्क केलेल्या ठिकाणी आला. त्याने सुनीलला सांगितले की, तुमचा भाऊ रात्री १२ वाजेपर्यंत फोन उचलत होता. आता सकाळपासून तो फोन उचलत नाही. हे ऐकल्यावर सुनील यांनी सूरजच्या घरी धाव घेतली. मात्र तो राहत्या घरात गळफास घेतलेल्या अवस्थेत सापडला. त्याला खाली उतरवून कुटुंबीयांनी शताब्दी रुग्णालयात नेले. मात्र तिथे डॉक्टरांनी मृत घोषित केले. शवविच्छेदनानंतर सुनील यांनी कुरार पोलिसात बँक वसुलीदार विजय याच्यावर भावाला आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा आरोप करत गुन्हा दाखल केला.

## ज्वेलर्स रॉबरीप्रकरणी दोघांना अटक

**मुंबई, दि. ५ प्रतिनिधी**

सोन्याचे दागिने खरेदीचा बहाणा करून रिषभ ज्वेलर्समध्ये रॉबरी करून पळून गेलेल्या दोघांच्या आग्रीपाडा आणि गुन्हे शाखेच्या पोलिसांनी मुसक्या आवळल्या. विनोद पाल आणि संतोषकुमार अशी त्या दोघांची नावे आहेत. त्या दोघांना मध्य प्रदेश आणि उत्तर प्रदेश येथून पोलिसांनी बेड्या ठोकल्या. त्या दोघांकडून चोरीचा बहुतांश मुद्देमाल जप्त केला आहे.

चिंचपोकळी येथे राहणाऱ्या तक्रारदार याचे भायखळा येथे रिषभ ज्वेलर्स नावाचे दुकान आहे. गेल्या आठवड्यात दुपारी ते दुकानात बसले होते तेव्हा दोन जण त्यांच्या दुकानात आले. त्याने दागिने खरेदीचा बहाणा केला. त्या दोघांनी तक्रारदार यांना दागिने दाखवण्यास सांगितले. तक्रारदार हे दागिने दाखवत असतानाच त्या दोघांनी घातक शस्त्राचा धाक दाखवला. धाक दाखवून १ कोटी ९३ लाखांचा मुद्देमाल घेऊन पळ काढला. त्या दोघांनी तक्रारदार याचे हातपायदेखील बांधले होते. तक्रारदार याने त्याची कशीबशी सुटका केली. याची माहिती समजताच आग्रीपाडा पोलीस घटनास्थळी आले. पोलिसांनी अज्ञात व्यक्तीविरोधात गुन्हा नोंद केला. याचा समांतर तपास गुन्हे शाखेचे पोलीस करत होते. गुन्हे शाखेने तपासासाठी पाच पथके तयार केली होती. आग्रीपाडा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक संजय निंबाळकर यांच्या पथकातील अधिकाऱ्याने तपास सुरू केला. तपासादरम्यान पोलिसांनी संतोषकुमारला उत्तर प्रदेश येथून बेड्या ठोकल्या, तर या गुन्ह्यातील मुख्य सूत्रधार हा मध्य प्रदेशला असल्याची माहिती गुन्हे शाखेच्या पोलिसांना मिळाली. पोलीस उपायुक्त दत्ता नलावडे यांच्या मार्गदर्शनाखाली तपासासाठी पथक तयार केली. मुख्य सूत्रधार विनोद पालला मध्य प्रदेश येथून ताब्यात घेऊन अटक केली. त्या दोघांकडून पोलिसांनी चोरीचे दागिने हस्तगत केले आहेत.

## प्रजासत्ताक दिनाची शाळांची सार्वजनिक सुट्टी रद्द - सरकारचा निर्णय

**मुंबई, दि. ५ प्रतिनिधी**

प्रजासत्ताक दिनानिमित्त दरवर्षी 26 जानेवारीला राज्यातील शाळांमध्ये सुट्टी दिली जाते. पण आता ही सुट्टी रद्द करण्याचा मोठा निर्णय महाराष्ट्र सरकारने घेतला आहे. विद्यार्थ्यांना सुट्टी देण्याऐवजी शाळा प्रशासनाने शाळेत देशभक्तीपर कार्यक्रमांचे आयोजन करावे आणि विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रप्रेमाची भावना निर्माण करावी, असे निर्देश शालेय शिक्षण विभागाने दिले आहेत. त्यामुळे यावर्षीपासून महाराष्ट्रातील शालेय विद्यार्थ्यांना प्रजासत्ताक दिनाची सुट्टी मिळणार नाही. तसेच याबाबत सरकारने परिपत्रकही प्रसिद्ध केले आहे. या दिवशी कोणते कार्यक्रम घ्यावेत, यासाठी आठ स्पर्धा आणि काही कार्यक्रमांची यादी शालेय शिक्षण विभागाकडून देण्यात आली आहे.

# घाटकोपर पोलीस ठाण्याची विशेष कामगिरी

## गहाळ 300 मोबाईलचे वाटप

**मुंबई, दि. ५ प्रतिनिधी**

महाराष्ट्र पोलीस स्थापना दिनाचे औचित्य साधून घाटकोपर पोलीस ठाणेच्या हद्दी मध्ये गेल्याकाही वर्षात गहाळ झालेल्या 300 मोबाईल धारकांना तक्रारीनुसार त्यांचे शोध मोहिमेत मिळालेले मोबाईल स्वाधीन करण्याचा कार्यक्रम घाटकोपर पश्चिम एल बी एस रोड, पाटीदार हॉल येथे गुरुवार दिनांक २ जानेवारी २०२५ रोजी सकाळी १० वाजता वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या हस्ते मोबाईल वितरण करण्यात आले.

घाटकोपर पोलीस ठाणे अंतर्गत झालेल्या या मोबाईल शोध मोहीम कारवाईमध्ये परीमंडळ ७, मुलुंड पोलीस उप आयुक्त विजयकांत सागर, घाटकोपर विभाग सहायक पोलीस आयुक्त शैलेश पासलवार, घाटकोपर पोलीस ठाणे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अविनाश काळदाते, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्रीमती दिपाली कुलकर्णी यांच्या मार्गदर्शना खाली मोबाईल चोरी व मोटार वाहन चोरी प्रतिबंधक पथकाचे पोलीस उपनिरीक्षक पांडुरंग साळुंखे पोह ००२५४/ दिपक भारती, पोह ०६०७३०/



निलेश पवार, पोशि ०९१०१२/अमोल सूर्यवंशी, पोशि ०९१०१४/अजय अहिरे, पोशि १३०७९३/ बाळासाहेब गव्हाणे या पथकाने 300 मोबाईल चा शोध लावण्यात विशेष कामगिरी केली आहे.

घाटकोपर पोलीस ठाणे नोंद हरवलेल्या मोबाईलचा CEIR या पोर्टलच्या माहितीच्या आधारे, व तांत्रिक कौशल्याचा मानवीय कौशल्य वापर करून माहितीच्या आधारे निरंतर पाठपुरावा करून या मोबाईलचे वापरकर्ता यांचा शोध घेऊन मुंबई तसेच गुजरात, उत्तर प्रदेश, झारखंड, बिहार, पश्चिम बंगाल, विविध परराज्यातून एकूण ३०० मोबाईल एकूण किंमत ३७ लाख ७३ हजार रुपयांची मालमत्ता प्राप्त करून तक्रारदार यांना स्वाधीन करण्याचा कार्यक्रम करण्यात आल्याचे पोलीस उपनिरीक्षक शरद शेट्टे यांनी सांगितले.

## संक्षिप्त

### कृषी प्रक्रिया सुविधा प्रकल्पासाठी जनेप प्राधिकरणाकडून अधिसूचना जारी

**मुंबई,**

भारतातील सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या जवाहरलाल नेहरू पत्तन प्राधिकरणाने ३० डिसेंबर २०२४रोजी जनेप प्राधिकरण येथे निर्यात-आयातसह देशांतर्गत कृषी वस्तू- आधारित प्रक्रिया आणि साठवण सुविधा विकसित करण्यासाठी मेसर्स ट्रायडेंट ॲग्रोकॉम एक्सपोर्ट्स प्रायव्हेट लिमिटेड आणि मेसर्स मॅन इन्फ्राकॉन्स्ट्रक्शन लिमिटेड (कंसोर्टियम) यांना लेटर ऑफ अवॉर्ड (एलओए) जारी केले आहे. हा प्रकल्प बंदर संकुलातील २७ एकर जमिनीवर उभारला जाणार असून या प्रकल्पाचे मूल्य अंदाजे २८४ कोटी रूपये आहे. जनेप प्राधिकरणाचे अध्यक्ष उन्मेष वाघ याबाबत म्हणाले की, ' हा प्रकल्प भारताच्या कृषी लॉजिस्टिक क्षमता वाढवेल आणि देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय कृषी व्यापाराच्या वाढीला आधार देईल.

### आयआयटीच्या जमिनीवरील बेकायदा बांधकामे हटवा

#### उच्च न्यायालयाचे सरकारला निर्देश

**मुंबई,**

विविध प्रकल्पांवर संशोधन करणाऱ्या आयआयटी मुंबईच्या जमिनीवर अतिक्रमण करत त्यावर बांधकाम उभारल्याप्रकरणी मुंबई उच्च न्यायालयाने आज तीव्र नाराजी व्यक्त केली. ही बेकायदा बांधकामे हटविण्याचे निर्देश मुख्य न्यायमूर्ती देवेंद्र कुमार उपाध्याय यांच्या खंडपीठाने सरकारला दिले. आयआयटी मुंबईच्या जागेवर अतिक्रमण करून त्यावर बेकायदा बांधकामे उभारल्याप्रकरणी शब्बीर शेख यांनी मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली होती. या याचिकेवर आज गुरुवारी मुख्य न्यायमूर्ती देवेंद्र कुमार उपाध्याय आणि न्यायमूर्ती अमित बोरकर यांच्या खंडपीठासमोर सुनावणी घेण्यात आली. त्या वेळी न्यायालयाने वाढत्या अनधिकृत बांधकामांबाबत नाराजी व्यक्त करत सरकारला फटकारले. तसेच सदर बांधकामे जमीनदोस्त करण्याचे निर्देश दिले. बांधकामे हटवताना आवश्यक तो पोलीस बंदोबस्त पुरवण्याच्या सूचना न्यायालयाने या वेळी सरकारला केल्या.

### तेलतुंबडेंच्या अपिलावर सुनावणीस न्यायमूर्तींचा नकार

**मुंबई,**

भीमा कोरेगाव हिंसाचार प्रकरण तसेच एल्गार परिषद प्रकरणी सामाजिक कार्यकर्ते आनंद तेलतुंबडे यांनी उच्च न्यायालयात अपील दाखल केले आहे. मात्र या अपिलावर सुनावणी घेण्यास न्यायमूर्ती सारंग कोतवाल यांच्या खंडपीठाने आज नकार दिला. त्यामुळे तेलतुंबडे यांच्या अपिलावर दुसऱ्या खंडपीठासमोर सुनावणी होण्याची शक्यता आहे. पुण्यात ३१ डिसेंबर २०१७ मध्ये पार पडलेल्या एल्गार परिषदेनंतर १ जानेवारी २०१८ रोजी भीमा कोरेगाव येथे हिंसाचार प्रकरण घडले. तेलतुंबडे यांनी सत्र न्यायालयात दोषमुक्ततेसाठी अर्ज केला होता. मात्र विशेष कोर्टाने तो फेटाळून लावला होता. त्या निर्णयाला तेलतुंबडे यांनी आव्हान दिले आहे.

### महिला पोलिसांबरोबर पती-पत्नीची हुज्जत

**मुंबई,**

सरकारी कर्तव्य बजावत असणाऱ्या दोन महिला पोलिसांसह हवालदाराशी पती पत्नीने हुज्जत घातल्याची घटना मालाड येथे घडली. याप्रकरणी मालाड पोलिसांनी गुन्हा नोंद केला आहे. मंगळवारी रात्री मालाडच्या चिंचोली फाटकसमोर ही घटना घडली. तक्रारदार हे मालाड पोलीस ठाण्यात पोलीस हवालदार म्हणून काम करतात. मंगळवारी रात्री चिंचोली फाटक परिसरात ते कर्तव्य बजावत होते. तेव्हा मद्य प्राशन केलेल्या मोहमदने त्यांच्याशी वाद घालून धक्काबुक्की केली. तक्रारदार यांची नेमप्लेट तोडली. हा प्रकार तेथे उपस्थित असलेल्या दोन महिला पोलिसांच्या लक्षात आला. त्या तेथे आल्या. त्यांनी मोहमदला बाजूला केले तेव्हा मोहमदची पत्नी शबनमने महिला पोलिसांच्या हाताला चावा घेतला. पोटात लाथ मारली. याप्रकरणी मालाड पोलिसांनी त्या दोघांना ताब्यात घेतले. सरकारी कामात अडथळा आणल्याप्रकरणी त्या दोघांविरोधात गुन्हा नोंद केला.

### कुर्ला बेस्ट बस अपघात : चालक संजय मोरेला जामीन मंजूर केल्यास तो पळून जाईल, पोलिसांचा न्यायालयात दावा

**मुंबई,**

कुर्ला येथील बेस्ट बस अपघातप्रकरणी अटक केलेल्या चालक संजय मोरेच्या जामीन अर्जाला गुरुवारी पोलिसांनी तीव्र विरोध केला. आरोपी संजय मोरेला जामीन मंजूर केल्यास तो पळून जाईल, असा दावा पोलिसांनी सत्र न्यायालयात केला. न्यायालय याबाबत शनिवारी सविस्तर सुनावणी घेणार आहे. ९ डिसेंबरला भरधाव बेस्टच्या एसी बसने अनेक पादचाऱ्यांना चिरडले होते आणि कित्येक वाहनांना धडक दिली होती. या भीषण अपघातात नऊ जणांचा मृत्यू झाला, तर ४२ जण जखमी झाले होते. याप्रकरणी बसचालक संजय मोरे याला बेदरकार ड्रायव्हिंग केल्याच्या आरोपावरून अटक केली होती. घटनेचे गांभीर्य ओळखून कुर्ला दंडाधिकारी न्यायालयाने त्याला जामीन नाकारून कोठडी सुनावली होती. त्यानंतर मोरेने ॲड. समाधान सुलाने यांच्यामार्फत सत्र न्यायालयात दाद मागितली होती. त्याच्या जामीन अर्जावर गुरुवारी अतिरिक्त सत्र न्यायाधीश व्ही. एम. पाताडे यांच्यापुढे सुनावणी झाली. यावेळी कुर्ला पोलिसांतर्फे सरकारी वकील प्रभाकर तरांगे यांनी मोरेच्या जामीन अर्जाला विरोध केला.

### बेकायदा मटण विक्रेत्यांवर महापालिकेची धडक कारवाई, 108 बकरे जप्त

**मुंबई,**

मुंबई महानगरपालिकेने बेकायदा मटण शॉपवर कारवाई करताना तब्बल १०८ बकरे जप्त करून देवनार पशुवधगृहात जमा करण्यात आले. यामध्ये प्रभादेवी भागातील बेकायदा मटण विक्रेत्यांवर पालिकेच्या बाजार विभागाकडून कारवाई करण्यात आली. यामध्ये एकूण ५८ बकरे जप्त करून देवनार पशुवधगृहात जमा करण्यात आले. विशेष म्हणजे जोगेश्वरीतही टेम्पोचा पाठलाग करून ४३ बकरेही जप्त करण्यात आले. महापालिका सहाय्यक आयुक्त बाजार मनीष वळंजू यांच्या निर्देशानुसार वरिष्ठ पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. शिवाली, मुख्य निरीक्षक दक्षता पथक शहर रवींद्र दिवेकर, दक्षता पथक पूर्व उपनगर विजय पवार व बाजार विभागातील कर्मचारी शिपाई स्टाफच्या सहकार्याने ही कारवाई करण्यात आली. यामध्ये प्रभादेवी, पी.एल. लोखंडे मार्ग व मानखुर्द येथील अनधिकृत मटण विक्रेत्यांकडून ५८ बकरे ताब्यात घेऊन देवनार पशुवधगृहात जमा करण्यात आले. पश्चिम उपनगरे स्टाफकडून डॉ. शिवाली यांच्या मार्गदर्शनाने अनधिकृत शेळ्या-मेंढ्या वाहतूक करणाऱ्या टेम्पोचा पाठलाग करून एकूण ४३ बकरे जप्त करण्यात आले. जोगेश्वरी पश्चिम येथील मटण दुकानावर धाड मारून ७ बकरे जप्त केले व देवनार पशुवधगृहात जमा करण्यात आले.

# चायना मांजाचे दुष्परिणाम दिसू लागले

■अकोला,दि.४ (प्रतिनिधी): काही दिवसात मकर संक्रांती पर्व सर्वत्र साजरा होणार आहे. यावेळी पतंग उडवण्यासाठी चायना मांजाचा वापर नागरिकांनी करू नये याकरिता जिल्हा प्रशासनातर्फे आवाहन करण्यात आले आहे. परंतु आता मांजाचे दुष्परिणाम दिसू लागले आहेत.

एक दुःखद घटना हिंगणा रोडवरील आश्रम भागात घडली. चायना मांज्यामुळे अत्यंत दुर्मिळ असलेल्या शृंगी घुबडाला आपला पंख गमवावा लागला आहे. पतंग उडवताना चायना मांजाचा वापर करू नका या आवाहनाचे महत्त्व जाणून घेण्याची गरज आहे अकोला जिल्ह्यात चायना मांज्यामुळे अनेक पक्षी तसेच मानवी जीवनाला धोका निर्माण झाला आहे, जिल्हा प्रशासन, पोलीस विभाग तसेच वन विभाग चायना मांजा वर शृंगी घुबडाला गमवावा लागला पंख बंदी घालण्यासाठी अतोनात प्रयत्न करत असले तरी काही चायना मांजाचे तस्कर हे चोरी पके चायना मांजाची विक्री करून मानवी जीवनासह पशुपक्ष्यांना धोका निर्माण करीत आहे.

जिल्हाधिकारी अजित कुंभार यांनी काल सर्व विभागाचे बैठक घेत चायना मांजा विक्री करणारह्यांवर गुन्हे दाखल करण्याचे निर्देश दिले आहेत, त्या पश्चात आज अकोला शहरातील हिंगणा रोड स्थित आश्रम जवळ अशाच घातक चायना माझ्यामुळे अत्यंत दुर्मिळ होत चाललेली श्रृंगी घुबड ही गंभीरित्या झाली, स्थानिक नागरिक अमित धारपवार व सुजित देशमुख यांना सदरची जखमी शृंगी घुबड ही दिसताच त्यांनी त्याला अकोला वन विभागाच्या अधिकाऱ्यांना सुपूर्द केले. जखमी असलेल्या शृंगी घुबडाच्या पंखाचे हाड चायना मांजामुळे मोडले असल्याने ती उडू शकणार नाही अशी शक्यता वर्तविण्यात येत आहे.

जखमी अवस्थेतील शृंगी घुबडावर अकोला वन विभागातर्फे उपचार करण्यात आले. मकर संक्रांती पर्व साजरे करताना नागरिकांनी पशु पक्षांसह मानवी जीवनाला धोका निर्माण करणाऱ्या चायना मांज्याचा वापर पतंग उडवण्यासाठी करणार नाही ही दक्षता घ्यावी.

# ग्रामीण व शहरी पोलिसांची कत्तलीसाठी गोवंश नेणाऱ्यांवर कारवाई

## ६ गोवंश व आरोपी पोलिसांच्या जाळ्यात ; १ लाख ७२ हजाराचे गोवंश जप्त

■मुर्तिजापुर,दि.४ (प्रतिनिधी): मुर्तीजापुर शहर व ग्रामीण परिसरात लपून-छपून गोवंश कत्तली व गोमास विक्री सुरू आहे.हे तर शहर व ग्रामीण पोलिसांनी गुरुवारी केलेल्या कारवाईवरून पुन्हा उघडकीस आले आहे.



याबाबत मूर्तिजापूरचे आमदार हरीश पिंपळे यांनी हिवाळी अधिवेशनात मुर्तीजापुर व बार्शीटाकळी तालुक्यात मोठ्या प्रमाणात कत्तलखाने व गोमांस विक्री सर्रासपणे सुरू असल्याचे जग जाहीर केले. तसेच बार्शीटाकळी तालुक्यातील महान येथील गोवंश तस्करीवर आळा घालणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यांवर सुद्धा गोवंश तस्करांनी हमला करण्यात मागे पुढे पाहिले नाही.

यामुळे गोवंश तस्करांची मुर्तीजापुर व बार्शिटाकळी तालुक्यातील गोवंश तस्करांची किती दहशत आहे. हे सुद्धा जग जाहीर झाले आहे.यामुळे जिल्हा पोलीस हायअलर्ट वर कारवाईचा सपाटा सुरू केलाय त्यात शहर व ग्रामीण पोलीसांनी केलेल्या वेगवेगळ्या दोन कारवाईत सहा गोवंश कत्तलिसाठी नेत असल्याचा मिळालेला गुप्त माहितीवरुन सिरसो शेत शिवार व ५२ गेट जवळ केलेल्या धडक कारवाईत ६ गोवंश अवैधरीत्या कट्लीसाठी नेत असताना धाड टाकून एका आरोपीस मुद्देमालासह अटक करण्यात आली तर एक आरोपी फरार झाल्याची घटना गुरुवारी दुपारच्या दरम्यान घडली आहे . तालुक्यातील ग्रामीण पोलीस यांना विश्वसनिय सूत्रानुसार मिळालेल्या गुप्त माहितीवरुन सिरसो शेत शिवारात चार गोवंश ज्यांची किंमत ८२ हजार अवैधरीत्या कत्तलीसाठी नेत असल्याच्या माहिती वरून पोलीस घटनास्थळी गेले असता ४ गोवंश निर्दयीपणे बांधलेले दिसताच पोलिसांना पाहून आरोपी पसार झाला तर दुसरी कारवाई शहर पोलिसांना मिळालेला गुप्त माहितीवरुन ठाणेदार अजित जाधव, उपनिरीक्षक आशीष शिंदे, अमंलदार सुरेश पांडे, नंदकिशोर टिकार, महीला पोलिस आलिषा कांबळे, पो. कॉ. ज्ञानेश्वर राणे, नामदेव आडे, सचिन दुबे, यांनी मिळालेल्या माहिती वरुन ५२ गेट जवळ धाड टाकली असता निर्दयीपणे कत्तलीसाठी बांधण्यात आलेले दोन गोवांश अंदाजे किमत ९० हजारचे आरोपी शेख यासीन शेख हूनुर कुरेशी वय ५२ रा. रोशननगर मुर्तिजापूर यास अटक करुन सदर प्रकरणी पोलीस उपनिरीक्षक व ग्रामीण पोलीस यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन आरोपी विरूध्द दोन्ही पोलिस ठाण्यात कलम ५,५(अ),५(ब),महा९,९(अ) महा (अ) महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम नुसार गुन्हा दाखल करून अधिकचा तपास सुरू असून ताब्यात घेण्यात आलेले सहा गोवंश पुंडलीक बाबा गोरक्षण संस्थेच्या स्वाधीन करण्यात आले .

# प्राणघातक हल्ला करणाऱ्या हिवरखेडच्या आरोपीचा जामीन फेटाळला!

■अकोट,दि.४ (प्रतिनिधी): हिवरखेड येथे बेकायदेशीर जमाव जमवून, गुंडगिरी करून एका व्यक्तीवर जीवे मारण्याच्या उद्देशाने प्राणघातक हल्ला करणारा आरोपी फाजीलबेग अकीलबेग (३०) याचा जमानत अर्ज अकोट येथील अतिरिक्त जिल्हा व सत्र तसेच विशेष न्यायाधीश बी. एम. पाटील यांनी फेटाळून लावला आहे. गुन्हेगारी प्रवृत्तीचा आरोपी फाजीलबेग अकीलबेग रा. हिवरखेड याने रोहित कराळे यांच्या लेआउट प्लॉटमध्ये जाऊन त्यांच्या कामावरील मजूर रईस याला इतर ८ आरोपींसोबत संगनमत करून जबर मारहाण केली. तसेच जीवे मारण्याच्या उद्देशाने चाकूने वार केला होता. या प्रकरणी हिवरखेड पोलिसांनी त्याच्याविरूध्द विविध कलमान्वये गुन्हा दाखल केलेला आहे.

उपरोक्त आरोपी २२ डिसेंबर २०२४ पासून अकोला कारागृहात बंदीस्त आहे. तो गुन्हा दाखल झाल्यापासून ४ महिने फरार राहिल्यानंतर हिवरखेड पोलिस स्टेशनला स्वतः हून शरण आला होता. पोलिसांनी त्याला अटक करून पोलिस कोठडी घेतली होती. दरम्यान फाजीलबेग याने न्यायालयाकडे जमानत मिळण्यासाठी अर्ज केला. या प्रकरणात सरकारतर्फे सरकारी वकील अजित देशमुख यांनी युक्तिवाद करीत जमानत अर्जाला विरोध केला. दोन्ही पक्षाच्या युक्तिवादानंतर न्यायालयाने फाजीलबेग याचा जमानत मिळण्यासाठी केलेला अर्ज फेटाळून लावला. सरकार पक्षाला ॲड. अब्दुल जुनेद यांनी सहकार्य केले.

# अमली पदार्थ प्रकरणी आठव्या आरोपीस अटक



■अकोला,दि.४ (प्रतिनिधी): स्थानिक गुन्हे शाखा अकोला ने दिनांक २४/१२/२०२४ रोजी पो.स्टे. बार्शिटाकळी अकोला हद्दीत गुप्त बातमीदाराच्या बातमी वरून ॲक्ट अन्वये कारवाई करून यातील मुख्य आरोपी नामे आदिल मोहम्मद शमीम अन्सार वय ३६ वर्ष रा. वसई मुबई अधिक ०३ आरोपींन जवळुन एकुण ५ किलो ५४८ ग्रॅम अमली पदार्थ कि.अं. १,३८,७०,०००/ रूचा व ईतर साहित्य असा एकुण २, ३८,७०,०००/ रु चा मुद्देमाल जप्त करून ताब्यात घेवुन पो.स्टे. बार्शिटाकळी अकोला येथे अप क्र. ५३२ /२०२४ कलम २२ (सी),८(सी), २५, २९ ॲक्ट अन्वये दाखल करण्यात आला होता. व पुढील तपास स्थानिक गुन्हे शाखा अकोला येथील अधिकारी करित असुन घटनास्थळावरून ०५ आरोपीतांना अटक करण्यात केले होते ते पाचही आरोपी अदयाप पावेतो न्यायालयीन कोठडीत अकोला कारागृहात आहेत.

सदर गुन्हयातील जप्त अंमलीपदार्थ रासायनिक विश्लेषणासाठी मा. न्याय वैज्ञानिक प्रयोग शाळा अमरावती येथे दाखल केला असता तो अंमलीपदार्थ हे मेफेड्रॉन ड्रग (चऊ) असल्याचे अहवालात नमुद करण्यात आले आहे.आज दिनांक ०४/०१/२०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखा अकोला चे पोलीस निरिक्षक श्री. शंकर शेळके यांना गुप्त बातमीदारा मार्फत माहिती मिळाली कि, नमुद गुन्हयातील फरार आरोपी नामे इमरान खान असलम खान वय ४२ वर्ष, रा. सुरत हा शेगाव येथे येत असल्याची माहिती मिळाल्यावरून पो. नि. शंकर शेळके हे पथकासह रवाना होवुन वर नमुद आरोपीस शेगाव येथुन ताब्यात घेवुन त्यास अटक करण्यात आली असुन त्याचे कडुन अधिक तपास सुरू आहे.

सदरची कार्यवाही मा. पोलीस अधीक्षक श्री. बच्चन सिंह सा, मा. अपर पोलीस अधिक्षक, अभय डोंगरे सा, यांचे मार्गदर्शना खाली पो. नि. शंकर शेळके, स.पो.नि. विजय चव्हाण, पोउपनि गोपाल जाधव, पो.उप.नि. माजीद पठाण स्थानिक गुन्हे शाखा, अकोला तसेच स्थानिक गुन्हे शाखा अकोला येथील पोलीस अमंलदार सुलतान पठाण, खुशाल नेमाडे, वसिमोद्दीन, प्रविण कश्यप, स्वप्निल खेडकर, धिरज वानखडे, स्वप्निल चौधरी, मोहम्मद आमीर यांनी पार पाडली.

## थोडक्यात

### आरटीई: ११० शाळेत १ हजार १२० जागांची नोंदणी

**अकोला :** शिक्षणाचा अधिकार कायदा २००९ नुसार, खासगी विनाअनुदानित शाळांमध्ये आर्थिकदृष्ट्या दुर्बल व वंचित घटकातील बालकांच्या प्रवेशासाठी २५ टक्के जागा राखीव ठेवण्यात येतात. यंदाचे आरटीई प्रवेशाला सुरुवात झाली असून १८ डिसेंबरपासून शाळांच्या नोंदणीचा सुरुवात झाली आहे. आतापर्यंत जिल्ह्यातून ११० शाळांनी आरटीईसाठी नोंदणी केली आहे. त्यानुसार जिल्ह्यात ११२० जागा प्रवेशासाठी आहेत. उपलब्ध झाल्या जानेवारी महिन्यात विद्यार्थी नोंदणीला सुरुवात होईल.

### हैदराबाद-जयपूर, काचीगुडा-बिकानेर गाडीला मुदतवाढ



**अकोला :** प्रवाशांची मागणी लक्षात घेवून दक्षिण मध्य रेल्वेने हैदराबाद- जयपूर-हैदराबाद आणि काचीगुडा - बिकानेर- काचीगुडा दोन्ही नांदेड मार्गे गाड्यांना पुढील आदेशापर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. रेल्वे प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार गाडी क्रमांक ०७०२० हैदराबाद - जयपूर विशेष गाडीस ३ जानेवारी पुढील २०२५ पासून आदेशापर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. ही गाडी हैदराबाद येथून ३ जानेवारीपासून दर शुक्रवारी रात्री १९.५० वाजता सुटेल आणि सिकंदराबाद, निझामाबाद, मुदखेड, नांदेड, पूर्णा, बसमत, हिंगोली, वाशीम, अकोला, खांडवा, उज्जैन, अजमेर मार्गे जयपूर येथे रविवारी सकाळी ०५.२५ वाजता पोहोचेल. परतीच्या प्रवासात गाडी क्रमांक ०७०१९ जयपूर-हैदराबाद गाडी जयपूर येथून दर रविवारी दुपारी १५.३० वाजता सुटेल आणि आलेल्या मार्गानेच हैदराबाद येथे मंगळवारी सकाळी ५ वाजता पोहोचेल.

### वीज बिल दरवाढीने नागरिक त्रस्त

**अकोला:** महागाईच्या काळात प्रत्येक वस्तूंचे दर प्रचंड वाढले आहेत.आता त्यातच क्षमतेपेक्षा जास्त वीज बिल आकारले जात असल्याने विज बिलांचा भार सामान्य नागरिकांना सोसावा लागत आहे. वाढीव वीज बिल भरणे म्हणजे सामान्य नागरिकांचे बजेट पुरते कोलमडले आहे. सर्वसामान्यांनी उदरनिवार्ह करावा की वीज बिल भरावे. असा प्रश्न सामान्यांकडून उपस्थित केला जात आहे.

# अमरावती विद्यापीठ-शिवाजी महाविद्यालयाचे संयुक्त आयोजन
# स्त्रियांकरिता संविधानातील तरतुदी महत्त्वाच्या : डॉ. वर्षा चिखले

■अकोला,दि.४ (प्रतिनिधी): डॉ बाबासाहेब आंबेडकर अभ्यास केंद्र, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती, विशाखा समिती श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय अकोला यांच्या संयुक्त विद्यमाने क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त विद्यापीठस्तरीय जिल्हानिहाय महिला सक्षमीकरण कार्यशाळा घेण्यात आली. अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ मिलिंद बारहाते व डॉ बाबासाहेब आंबेडकर अभ्यास केंद्राचे समन्वयक डॉ. संतोष बनसोड यांच्या मार्गदर्शनाखाली सदर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ रामेश्वर भिसे तर प्रमुख वक्ते म्हणून शिवाजी महाविद्यालय अमरावती मराठी



विभाग प्रमुख डॉ वर्षा चिखले, प्रमुख पाहुणे म्हणून शिक्षणाधिकारी डॉ सुचेता पाटेकर, प्रमुख उपस्थिती शाळा समितीचे निमंत्रित सदस्य प्राध्यापक विलास हरणे सिन्हा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ किरण खंडारे, कार्यशाळेचे समन्वयक डॉ. संजय तिडके, विशाखा समितीचे समन्वयक प्रा. श्रद्धा पाटील उपस्थित होते. कार्यक्रमांचे प्रमुख वक्ते प्रा डॉ वर्षा चिखले यांनी यांनी भारतीय संविधानात स्त्रियांकरिता असलेल्या तरतुदी व त्यांची प्रासंगिकता याबद्दल सविस्तर मार्गदर्शन केले. प्रमुख शिक्षणाधिकारी सुचिता पाटेकर यांनी विद्यार्थिनींनी जास्तीत जास्त महापुरुषांचे चरित्र वाचावे व ते आत्मसात करावे असे असे प्रतिपादन केले. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. रामेश्वर भिसे यांनी मुलींनी वेळेस सावधान व्हावे व विद्यापीठाने कार्यशाळेचे आयोजनाची संधी उपलब्ध करून दिल्याबद्दल विद्यापीठाचे आभार व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. श्रद्धा पाटील, संचालन प्राजक्ता ठाकरे यांनी केले.

# प्रवाशांची मेमू रेल्वेला प्रथम पसंती



■अकोला,दि.४ (प्रतिनिधी): रेल्वेने वाशिम- अकोला या रेल्वे मार्गावर मेमू रेल्वेची सुविधा प्रवाशांना करून देण्यात आली आहे. त्यामूळे नियमतीपणे या मार्गाने प्रवास करणाऱ्या प्रवाशांना सोयीचे झाले आहे. इतर वाहतूकीचा खर्च अधिक असल्याने अनेक रेल्वे प्रवाशी मेमू रेल्वेला अधिक पसंती देत असून ही गाडी प्रवाशांनी गजबजलेली राहत आहे. बडनेरा - नाशिक मार्गावर असलेल्या 'मेमू' गाडीलादेखील प्रवाशांची मोठी मागणी असल्याचे चित्र आहे.

# भारतीय समाज क्रांतीची जननी सावित्रीबाई फुले:सुहासिनी धोत्रे




■अकोला,दि.४ (प्रतिनिधी): सावित्रीमाई फुले यांच्या नावात फुले येत असलं तरी कायम तिने काटे सोसले, दगड गोट्यांचा मार सहन करत शिव्या खाल्या तरी सुद्धा ती स्त्री शिक्षणाच्या लढ्यापासून, महिलांच्या अधिकार प्राप्तीच्या लढ्यापसून सामाज सुधारणांसाठीच्या संघर्षीपासून तसूभरही मागे हटली नाही. अशा सावित्रीमाई फुलेंची अर्थात साउंची आपण जयंती साजरी करत आहोत. त्यांना अभिप्रेत कार्य सामाजिक समरसतेचा भारतीय जनता पक्ष पुढे नेत असून भाजपाचे सदस्य नोंदणी अभियानामध्ये मातृशक्तीचा महत्त्वपूर्ण योगदान तसेच महाराष्ट्रात महायुतीला विजयी करण्यामध्ये लाडकी बहीण यांची ताकद असल्यामुळे आगामी महानगरपालिका जिल्हा परिषद महानगरपालिका पंचायत समिती ग्रामपंचायत निवडणुकीमध्ये भारतीय जनता पक्ष आणि मातृ शक्ती प्रखरपणे उभी राहण्यासाठी सदस्य नोंदणी अभियानाला यशस्वी करा असे आवाहन कमल सखी मंचाच्या नेत्या सुहासिनी धोत्रे यांनी केले. प्रभाग दोन अकोट फाईल इथे अनिता चौधरी व उत्तर मंडल महिला आघाडीच्या पुढाकाराने सदस्य नोंदणी अभियानाचा व सावित्रीबाई फुले जयंती निमित्त आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या.

# मांगीलालजी शर्मा विद्यालयात सावित्रीच्या लेकींचा जागर



**अकोला :** स्थानिक मांगीलाल शर्माविद्यालयात ३ जानेवारी रोजी सावित्रीबाई फुले यांची जयंती वर्ग ६ च्या विद्यार्थिनींनी स्त्री प्रबोधनात्मक कार्यक्रम घेऊन साजरी करण्यात आली. जोतीबा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला हारार्पण करून त्यांना अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य भानुदास यन्नावार तर प्रमुख पाहुणे जेष्ठ शिक्षक धर्मेंद्र श्रीवास्तव, पूर्व माध्यमिक विभागाचे प्रभारी मुख्याध्यापक गोपाल महादेव मोरे, माध्यमिक विभागाच्या प्रभारी मुख्याध्यापिका वंदना हरिहर देशमुख उपस्थित होत्या. यावेळी भक्ती वक्टे, आनंदी इंदोरे, इशिका शहाणे, पुर्वी खंडेराव, श्रावणीवर्धावे, या मुलींनी सावित्रीबाई फुले यांनी केलेल्या कार्यावर उत्तम भाषणे देवून त्याच्याकार्याला उजाळा दिला. तर ऐश्वर्या साळुंखे या विद्यार्थीनीने ' मी सावित्री बोलते' हे एकपात्री नाटक उत्कृष्ट अभिनय सादर करून उपस्थितांची दाद मिळविली.

# दिव्यांग सोशल फाउंडेशन तर्फे जागतिक ब्रेल दिनी साहित्य वितरण संपन्न

■अकोला,दि.४ (प्रतिनिधी): स्थानिक दिव्यांग सोशल फाउंडेशन अकोला व श्री शिवाजी महाविद्यालय अकोला च्या संयुक्त विद्यमाने ४ जानेवारी २०२५ रोजी जागतिक ब्रेल दिन संपन्न झाला. वसंत सभागृह शिवाजी महाविद्यालय अकोला येथे झालेल्या या कार्यक्रमात दिव्यांग बांधवांना पांढरी काठी, ब्रेल बुक्स व दिव्यांग महिलांना साडीचे वितरण करण्यात आले. संस्थापक अध्यक्ष डॉ.विशाल कोरडे यांच्या संकल्पनेतून साकार झालेल्या कार्यक्रमात ब्रेल लिपीचे जनक लुईस ब्रेल यांचा जयंती उत्सव, दिव्यांगांना साहित्याचे वितरण व दिव्यांग सोशल फाउंडेशन अकोला चा सदस्य स्व.रोहित सूर्यवंशी याला भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री शिवाजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.



रामेश्वर भिसे, प्रमुख अतिथी म्हणून माजी प्राचार्य डॉ.सुभाष भडांगे,श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती चे आजीवन सदस्य रामेश्वर वाकडे,दादाराव सोनोने, डॉ.नानासाहेब वानखेडे, संस्थेचे सहसचिव डॉ.संजय तिडके, डॉ.विशाल कोरडे आणि श्रीमती रश्मी सुर्यवंशी उपस्थित होते.कार्यक्रमा च्या प्रास्ताविकात डॉ .विशाल कोरडे यांनी ब्रेल लिपीचे जनक लुईस ब्रेल यांच्या विषयी महत्त्वपूर्ण माहिती दिली.दिव्यांग सोशल फाउंडेशन अकोला या संस्थेने समाजात केलेल्या सामाजिक कार्याचा गोषवारा दिला.समाज कल्याण विभागाद्वारा संस्थेला आदर्श संस्था पुरस्कार प्राप्त झाला असून भारतासोबतच सात देशात संस्थेचे कार्य अव्याहत सुरू असल्याची माहिती दिली.

डॉ सुभाष भडांगे यांनी दिव्यांग सोशल फाउंडेशन अकोला च्या सामाजिक उपक्रमा चे कौतुक केले. श्री दादाराव सोनोने यांनी दिव्यांग बांधवांसाठी प्रेरणादायक उपक्रमात समाजाने सहभाग नोंदवावा व दिव्यांग सोशल फाउंडेशन चे सदस्य व्हावे असे आव्हान केले. अध्यक्षीय भाषणात डॉ.रामेश्वर भिसे यांनी दिव्यांग सोशल फाउंडेशन अकोला व श्री शिवाजी महाविद्यालय अकोला च्या माध्यमाने समाजात दिव्यांगांच्या शिक्षणासाठी डॉ.कोरडे करीत असलेल्या कार्याबद्दल यांचे कौतुक केले.सदर कार्यक्रमात दिव्यांग विद्यार्थी मोहम्मद नाझील, कुणाल यादव व अस्मिता मिश्रा यांनी मनोगत व आभार व्यक्त केले.संस्थे तर्फे ४ वर्षीय अक्षरा अलोट मुकबधीर बालिकेचे पालकत्व स्वीकारले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन अनामिका देशपांडे यांनी तर आभार प्रदर्शन डॉ. विशाल कोरडे यांनी केले.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी गणेश सोळंके, तन्वी दळवे, डॉ.सोपान वतारे,नयना लवंगे,दिपमाला दोरकर व विजय कोरडे यांनी सहकार्य केले

# अकोला जिल्हा पत्रकार संघाचा उपक्रम
# ६ जानेवारीला पत्रकार दिन सोहळा आयोजीत

■अकोला,दि.४ (प्रतिनिधी): आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या स्मृतीत राज्यभर साजरा होणारा पत्रकार दिन सोहळा दरवर्षी प्रमाणे यावर्षी देखील सोमवार दिनांक ६जानेवारी २०२५रोजी स्थनिक निमवाडी परिसरातील पत्रकार भवनातील स्व. पन्नालाल शर्मा सभागृहात दुपारी ३ वाजता आयोजीत आहे.या सोहळ्याला प्रमुख अतिथी म्हणून प्रख्यात शिक्षण तज्ञ, प्रभात शिक्षण संस्थेचे संचालक डॉ. गजानन नारे, जिल्हा माहिती व जनसंपर्क अधिकारी श्री हर्षवर्धन पवार, मराठी पत्रकार परिषदेचे माजी अध्यक्ष श्री. सिद्धार्थ शर्मा हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित रहाणार आहेत.आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांनी सन १८३२ मध्ये ६ जानेवारीला दर्पण नावाचे मराठी, इंग्रजी वृतपत्र सुरु केले होते.

या वृत्तपत्राच्या नावावरूनच बाळशास्त्री यांना दर्पणकार ही लोक उपाधी मिळाली होती. महाराष्ट्र राज्यात तेंव्हापासून ६ जानेवारी हा दिवस पत्रकार दिन म्हणून साजरा केला जातो व दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या स्मृतीला उजाळा दिला जातो. मराठी पत्रकार परिषद मुंबई शी गेल्या ५० वर्षापासून संलग्न असलेल्या अकोला जिल्हा पत्रकार संघा तर्फे दरवर्षी



हा सोहळा मान्यवर लोकांच्या उपस्थितीत साजरा होतो. सोमवार दिनांक ६ जानेवारी २०२५ रोजी दुपारी ३ वाजता हा सोहळा सुरु होईल.

बुलडाणा जिल्ह्यातील खामगावाचे जेष्ठ पत्रकार, संपादक, स्तंभलेखक श्री राजेशजी राजोरे यांनी महाराष्ट्रातील उत्कृष्ठ समाजाभीमुख कार्य करणाऱ्या व स्वतःचे पत्रकार भवन असणाऱ्या निवडक १५ जिल्हा पत्रकार संघाना आद्य पत्रकार दर्पनकार बाळशास्त्री जांभेकर यांचे अर्धाकृती पुतळे भेट दिले आहेत.

दर्पणकार बाळशास्त्री यांच्या या पुतळ्याचे कार्यक्रमापूर्वी विधिवत पूजन करण्यात येईल. पत्रकार भवनात आयोजित या सोहळ्याला सर्व पत्रकार बंधू -भगिनींनी उपस्थितीत राहावे असे आवाहन जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष शौकतअली मिरसाहेब, सरचिटणीस प्रमोद लाजूरकर, उपाध्यक्ष गजानन सोमाणी, रामदास वानखडे, चिटणीस विजय शिंदे, प्रदीप काळपांडे, अविनाश राऊत, राजु उखळकर, जयेश जगड तालुका अध्यक्ष दीपक देशपांडे, दिलीप देशमुख, मंगेश लोणकर, प्रल्हाद ढोकणे, अमोल जामोदे, कार्यालयीन सचिव कमल शर्मा, प्रसिद्धी प्रमुख विलास खंडारे, महिला पत्रकार प्रतिनिधी ॲड निलिमा शिंगणे, वंदना शिंगणे, आदींनी केले आहे.

२ वाजता जिल्हा कार्यकारिणीची बैठक पत्रकार दिन सोहळा प्रारंभ होण्यापूर्वी म्हणजे ६ जानेवारीला दुपारी २ वाजता पत्रकार भवनातच जिल्हा पत्रकार संघाच्या कार्यकारी मंडळाची बैठक आयोजीत करण्यात आली आहे. आगामी आमसभा तयारीच्या दृष्टीकोनातून चर्चा करण्यासाठी व इतर महत्वाचे विषयावर निर्णय घेण्यासाठी या बैठकीचे तातडीचे नियोजन करण्यात आले आहे, या बैठकीला अकोला महानगर तसेच जिल्ह्याच्या सर्व ६ तालुक्यातील जिल्हा कार्यकारी मंडळ सदस्यांनी व तालुका अध्यक्ष आणी तालुका सचिवानी उपस्थित राहावे असे आवाहन पत्रकार संघाचे मुख्य मार्गदर्शक सिद्धार्थ शर्मा,जिल्हा अध्यक्ष शौकतअली मिरसाहेब, सरचिटणीस प्रमोद लाजूरकर यांनी केले आहे.

# नेहरू युवा केंद्र,अकोला यांच्या संयुक्त विद्यमानाने मूर्तिजापूर येथे 'तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धा' संपन्न

■मुर्तिजापुर,दि.४ (प्रतिनिधी): युवा कार्यक्रम एव खेल मंत्रालय, भारत सरकार नेहरू युवा केंद्र,अकोला संयुक्त विद्यमानाने अकोला जिल्ह्यातील मूर्तिजापूर येथे 'तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धे चे' आयोजन १ जानेवारी २०२५ रोजी 'तालुका क्रीडा संकुल तहसील कार्यालय' मूर्तिजापूर येथे संपन्न झाले.तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेचे प्रमुख उद्घाटक साहाय्यक पोलीस निरीक्षक (अझख) मा.अनिल पवार, कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. सौ.नूतनताई हरीश पिंपळे, प्रमुख पाहुणे क्रीडा मार्गदर्शक मा. विनोद काळपांडे, तसेच प्रमुख मार्गदर्शक संदीप जामनिक, दिलीप गोसावी,संदीप गावंडे, मुकुंद पैगट, शैलेश देशमुख, महिला सुरक्षा कॉन्स्टेबल मा. अलिशा कांबळे,सीमा ढिसाळे(जिज्ञासा क्लासेस) उपस्थित होते.पवार सर यांनी युवकांना मार्गदर्शन व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या तर



प्रास्ताविक रिंकू भटकर यांनी केले. युवकांच्या क्रीडा गुणांना वाव मिळण्याकरिता तसेच युवकांना क्रीडा स्पर्धेत व्यासपीठ उपलब्ध करण्याकरिता नेहरू युवा केंद्राच्या माध्यमातून या स्पर्धेमध्ये मुलांकरिता सामूहिक खेळ कबड्डी तसेच मुलींकरिता सामूहिक खेळ खो- खो व मुल आणि मुलींकरिता वैयक्तिक खेळ गोळा फेक व १०० मीटर धावणे स्पर्धा घेण्यात आले.युवक कबड्डी स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक दत्तात्रय क्रीडा मंडळ, मंगरूळ कांबे, द्वितीय क्रमांक गाडगेबाबा क्रीडा मंडळ, मूर्तिजापूर, तृतीय क्रमांक गाडगे महाराज क्रीडा मंडळ, कोळसरा, युवती खो-खो मध्ये प्रथम क्रमांक श्री गाडगे महाराज विद्यालय, मूर्तिजापूर, द्वितीय क्रमांक चाणक्य अकॅडमी मुर्तीजापुर युवक गोळा फफेक मध्ये प्रथम क्रमांक रोहन सरदार द्वितीय क्रमांक सेय्यद रोशन तृतीय क्रमांक प्रतीक डोंगरे युवती गोळा फफेक प्रथम क्रमांक कोमल खाडे द्वितीय क्रमांक अनुष्का कुर्मी तृतीय क्रमांक नेहा बोपुलकर १०० मीटर रनिंग युवक प्रथम क्रमांक शत्रुघ्न हेंगड, द्वितीय हर्षल पुनसे, तृतीय क्रमांक संकेत पवार १०० मीटर रनिंग युवती प्रथम क्रमांक मैथली सरोदे, द्वितीय क्रमांक मिळविला.

# बाहुबली अन् आका




इंडिया कॉलिंग
डॉ. सुकृत खांडेकर
sukritforyou@gmail.com

**गेल्या वर्षी २०२४ मध्ये भगवानबाबा गडावर झालेल्या दसरा मेळाव्यात पंकजा मुंडे या मंचावर बसलेल्या नेत्यांची समोर जमलेल्या हजारोंच्या सभेला मोठ्या उत्साहाने ओळख करून देत होत्या. तेव्हा गर्दीतून वाल्मीक अण्णांच्या नावाने ओरडा झाला. तेव्हा पंकजा म्हणाल्या, वाल्मीकशिवाय धनंजय यांचे पानही हालत नाही... पंकजा यांच्या वक्तव्यावर गर्दीने मोठा प्रतिसाद दिला व पंकजा म्हणतात ते खरे आहे, यावर शिक्कामोर्तब झाले. पण या प्रकाराने मंचावर बसलेले धनंजय मुंडे मात्र काहीसे अस्वस्थ झालेले दिसले.**

---

बीडमधील मस्साजोगचे तरुण सरपंच संतोष देशमुख यांचे झालेले अपहरण आणि त्यांच्या झालेल्या निर्घृण हत्याप्रकरणी वाल्मीक कराड यांची नेमकी काय भूमिका आहे हे अजूनही तपासात पुढे आलेले नाही पण भाजपाच्या आमदारांसह इतर बड्या नेत्यांनी केलेल्या आरोपांमुळे संशयाची सुई त्यांच्या दिशेने फिरत आहे.

सरपंच संतोष देशमुखची हत्या झाल्यापासून वाल्मीकवर गेले तीन आठवडे आरोपांच्या फैरी झडत आहेत. बीड जिल्ह्यात वाल्मीक बोले व पोलीस-प्रशासन डोले असे म्हटले जात आहे. धनंजय मुंडे यांचा राजकीय वरदहस्त असल्यामुळेच वाल्मीक हा शक्तिशाली बाहुबली बनलाय असे आरोप उघडपणे होत आहेत. सरपंच संतोष देशमुख याच्या खुनाशी आमचा काही संबंध नाही, जो दोषी असेल त्याला फाशीची शिक्षा द्यावी, असे धनंजय मुंडे व वाल्मीक कराड यांनी म्हटले आहे.

जर संबंध नाहीत तर वाल्मीक २२ दिवस पोलिसांच्या हाती का लागत नव्हता. नागपूर, उज्जैन, गोवा, अक्कलकोट, पुणे असा फिरत का होता? विशेष म्हणजे सरपंचाच्या हत्येनंतर वारंवार वाल्मीकचा उल्लेख होत असताना व त्याच्यावर खंडणीचा गुन्हा दाखल झाला असताना तो पोलिसांना गुंगारा का देत राहिला?

गोपीनाथ मुंडे यांच्या मृत्यूनंतर त्यांचा पुतण्या धनंजय मुंडे यांचे बीड जिल्ह्यात प्रस्थ वाढले. गोपीनाथ मुंडे यांची कन्या पंकजा व प्रीतम या दोन्ही बहिणी त्यांच्या खऱ्या राजकीय वारस. गोपीनाथ मुंडेंनी पंकजालाच राजकारणात पुढे केले. पण धनंजय मुंडेंच्या राजकीय ताकदीपुढे पंकजा यांना आपल्या अस्तित्वासाठी सतत संघर्ष करावा लागला.

गोपीनाथ मुंडेंच्या मृत्यूनंतर धनंजय मुंडेंनी जिल्ह्यात आपले साम्राज्य उभे केले. राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये गेल्यावर शरद पवारांनी त्यांना भरपूर संधी दिली. मिळालेल्या सत्तेतून आपली फौज, आपले नेटवर्क निर्माण केले. त्यातूनच धनंजय मुंडे यांचा राजकीय वरदहस्त लाभलेल्या वाल्मीक कराड हा शक्तिशाली बनला.

धनंजय मुंडे आणि वाल्मीक कराड म्हणजे बीड जिल्ह्याचे नंबर १ व नंबर २ अशी ओळख निर्माण झाली. छोटा आका आता सीआयडीच्या ताब्यात आहे. धनंजय मुंडेंनी मंत्रीपदाचा राजीनामा द्यावा अशी मागणी केली जात आहे. मी कशासाठी राजीनामा देऊ, माझा काहीच संबंध नाही, असे धनंजय मुंडे यांनी स्पष्ट केले आहे.

पोलिसांच्या व सीआयडीच्या रडारवर असताना बावीस दिवसांनी वाल्मीक कराड आलिशान स्कॉर्पिओमधून पुण्याच्या पाषाण येथील सीआयडी ऑफिसमध्ये शरण आला व त्या अगोदर त्याने एक व्हीडिओ वायरल करून त्याची भूमिका जनतेपुढे मांडली.

व्हीडिओत तो म्हणतो, मला अटकपूर्व जामीन घेण्याचा अधिकार असताना, मी पुणे सीआयडी ऑफिसमध्ये शरण येतो आहे. सरपंचाच्या हत्येमध्ये आपले नाव राजकीय द्वेषापोटी गुंतवले आहे... पोलिसांना शरण येतानाही त्याची मस्ती कायम होती की, त्याच्या रणनितीचा भाग होता? सीआयडी ऑफिसमध्ये शरण येणे हा त्याचा स्टंट होता की, कोणाच्या सल्ल्यानुसार तो तसा वागला?

वाल्मीकचे नाव तीन आठवडे मीडियातून रोज ठळकपणे प्रकाशात असताना तो व्हीडिओ व्हायरल करून शरण येतो ही पोलिसांना नामुष्की नाही का? वाल्मीक आलिशान वातानुकूलित मोटारीतून पोलिसांना शरण आला हे पोलिसांचे अपयश म्हटले पाहिजे. पोलिसांना शरण यायचे ते कुठे व कोणत्या वेळेला याचा निर्णयही त्याने घेतला.

त्याला व अन्य फरारी आरोपींना अटक व्हावी यासाठी २८ डिसेंबरला बीडमध्ये सर्वपक्षीय विराट मोर्चा निघाला. दोन हजार ग्रामपंचायतींचे कामकाज तीन दिवस बंद राहिले. नागपूरला विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाच्या काळात सरपंचांच्या निर्घृण हत्येवरून आमदार सुरेश धस, संदीप क्षीरसागर यांनी बीड जिल्ह्यातील दहशतवादाचे सारे वास्तव प्रखर शब्दांत मांडले. तीन वेळा जनतेतून निवडून आलेल्या सरपंचाला हल्लेखोर उचलून नेतात, मोटारीतून अपहरण करतात नि त्याला लाठ्या-काठ्या, कोयता आणि धारदार शस्त्रांचे वार करून त्याच्या शरीराची चाळण करतात, हे सर्व चित्रपटातील कथानकालाही लाजवणारे आहे.

सरपंचांची क्रूर हत्या करणाऱ्या टोळीचा म्होरक्या कोण आहे? दहशत, खंडणी, हत्या करणाऱ्या टोळीमागे कुणाचे पाठबळ आहे? बीड जिल्ह्यातील पोलीस प्रशासन अशा बाहुबलीपुढे हतबल आहे काय? वर्षानुवर्षे दहशत आहे. मग सरपंचांची हत्या झाल्यावर लोकक्षोभ कसा प्रकटला?

कोणाचेही सरकार असो, गृह खाते बीड जिल्ह्यातील दहशतवादाविषयी अनभिज्ञ होते की तिथल्या आका नि बाहुबलीच्या गुंडगिरी व हुल्लडबाजीकडे दुर्लक्ष केले जात होते? केवळ खंडणीचा गुन्हा पुरेसा नाही, तर खुनाचा गुन्हा दाखल करा, कट-कारस्थान आहे का याची चौकशी करा, वाल्मीक दोषी नव्हता, तर फरार का झाला हे शोधा अशा मागण्या विधिमंडळात झाल्या.

संतोष देशमुखच्या खुन्यांना अटक करताना त्यांच्या मास्टर माईंडलाही जेलमध्ये टाका अशी सातत्याने मागणी आमदार-खासदारांकडून झाली. संतोष देशमुखांच्या मारेकऱ्यांना कोण वाचवत आहे हे सुद्धा समजले पाहिजे. सरपंचाची हत्या ९ डिसेंबरला झाली, आरोपी सापडत नाहीत म्हणून प्रक्षोभ वाढला.

२७ डिसेंबरला रेणापूरला आक्रोश मोर्चा निघाला, २८ डिसेंबरला बीडमध्ये लाखोंच्या संख्येने सर्वपक्षीय मूक मोर्चा निघाला. दोषींना कठोर शिक्षा द्यावी यासाठी खासदार बजरंग सोनवणे, आमदार सुरेश धस, आमदार संदीप क्षीरसागर, छ. संभाजी राजे, मराठा आंदोलकांचे नेते मनोज जरांगे-पाटील, जितेंद्र आव्हाड, नरेंद्र पाटील, नमिता मुंदडा आदींनी सरकारकडे तगादा लावला आहे.

परळीच्या औष्णिक ऊर्जा प्रकल्पातून निघणाऱ्या राखेची अवैध वाहतूक हा मुद्दा यानिमित्ताने ऐरणीवर आला आहे. काही शेकडो कोटींचा हा व्यवहार आहे. खरं तर पंधरा-सोळा कंपन्यांना राखेची वाहतूक करण्याची परवानगी आहे, पण राख माफियांच्या रांगेत ते कोणी घुसू शकत नाहीत, एवढी मोठी दहशत आहे.

वाल्मीक हा मूळचा परळी तालुक्यातील पांगरी गावचा. दहावीनंतर तो परळीत आला. जत्रेत सिनेमा दाखवायचा. गोपीनाथ मुंडे यांच्याकडे घरकाम करायचा. त्यांच्या मुलींना शाळेत सोडायचा. काका-पुतण्या वेगळे झाल्यावर त्याने धनंजय मुंडेंशी जवळीक केली. परळी नगर परिषदेचा सदस्य, उपनगराध्यक्ष, गटनेता झाला. पुढे धनंजय मुंडेंचा विश्वासू माणूस बनला. धनंजय मुंडेंच्या राजकीय व्यवस्थापनाची जबाबदारी तोच संभाळत असे.

विधिमंडळात संतोष देशमुखच्या हत्येवरून आवाज उठवला गेल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी फरारी आरोपींच्या शोधासाठी सीआयडीकडे तपास सोपवला. अगोदर पोलीस, मग सीआयडी, आता एसआयटी पथक कार्यरत झाले. तरीही आरोपी सापडत नाहीत व वाल्मीक नाट्यमय शरण येतो हे सर्व गूढ आहे.

वाल्मीक हा जिल्ह्याचा प्रति पालकमंत्री अशा थाटात वागत होता का?बीड जिल्ह्यातील धनंजय मुंडेंचा राईट हॅण्ड असलेल्या वाल्मीककडे जणू जिल्ह्याचे सारे अधिकार आहेत, असा सर्वत्र समज होता. जिल्ह्यात किती जणांवर बोगस गुन्हे दाखल झाले, कोणी कोणाला सुपारी दिली, किती हल्लेखोरांना पकडले व कितींना शिक्षा झाली, जिकडे तिकडे मर्जीतली माणसे असल्यावर निःपक्ष तपास तरी कसा होणार?

सन २०१९ मध्ये धनंजय यांनी पंकजांचा पराभव केला. सन २०२४ मध्ये भाजपा व राष्ट्रवादी महायुतीत असल्याने लोकसभा निवडणुकीत धनजंय यांनी पंकजाचा, तर विधानसभा निवडणुकीत पंकजा यांना धनंजय यांचा प्रचार करावा लागला. बीडच्या हत्या व दहशतवादी घटनांविषयी अंजली दमानीया व सुरेश धस रोज नवनवीन माहिती व पुरावे उघड करीत आहेत. बाहुबली समजणारे हातात रिव्हॉल्वर घेऊन आकाशात गोळ्या झाडताना व्हीडिओ सोशल मीडियावर पोस्ट झाले आहेत. सर्वपक्षीय बड्या नेत्यांबरोबर वाल्मिकचे फोटोही व्हायरल झाले आहेत. एकेकाळी धनंजय मुंडेंचा जीव तोडून प्रचार करणारे सुरेश धस आता जीव तोडून त्यांच्या टोळीवर आरोपांचा भडीमार करीत आहेत. सरपंचांच्या हत्येनंतर बीडची रांचीशी तुलना सुरू झाली आहे. कमरेला पिस्तूल, छेडछाड व दादागिरी, अशा उडाणटप्पूंच्या टोळ्या खुलेआम भटकत असतील, तर सामान्य जनता, व्यापारी, व्यावसायिक, सुशिक्षित जनतेला सुरक्षित कसे वाटणार? आरोपींची संपत्ती जप्त करा, बँक खाती गोठवा, खटला फास्ट ट्रॅक कोर्टात चालवा, आरोपींना मोक्का लावा अशा मागण्या केल्या जात आहेत.

जिल्ह्यातील दहशतवाद रोखण्यासाठी व बाहुबली, माफिया व आकाला लगाम घालण्यासाठी स्वतः मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस किंवा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी जिल्ह्याचे पालकमंत्रीपद घ्यावे अशी मागणी होत आहे. सरपंच संतोष देशमुखांची लेक म्हणते, काल ढगाआड गेलेला सूर्य आज दिसतोय, पण माझे वडील कधीच दिसणार नाहीत...

गोपीनाथ मुंडे विरोधी पक्षात असताना राजकारणातील गुन्हेगारीच्या विरोधात संघर्ष करीत होते. आज त्यांचा बीड जल्हा दहशतवाद, खंडणी, खून, गुन्हेगारी आशा घटनांनी केंद्रस्थानी आहे, हे दुर्दैव आहे. ●●●●●●

# जयभीमचे प्रवर्तक बाबू हरदास एल एन

**जयभीम जयघोषाचे प्रवर्तक, डिप्रेस क्लास फेडरेशनचे पहिले महासचिव, स्वतंत्र मजूर पक्षाचे प्रांताध्यक्ष, विदर्भातील समता सैनिक दलाचे संस्थापक, राज्य विधिमंडळातील अस्पृश्यांचे सदस्य, सीपी अँड बेरार मधील लोकप्रिय नेते बाबासाहेब आंबेडकरांचे सहकारी कामठी निवासी बाबू हरदास एल एन यांची ६ जानेवारी रोजी १२१ वी जयंती आहे, त्यांनी दिलेल्या जयभीम च्या घोषवाक्याला जगाने ब्रँड म्हणून स्वीकारले आहे. त्या निमित्ताने जयभीमच्या जनकाच्या कार्याचा धावता आढावा.**

---



उत्तम शेवडे
संचालक, मान्यवर कांशीराम रिसर्च सेंटर नागपूर.
मीडिया प्रभारी महाराष्ट्र प्रदेश बसपा
९४२१८००२१९

बाबू हरदास एल एन यांचे नाव हरदास लक्ष्मण नगरारे ६ जानेवारी १९०४ ला कामठी, नागपूर येथे त्यांचा जन्म. पटवर्धन हायस्कूल मध्ये मॅट्रिक पर्यंतचे शिक्षण. १६ व्या वर्षी विवाह. आर्थिक गरिबीमुळे रोज मजुरी केली. वयाच्या अठराव्या वर्षी १९२१ ला महारट्टा नावाचे साप्ताहिक सुरू करून त्यांनी अस्पृश्य समाजातील अन्याय अत्याचार व वाईट चाली रीतीवर प्रकाश टाकला.

स्थानिक तरुणांच्या मदतीने समाज सेवा पथक स्थापून अस्पृश्यांसाठी कार्य सुरू केले. वयाच्या १९ व्या वर्षी १९२३ ला कोल्हापूरचे राजे छत्रपती शाहू महाराज यांची नागपूर मुक्कामी भेट घेऊन अस्पृश्यांच्या समस्या विषयी निवेदन केले. तत्कालीन वराड मध्यप्रांत चे गव्हर्नर जनरल यांचा सत्कार करून अस्पृश्यांना स्थानिक स्वराज्य संस्थेत प्रतिनिधित्वाची मागणी केली. नागपूर जिल्ह्यातील त्यावेळी मंडई भरविल्या जात, ज्यामध्ये नाच, गाणे, तमाशा होत असत, त्यातून अस्पृश्य महिलांच्या विटंबना होत होत्या, अशा वेळी मंडई महात्मे नावाचे पुस्तक लिहून वाईट शालीरीतीवर प्रकाश टाकला.

समाजाच्या शैक्षणिक उन्नती करता त्यांनी रात्रीच्या शाळा काढल्या, युवकांमध्ये चेतना निर्माण करण्यासाठी वीर बालक नावाचे स्वतः नाटक लिहून त्याचे अनेक प्रयोग केले. कामठीतील अस्पृश्यांसाठी स्वतः मंदिरे बांधली व प्रस्थापित सवर्णांना आव्हान दिले. रामटेक च्या टेकडीवरील मंदिरात अस्पृश्यांना प्रवेश मिळत नव्हता व अंबाला तलावात आंघोळीची मनाई होती, अशावेळी किसन फागोजी बनसोडे यांच्या सहकार्याने त्या परिसरात स्वतंत्र विहीर व मंदिर सुद्धा बांधले होते. १९३० च्या नाशिक काळाराम मंदिर सत्याग्रहात कामठी येथून मोठ्या प्रमाणात टीम सहभागी झाली होती, त्या सर्वांचे हरदास यांनी स्वागत केले होते.

१९३० च्या दरम्यान हरदास यांनी रेवाराम कवाडे यांच्या नेतृत्वात समता सैनिक दलाच्या शाखा उभारण्याचे काम केले. तत्कालीन नागपूरचे पोलीस अधीक्षक आगाखान यांना एसएसडी च्या माध्यमातून तरुणांच्या फौजेने मानवंदना दिली, परिणामतः त्यातील ७० तरुणांची पोलीस विभागात भरती मिळवली.

### डिप्रेस क्लासेस फेडरेशन

भारताच्या स्वातंत्र्याच्या वाटाघाटी सुरू असताना ब्रिटिशांनी भारतीय पुढाऱ्यांना १२ नोव्हेंबर १९३० ला गोलमेज परिषदे करता लंडनला निमंत्रित केले होते. बाबासाहेबांनी ८, ९ ऑगस्ट १९३० रोजी शाम (व्यंकटेश) थेटर (चिटणीस पार्क) येथे दोन दिवशीय अधिवेशन बोलावले.

तिथे ऑल इंडिया डिप्रेस्ड क्लास फेडरेशन ची स्थापना करण्यात आली त्याचे अध्यक्ष म्हणून मद्रासचे रावसाहेब मुनीस्वामी व बाबू हरदास यांची सेक्रेटरी म्हणून निवड करण्यात आली. याच अधिवेशनात बाबासाहेबांना अस्पृश्यांचे सर्वमान्य नेते म्हणून सन्मानित करण्यात आले. याच अधिवेशनात अस्पृश्यांना स्वतंत्र मतदार संघ मिळावा असा एकमताने प्रस्ताव पास करण्यात आला.

### अस्पृश्यांचा पुढारी कोण?

५ सप्टेंबर १९३१ ला भरविण्यात आलेल्या दुसऱ्या गोलमेज परिषदेत अस्पृश्यांचा खरा पुढारी कोण? गांधी की आंबेडकर असा काँग्रेसने वाद उभा केला. यामुळे हिंदू पुढाऱ्यात खळबळ माजली असताना अस्पृश्य समाजातील अस्पृश्यांचे खरे नेते बाबासाहेब आंबेडकरच आहेत अशा पद्धतीच्या लंडनला देशभरातून शेकडो तारा पाठवण्यात आल्या.

त्यातील ३२ तारा एकट्या कामठीतून पाठवण्यात आल्या होत्या. त्यामुळे बाबासाहेबांना अस्पृश्यांचे प्रतिनिधी म्हणून इंग्रजांनी मान्यता दिली व स्वतंत्र मतदारसंघ देण्याचे ही जातीय निवाड्याद्वारे मान्य केले. याचे श्रेय एल एन हरदास यांना जाते.

त्यानंतर गांधींनी २१ दिवसाचे उपोषण करून ती मागणी मागे घ्यायला लावली, ज्यामुळे पुणेकरार घडला. २४ सप्टेंबर १९३२ रोजी झालेल्या या करारावर डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर, मुकुंद मलिक, मुनीस्वामी पिल्ले, श्रीनिवासन, स्वामी अच्युतानंद, एम सी राजा आदी नेत्यांच्या सह्या आहेत.

१९९३ ला अकोला येथे दलित परिषद सुरू असताना यांचा एकुलता एक मुलगा मृत पावल्याची बातमी मिळाली असताना, त्यांनी परिषद सोडून जाणे योग्य नसल्याचे सांगून मुलाला परस्पर दफन करून टाकावे अशी माहिती पाठवली. यावरून ते समाजाप्रती व संघटनेप्रति किती प्रामाणिक होते याचा प्रत्यय येतो.

मध्य प्रांतातील छत्तीसगड मधील सतनामी पंथगुरु बाबा मुक्तावनदास यांचे भाऊ आगमनदास यांना राजकीय हेतूने अडकविण्यात आले होते. रायपूर कोर्टाने त्याला फाशी सुनावली होती. बाबूंच्या माध्यमातून बाबासाहेब आंबेडकरांनी २९ एप्रिल १९३७ रोजी नागपूर हायकोर्टात आगमनाची फाशी रद्द केली. त्यामुळे ३० एप्रिल रोजी कामठीच्या बैल बाजार मैदानावर बाबासाहेबांचे वादळवारा व पावसात भाषण झाले. अनेक कार्यकर्ते पळून गेले व पुन्हा बाबासाहेबांना भाषण देण्यास विनंती करू लागले, बाबासाहेबांनी त्यांना खडसावून सांगत मला अशा पळपुट्या कार्यकर्त्यांची गरज नसल्याचे सांगितले.

बाबासाहेब आंबेडकरांनी १३ ऑक्टोबर १९३५ ला येवला मुक्कामी धर्मांतराची घोषणा केल्याने त्यांच्या घोषणेच्या समर्थनार्थ बाबासाहेबांनी ३०, ३१ मे १९३६ रोजी दलित कॉन्फरन्सचे मुंबईत आयोजन केले होते. त्याला स्वतः बाबू हरदास यांनी हजेरी लावली होती. त्यानंतर या घोषणेच्या समर्थनार्थ त्यांनी अनेक ठिकाणी जाहीर सभा घेतल्या होत्या.

### स्वतंत्र मजूर पक्ष स्थापन

१५ ऑगस्ट १९३६ रोजी स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना करण्यात आली मुंबईचे व्ही डी प्रधान यांची अध्यक्ष म्हणून, तर वऱ्हाड मध्यप्रांत पक्षाचे नेते म्हणून बाबू एल एन हरदास यांना निवडण्यात आले. दरम्यान प्रांतीय विधिमंडळाच्या १७५ पैकी १५ जागा राखीव होत्या. मध्यप्रांतीय कायदेमंडळात नागपूर शहर विभाग हा अस्पृश्यांकरता राखीव होता.

बाबू यावेळी घोडा या चिन्हावर निवडणूक लढले व काँग्रेसच्या (तुलाराम साखरे व हेमचंद्रराव खांडेकर) उमेदवारांचा पराभव करून बाबू प्रांतिक कौन्सिल मध्ये निवडून आले. १७ फेब्रुवारी १९३७ ला बाबू लोकप्रतिनिधी बनले. यावेळी स्वतंत्र मजूर पक्षाच्या नावावर भंडाऱ्यातून राघोबा घोडीचोर, चंद्रपुरातून देवा खोब्रागडे, यवतमाळातून डी. के. भगत हे चार प्रतिनिधी निवडून आले होते. शिवाय पक्षाचे समर्थक वर्धेतून दशरथ पाटील, उमरेडमधून सिताराम पाटील, छिंदवाड्यातून जांभुळकर हे स्वातंत्ररित्या निवडून आले होते. हे स्वतंत्र प्रतिनिधी नंतर स्वतंत्र मजूर पक्षात सहभागी झाले. पक्षालाही भरघोस यश बाबूंच्या समर्थ नेतृत्वामुळे लाभले. त्यामुळे बाबू हरदास एल एन यांचा २७ फेब्रुवारी १९३७ रोजी मानपत्र देऊन भव्य नागरी सत्कार करण्यात आला.

### जयभीमचा नारा

मध्यप्रांतीय कौन्सिलमध्ये सिपी अँड बेरार मधे निवडून आल्यावर बाबूकडे नमस्कार दीनबंधू म्हणणारी शेकडो मंडळी दररोज येत असत. बाबूही जयभीम म्हणून त्यांचे स्वागत करीत. १९३४ ला बाबूंनी भीम विजय संघ स्थापन केला. याद्वारे जयभीम चा प्रचार केला.

सुरुवातीला जयभीमला प्रत्युत्तर म्हणून बलभीमचा प्रचार होता. पुढे बलभीम ऐवजी जयभीम म्हणून रिस्पॉन्स देणे सुरू झाले. बाबूंच्या कल्पनेपूर्वी जयभीम चा प्रचार नव्हता. कायदे मंडळात निवडून आल्यामुळे बाबूंनी बिडी कामगारांच्या समस्या विषयी अनेक योजना आखून भंडारा, गोंदिया वगैरे ठिकाणी दौरे आखले.

दरम्यान जेवनाकडे व झोपेकडे दुर्लक्ष झाले परिणामतः त्यांची प्रकृती खालावली व त्यांचे १२ जानेवारी १९३९ रोजी वयाच्या ३५ व्या वर्षी निधन झाले. १९३४ ला ज्या बाबू हरदास एल एन यांनी जयभीम या घोषवाक्याची निर्मिती केली आज तो जयभीम संपूर्ण जगात पोहोचलेला आहे. आज जयभीम समता, स्वतंत्रता, न्याय व बंधुतेचे ब्रँड झालेले आहे.

●●●●●●●●●

## कुंभमेळ्यातील संन्यासी, आखाडे आणि धर्मरक्षणाची भूमिका

**वाचक लिहितात**

हिंदू धर्म मुळातच सर्वसमावेशक आणि सहिष्णू आहे. तरीही, हिंदू देवता शस्त्र धारण केलेल्या आहेत, याचा विचार केल्यास लक्षात येते की दयाळू, कृपाळू असूनही, धर्मरक्षणासाठी देवतांनी शस्त्र धारण केले आहे. त्याचप्रमाणे, कुंभमेळ्यात येणाऱ्या साधू-संतांच्या हातात शस्त्र कसे? असा प्रश्न अनेकांना पडतो.

कुंभमेळ्याचा इतिहासही पुरातन आहे. मुसलमान आक्रमकांच्या काळात हिंदू धर्मावर आलेल्या संकटांमुळे संन्याशांनीही शस्त्र उचलण्याचा निर्णय घेतला. कुंभमेळ्यात या निर्णयाला अखंड आवाहन असे संबोधण्यात येऊ लागले. अखंड या शब्दाचा अपभ्रंश होऊन आखाडा असा प्रचलित अर्थ झाला. संन्याशांनी शस्त्र धारण करणे हे ऐतिहासिकदृष्ट्या एक महत्त्वाचे वळण ठरले. वस्त्र आणि भौतिक सुखांचा त्याग करत या संन्यासांनी आपले जीवन धर्मरक्षणासाठी वाहिले.

सध्या चित्रपट, नाटक, जाहिराती, लेखन, चित्रे अशा विविध माध्यमांतून हिंदू देवता, हिंदू धर्म आणि संस्कृती यांची विटंबना होत आहे. आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात युवकांनी आपल्याजवळ असलेल्या आधुनिक तंत्रज्ञानाचा आधार घेऊन धर्मावर होणाऱ्या आघातांना प्रत्युत्तर देण्याची वेळ आली आहे.

■ **हृषीकेश हरदास, वर्धा.**

# आद्य पत्रकार दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर

मराठी भाषेतील आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांची आज जयंती. बाळशास्त्री जांभेकर यांनी दर्पण हे मराठी भाषेतील पहिले वृत्तपत्र सुरू केले. बाळशास्त्री जांभेकर यांचा जन्म कोकणातील सिंधुदुर्ग जिल्ह्यातील देवगड तालुक्यातील पोंभूर्ले या गावी ६ जानेवारी १८१२ रोजी झाला. विशेष म्हणजे त्यांनी त्यांच्या जन्मदिनीच म्हणजे ६ जानेवारी १८३२ रोजी दर्पण हे महाराष्ट्रातील पहिले वृत्तपत्र सुरू केले. वयाच्या विसाव्या वर्षीच दर्पण हे वृत्तपत्र सुरू करून बाळशास्त्री जांभेकर यांनी मराठी वृत्तपत्र व्यवसायाचा पाया घातला.

त्यांनीच १८४० मध्ये दिग्दर्शन हे मराठीतील पहिले मासिक काढले. बाळशास्त्री जांभेकर यांचा लोकशिक्षण व ज्ञानप्रसार हाच हेतू या उपक्रमामागे होता. सुधारकांच्या पहिल्या पिढीने पाश्चात्य विद्या व शिक्षण आत्मसात करून नवी जीवनमूल्ये वृत्तपत्र माध्यमाद्वारे रुजवली. त्या परंपरेचा पाया बाळशास्त्री जांभेकरांनी घातला. बंगालमध्ये राजाराम मोहन रॉय यांनी सुधारणांचे युग आरंभिले तेच कार्य जांभेकरांनी महाराष्ट्रात केले.

बाळशास्त्री जांभेकर हे लहानपणापासून हुशार होते. वयाच्या तेराव्या वर्षी त्यांनी मराठी आणि संस्कृत विषयाचे अध्ययन पूर्ण केले. नंतर ते मुंबईला गेले तिथे त्यांनी इंग्रजी विषयाचे शिक्षण पूर्ण केले. इंग्रजी विषयात त्यांनी नैपुण्य मिळवले. इंग्रजीतील त्यांचे नैपुण्य पाहून इंग्रज राज्यकर्त्यांनी त्यांची एल्फिन्स्टन कॉलेजमध्ये इंग्रजीचे प्राध्यापक म्हणून नेमणूक केली.

त्या कॉलेजमध्ये एकूण सतरा प्राध्यापक होते त्यात बाळशास्त्री जांभेकर हे एकमेव मराठी प्राध्यापक होते. दादाभाई नौरोजी हे त्यांचेच विद्यार्थी होते. पुढे त्यांची नेमणूक शाळा तपासणीस म्हणून झाली. बोर्ड ऑफ एज्युकेशनने चांगले अध्यापक तयार करावेत अशी सूचना त्यांनी इंग्रज सरकारला केली. ती सूचना मान्य करून इंग्रज सरकारने डीएड, बीएड कॉलेजची निर्मिती केली.

केवळ शिक्षणाचा प्रसार करून चालणार नाही तर सनातनी आणि प्रतिगामी लोकांच्या मनावर बेगडी श्रद्धांचा जो कालबाह्य पगडा आहे तो हटवला पाहिजे. लोकांच्या भावना, संवेदना विशाल उदार झाल्या पाहिजेत असे त्यांचे मत होते त्याकरिताच त्यांनी दर्पण नावाचे पहिले वर्तमानपत्र सुरू केले.

दर्पणचा पहिला अंक ६ जानेवारी १८३२ रोजी प्रकाशित झाला. दर्पण हे द्विभाषिक वर्तमानपत्र होते. एकाच वेळी इंगजी व मराठीत निघणाऱ्या या वर्तमानपत्राच्या पानातील दोन स्तंभात डावीकडचा स्तंभ इंग्रजी भाषेत तर उजवीकडच्या स्तंभात मराठी भाषांतर असे त्यात आठ पाने असत.

बाळशास्त्री जांभेकर यांनी वाचकांची मागणी वाढू लागल्याने दर्पण साप्ताहिक ४ मे १८३२ पासून सुरू केले. बाळशास्त्री जांभेकर हे निर्भीड पत्रकार होते. त्यांचे लेख विचारप्रवर्तक असत. इंग्रजांच्या नोकरीत असूनही ते इंग्रज सरकार विरुद्ध बेधडक लिहायचे त्याचप्रमाणे जातपात, कर्मकांड, अनिष्ट रूढी परंपरा यावर ते आपल्या लेखणीतून सातत्याने प्रहार करीत.

६ जानेवारी हा बाळशास्त्री जांभेकरांचा जन्मदिवस आणि योगायोगाने ६ जानेवारी रोजीच दर्पणचा पहिला अंक प्रकाशित झाला असल्यामुळे हा दिवस महाराष्ट्रात पत्रकार दिन म्हणून साजरा केला जातो. या दिवशी निर्भीड पत्रकारिता करणाऱ्या पत्रकारांना विविध संस्थांकडून गौरविले जाते.

१८ मे १८४६ रोजी दर्पणकार बाळशास्त्री जांभेकरांचे निधन झाले. जयंतीदिनी बाळशास्त्री जांभेकरांना विनम्र अभिवादन! तसेच सर्व पत्रकार बंधूंना शुभेच्छा!



श्याम ठाणेदार
दौंड. जिल्हा पुणे.
९९२२५४६२९५

# चविष्ट जेवण हवे? आरोग्यही ठणठणीत हवे?

नारळाचे दूध फक्त जेवणाची चवच वाढवत नाही तर आरोग्यासाठी ते फायदेशीर आहे. त्याचे फायदे जाणून घेऊन तुम्हालाही आश्चर्य वाटेल.

हे दूध ताज्या नारळाच्या लगद्यापासून तयार केले जाते. त्याच्या समृद्ध, चवदार आणि मलाईयुक्त पोत साठी ते जगभरात प्रसिद्ध आहे.

नारळाच्या दुधाचा उपयोग फक्त जेवणाची चव वाढवण्यासाठी नाही तर आरोग्यासोबतच सौंदर्य वाढवण्यासाठी होतो. अशा धकाधकीच्या जीवनात अनेक लोक त्यांच्या आरोग्याबाबत अधिक जागृत होत आहेत. नारळाचे दूध हे आरोग्यदायी पर्याय म्हणून फायदेशीर ठरत आहे.

नारळाचे दूध केवळ पोषक तत्वानी समृद्ध नसून त्यात लोह,सेलेनियम, सोडियम, कॅल्शियम, मॅग्नेशियम आणि फॉस्फरस त्याचसोबत जीवनसत्वे C, E, B1, B3, B5, B6 आहेत. याशिवाय त्यात असलेले नैसर्गिक फॅट्स आणि अँटिऑक्सिडंट तुमची प्रतिकारशक्ती वाढवण्यास मदत करतात. तसेच हृदय निरोगी ठेवण्यास आणि वजन कमी करण्यास देखील मदत करते.

यामुळे त्वचेवर चमक येते आणि केसही चमकदार होतात. याशिवाय तणाव कमी करण्यासाठी आणि मानसिक शांतीसाठी देखील हे उपयुक्त आहे.



### रोगप्रतिकारक शक्ती वाढवते

नारळाच्या दुधामध्ये लॉरीक ॲसिड असते, जे अँटीबॅक्टेरियल, अँटिव्हायरल आणि अँटिफंगल गुणधर्मानी समृद्ध आहे.

हे शरीराची रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करण्यास मदत करतात. ज्यामुळे रोगांपासून आपल्या शरीराचे संरक्षण होते.

### वजन कमी करण्यासाठी फायदेशीर

धावपळीच्या जीवनशैलीमुळे अनेक लोकांचे वजन वाढले आहे. जे कमी करण्यासाठी ते अनेकदा विविध प्रकारचे आहार घेतात आणि व्यायाम करतात.

वजन कमी करण्यासाठी आहारात नारळाचा दुधाचा समावेश केल्यास वजन कमी होण्यास मदत होते. नारळाच्या दुधात असलेले मध्यम ट्रायग्लिसराइड्स फॅटचे ऊर्जेत रूपांतर करतात जे चयापचय गतिमान करते आणि वजन कमी करण्यास मदत करते.

### पचन संस्था सुधारते

नारळाचे दूध पचनक्रिया सुधारण्यासाठी देखील अत्यंत फायदेशीर आहे. नारळाच्या दुधात मोठ्या प्रमाणात फायबर असते जे पचन संस्था सुधारण्यास मदत करते आणि बद्धकोष्ठते सारख्या समस्येपासून आराम देते. जर तुम्हालाही या समस्या असतील तर तुमच्या आहारात नारळाच्या दुधाचा समावेश आवश्यक करा.

### त्वचा आणि केसांसाठी फायदेशीर

नारळाचे दूध त्वचा आणि केसांसाठी देखील फायदेशीर आहे. हे त्वचेला हायड्रेट करते आणि केसांना पोषण देते. तुम्ही याचा मास्क बनवून देखील लावू शकता. याचा समावेश तुम्ही तुमच्या आहारातही करू शकतात.

●●●●●●●●●

## अशोकायन

### अनाथांची माय

**हाल अपेष्टेत जीवन गेले**
**भोगल्या वेदना ठाई ठाई**
**हे दुःख येऊ नये वाटेला**
**म्हणून सिंधुताई बनल्या**
**अनाथांची आई..**

**अनाथ बालके गावोगावी**
**' ममतेचा ' पाझर फूटो हृदयी**
**पालकत्वाचा वसा**
**स्विकारणे**
**हीच खरी श्रध्दांजली**
**सिंधुताईस ..!**

**सनाथ पुन्हा अनाथ झाले**
**नियतीला नाही पाहवले**
**वसा त्यांचा चालविण्या**
**योगदान देऊ आपले ..!**



प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)

# कुंभमेळ्याचे आयोजन : महसुलाचा स्रोत की अपव्यय?



**प्रस्तावना**

कुंभमेळा, ज्याला महाकुंभ असेही म्हणतात, हा भारतीय संस्कृती आणि धर्माच्या महानतेचे प्रतीक आहे. हा केवळ धार्मिक उत्सव नसून, तो आध्यात्मिक सोहळा, महासत्संग आणि सांस्कृतिक परंपरेचा भव्य आविष्कार आहे. प्रयागराजच्या त्रिवेणी संगमावर होणाऱ्या या मेळ्याला हिंदू धर्मात अनन्यसाधारण महत्त्व आहे. कोट्यवधी भाविकांची उपस्थिती आणि व्यापक जनसमूहामुळे हा मेळा जगातील सर्वांत मोठा धार्मिक सोहळा मानला जातो.

**हिंदूंच्या धार्मिक कार्यक्रमांवरच प्रश्न का?**

कुंभमेळ्यावर होणाऱ्या खर्चाबाबत अनेकदा टीका केली जाते. असे म्हटले जाते की, सरकार या मेळ्याच्या आयोजनासाठी मोठ्या प्रमाणात निधी खर्च करते, जो आरोग्य, शिक्षण आणि गरिबी निर्मूलनासाठी वापरता आला असता. विशेषतः नागा साधू आणि इतर धार्मिक परंपरांवर होणाऱ्या खर्चावर अनेक वेळा प्रश्न उपस्थित होतात.

तथापि, इतर धर्मांच्या धार्मिक सोहळ्यांसाठीही सरकार खर्च करते, जसे की मुस्लिम बांधवांच्या हज यात्रेसाठी होणारा खर्च. तेव्हा या खर्चावर फारसा आक्षेप घेतला जात नाही. त्यामुळे केवळ हिंदूंच्या धार्मिक आयोजनांवर टीका करणे अयोग्य वाटते.

**आर्थिक दृष्टिकोनातून कुंभमेळ्याचे महत्त्व!**

२०१ मध्ये प्रयागराज येथे झालेल्या कुंभमेळ्यासाठी उत्तर प्रदेश सरकारने सुमारे छ४,२०० कोटी खर्च केले. हा निधी मूलभूत सुविधा, सुरक्षा, स्वच्छता आणि इतर सेवांसाठी वापरण्यात आला. या मेळ्यामुळे राज्याला सुमारे छ१.२ लाख कोटींचा आर्थिक लाभ झाला, जो पर्यटन, व्यापार आणि इतर माध्यमांतून मिळाला.

कुंभमेळ्याच्या वेळी तात्पुरते शहर उभारण्यात येते, ज्यामध्ये रस्ते, पूल, वाहतूक व्यवस्था, जलपुरवठा, वीज आणि स्वच्छतेची उत्कृष्ट व्यवस्था केली जाते. यामुळे स्थानिक व्यवसायांना चालना मिळते आणि लाखो लोकांना रोजगार उपलब्ध होतो.

**कुंभमेळ्याचा धार्मिक आणि सांस्कृतिक वारसा!**

कुंभमेळा केवळ धार्मिक सोहळा नसून भारतीय सांस्कृतिक आणि सामाजिक परंपरेचा वारसा आहे. हा मेळा पारंपरिक उद्योगांना जसे हस्तकला, वस्त्रनिर्मिती आणि स्थानिक व्यवसायांना नवसंजीवनी देतो. तसेच, भारतीय कला आणि संस्कृतीचे जागतिक स्तरावर प्रसाराचे एक प्रभावी साधन ठरतो.

**कुंभमेळा : भारतीय समाजाचा अविभाज्य भाग**

कुंभमेळा हा भारतीय समाजाचा एक अविभाज्य भाग आहे, जो धार्मिक, सांस्कृतिक आणि आर्थिक दृष्टिकोनातून महत्त्वाचा आहे. याला अपव्यय मानणे चुकीचे ठरेल. हा मेळा केवळ सांस्कृतिक वारशाचे रक्षण करत नाही तर समाजात एकता, समरसता आणि बंधुभावाची भावना वाढवतो.

कुंभ मेळ्यावर करणाऱ्यांनी हे मान्य करणे गरजेचे आहे की कुंभमेळा हा भारतीय संस्कृतीच्या विविधतेचे दर्शन घडवणारा सोहळा आहे. याला अपव्यय समजण्याऐवजी भारतीय समाजाच्या प्रगतीचे आणि विकासाचे माध्यम म्हणून पाहिले गेले पाहिजे.

**भक्तांसाठी सुवर्ण संधी!**

अनेक वर्षांपासून सनातन संस्थेच्या वतीने कुंभ मेळ्यात विविध माध्यमातून साधना उत्तम होण्यासाठी मार्गदर्शन करण्यात येत. यंदाच्या वर्षी प्रयागराज येथे होणाऱ्या महाकुंभ मेळ्यात साधना सत्संग, नामसंकीर्तन फ्लेक्स प्रदर्शन इत्यादी विविध माध्यमातून व्यापक प्रसाराचे नियोजन करण्यात आलेले आहे. साधनेतील आनंद प्राप्त करण्यासाठी आणि तो इतरांनाही देण्यासाठी भक्तांनी या सुवर्णसंधीचा अवश्य लाभ करून घ्यावा.



**: संकलक :**
**चेतन राजहंस,**
**प्रवक्ता, सनातन संस्था**
**संपर्क क्रमांक : ७७७५८५८३८७**

# काटोल नरखेड विधानसभा मतदारसंघाचा पाच वर्षात सर्वांगीण विकास होणार आहे

## शारदा चौक काटोल येथील मतदारांचे आभार

**काटोल :** ज्याला आपण निवडले तोच आपला तारणारा, समस्या सोडवणारा, परिसराचा विकास करणारा, चरणसिंग ठाकूर हा आमदार नसून कामदार आहे, असा विश्वास काटोल नरखेड विधानसभा मतदारसंघातील सर्व गावांमध्ये व जनतेमध्ये प्रचलित आहे.

केंद्रीय मंत्री नितीनजी गडकरी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या आशीर्वादाने मी लोकसेवक म्हणून काम करत आहे, यापूर्वीही केले ,आता करतोय, भविष्यातही करत राहीन. विधानसभा मतदारसंघातील सर्व गावांमध्ये रस्ते, नाले, वीज, पाणी असावे, शेतकरी सुखी-समृद्ध व्हावा, बेरोजगारांना रोजगार देण्यासाठी उद्योग उभारले जावे, कोरडवाहू क्षेत्र नष्ट व्हावे, असा संकल्प मी केला आहे. हिरवळीची निर्मिती, एका वर्षात सर्व गावात पांदण रस्ते बांधणे, नंतर खडीकरण, नंतर डांबरिकरण, कन्हान. नदीचे पाणी सावनेर मार्गाने नरखेड सावरगावला आणून पाण्याची समस्या संपवायची आहे.

कार प्रकल्प, जाम प्रकल्प, चिखली प्रकल्पातील पाणी.शेतीकरिता वरदान ठरणार आहे . पुरातन काटोलचे सरस्वती मंदिर, चंडिका मंदिर, ऋषीधरी या ठिकाणी क क्षेत्रात आणून पुरातन मंदिरांचा सर्वांगीण विकास करण्यात येईल. असे मत काटोल नरखेड विधानसभा मतदारसंघात अखंड सेवा करण्याचा माझा संकल्प आहे.असे आमदार चरणसिंग ठाकूर यांनी सांगितले.

शारदा चौक काटोल येथे कृतज्ञता सभेचे आयोजन करण्यात आले होते, यावेळी अध्यक्षस्थानी आमदार चरणसिंग ठाकूर बोलत होते.

# तुलसीरामजी गायकवाड-पाटील कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये 'आरंभ २०२४' चा शुभारंभ




**गुमगाव :** तुलसीरामजी गायकवाड-पाटील कॉलेज ऑफ फार्मसी (टीजीपीसीओपी) ने २८ डिसेंबर रोजी आपल्या चार दिवसीय इंडक्शन कार्यक्रमाचा, 'आरंभ २०२४' चा शुभारंभ केला. या कार्यक्रमात नवीन विद्यार्थ्यांचे फार्मसीच्या जगात स्वागत करण्यात आले. या कार्यक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांना कॉलेज आणि या व्यवसायाची ओळख करून देणे हा आहे.

उद्घाटन समारंभात डॉ. प्रफुल्ला साबळे, प्राध्यापक, यूडीपीएस, आरटीएमएनयू, प्रमुख पाहुणे म्हणून आणि मिन्हल हुसेन, डीजीएम-क्यूए, झिम लॅब प्रा. लि., नागपूर हे विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते. गायकवाड-पाटील समूहाचे उपाध्यक्ष श्री. आकाश गायकवाड-पाटील हे देखील उपस्थित होते.


प्राचार्य डॉ. पी. बी. सुरसे यांनी उपस्थितांचे स्वागत केले. डॉ. साबळे यांनी फार्मसी क्षेत्रातील व्याप्ती आणि नवकल्पनांवर प्रकाश टाकला, तर श्री. हुसेन यांनी यशस्वी फार्मास्युटिकल करिअरसाठी आवश्यक कौशल्यांवर भर दिला, तसेच वैयक्तिक आणि व्यावसायिक विकासाचे महत्त्व विशद केले.

प्रा. कृतिका वर्थी यांनी सूत्रसंचालन केलेल्या या कार्यक्रमाचे आयोजन डॉ. अवधूत पिंपळे, प्रा. श्रीतेश भोयर आणि प्रा. हर्षल मून यांसारख्या प्राध्यापक सदस्यांनी इतर कर्मचाऱ्यांच्या सहकार्याने केले होते. कॉलेजने या कार्यक्रमाच्या आयोजनात सहकार्य केल्याबद्दल डॉ. मोहन गायकवाड-पाटील (अध्यक्ष, जीपीजी), आकाश गायकवाड-पाटील (उपाध्यक्ष, जीपीजी) आणि डॉ. संदीप गायकवाड (खजिनदार, जीपीजीआय) यांचे मनःपूर्वक आभार मानले. तसेच, विद्यार्थ्यांनी दिलेल्या उत्साही प्रतिसादाबद्दल त्यांचेही आभार मानले.

# जिल्ह्यात विविध ठिकाणी आता आयव्हीएफ ओपीडी

**वर्धा :** सावंगी मेघे येथील आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालयात कार्यान्वित टेस्ट ट्यूब बेबी सेंटरद्वारे नववर्षानिमित्त जिल्ह्यात विविध ठिकाणी वंध्यत्व चिकित्सा व आयव्हीएफ ओपीडी सुरू करण्यात आली आहे.

मातृत्व हा स्त्रीचा निसर्गदत्त अधिकार असून अपत्यप्राप्तीपासून वंचित राहणाऱ्या स्त्रियांना आयव्हीएफ म्हणजे इन विट्रो फर्टिलायझेशन प्रक्रियेद्वारे मातृत्वाची आशादायी संधी सहजतेने उपलब्ध करून देण्यासाठी सावंगी मेघे रुग्णालयाव्यतिरिक्त ७ केंद्रांवर ही पूर्वतपासणी सुविधा दर आठवड्याला नियमित उपलब्ध राहणार आहे. या उपक्रमांतर्गत सोमवारी आर्वी येथील राणे मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल, मंगळवारी सेलू येथील सावंगी रुग्णालयाचे ग्रामीण आरोग्य शिक्षण केंद्र, बुधवारी हिंगणघाट येथील तुळसकर हॉस्पिटल, गुरुवारी पुलगाव येथील पार्वती क्लिनिक, शुक्रवारी देवळी येथील माई हॉस्पिटल तसेच समुद्रपूर येथील ग्रामीण रुग्णालय आणि शनिवारी स्थानिक राष्ट्रसंत तुकडोजी महाराज चौक, आर्वी नाका परिसरातील माई हॉस्पिटल येथे सकाळी ९ ते दुपारी २ या दरम्यान ही विशेष तपासणी सुविधा उपलब्ध राहणार आहे. या केंद्रांवरून आयव्हीएफ उपचारांसाठी येणाऱ्या दाम्पत्यांना विशेष सवलत देण्यात येणार असून सोनोग्राफी व सीमेन विश्लेषण प्राथमिक परीक्षण मोफत करण्यात येईल. तसेच, पीसीओडी म्हणजेच पॉलीसिस्टिक ओव्हरी डिसऑर्डर हा हार्मोन्ससंबंधित आजार असलेल्या स्त्रियांना रक्ततपासणी व सोनोग्राफी या सेवा निःशुल्क प्राप्त होणार आहे. अपत्यसुखाचा आनंद घेऊ इच्छिणाऱ्या जोडप्यांनी आपल्या परिसरात उपलब्ध झालेल्या या विशेष सेवेचा लाभ घ्यावा, असे आवाहन टेस्ट ट्यूब बेबी सेंटरच्या संचालक व ज्येष्ठ स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. दीप्ती श्रीवास्तव यांनी केले आहे.



# देशगौरव नेताजी सुभाषचंद्र बोस वाचनालयात सावित्रीबाई फुले जयंती साजरी



**नागपूर :** सावित्रीबाई फुले जयंती दरवर्षी ३ जानेवारी रोजी साजरी केली जाते. सावित्रीबाई फुले या भारताच्या पहिल्या महिला शिक्षिका, समाजसुधारक आणि स्त्री शिक्षणाच्या प्रवर्तक होत्या. त्यांचा जन्म ३ जानेवारी १८३१ रोजी महाराष्ट्र राज्यातील नायगाव, सातारा येथे झाला.

सावित्रीबाई आणि त्यांचे पती महात्मा जोतिराव फुले यांनी १८४८ साली पुण्यात पहिली मुलींची शाळा स्थापन केली. त्यांनी स्त्रियांसाठी शिक्षण मिळवणे सोपे आणि सुलभ करण्यासाठी अनेक प्रयत्न केले. त्या स्वतःही स्त्रियांसाठी प्रेरणादायक शिक्षक होत्या. त्यांनी विधवा पुनर्विवाहाला प्रोत्साहन दिले आणि स्त्रियांच्या अधिकारांसाठी लढा दिला.

त्यांनी स्त्री भ्रूण हत्ये विरोधात जनजागृती केली आणि मुलींचे महत्त्व समजावले. अस्पृश्य समाजाला शिक्षण व न्याय मिळवून देण्यासाठी त्यांनी आणि ज्योतीरावांनी मोठे कार्य केले. त्या सामाजिक न्यायाच्या प्रतीक होत्या आणि त्यांनी शिक्षणाचा वापर करून समाजातील अनेक समस्या सोडवण्याचा प्रयत्न केला. सावित्रीबाई फुले यांचे कार्य आजही प्रेरणादायी आहे, आणि त्यामुळेच त्यांची जयंती उत्साहाने देश गौरव नेताजी सुभाषचंद्र बोस रायपूर हिंगणा वाचनालयात दर वर्षी वाचन संस्कृती प्रचार व प्रसार सुध्दा व्हावा या उदात्त हेतूने मोठ्या उस्थाहाने साजरी केली जाते. तसेही सावित्रीबाई फुले यांची जयंती ही स्त्री शिक्षण आणि सामाजिक सुधारणांच्या कार्याला अभिवादन करण्याचा दिवसच आहे. असे आपल्या अध्यक्षीय भाषणात विठ्ठलराव कोहाड म्हणाले या प्रसंगी नागपूर जिल्हा परिषदेचे गटनेते दिनेशबाबू बंग, पंचायत समिती सदस्य सुनीलभाऊ बोंदाडे, ग्राम पंचायत सदस्य जावेद महाजन, डॉ. अतुल लांबसोंगे, हमीद शेटे, शफिभाऊ शेटे, मोतीभाऊ कडू, दत्तात्रय अड्याळकर, राजेश मोहोड, सेवक इखार, शरद वजरे, आदी मान्यवर यांची प्रमुख उपस्थित होती.


## आज का अंदाज

**सोमवार ६ जानेवारी २०२५**

**पत्थर फोड एकच**

| कल्याण बाजार | | | | मुंबई बाजार | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ० | १ | ४ | ७ | ३ | ५ | ६ | ९ |
| ३८९ | २९० | ४५५ | ३४० | १२० | २५८ | ६०० | १३५ |
| ४६० | ४७० | ७८९ | २५० | ३०० | ७८० | ५५६ | ३६० |
| २३५ | ३८० | ३४७ | १६० | ६७० | ६९० | १५० | ५६८ |
| ०२ | १२ | ४३ | ७३ | ३० | ५० | ६८ | ९८ |
| ०५ | १५ | ४६ | ७६ | ३१ | ५१ | ६७ | ९७ |
| ०८ | १८ | ४९ | ७९ | ३२ | ५२ | ६४ | ९४ |

**६ जानेवारी: सर्व बाजारांसाठी**

| | | | |
|---|---|---|---|
| २१ | ५१ | ६० | ९० |
| २४ | ५४ | ६८ | ९८ |
| २७ | ५७ | ६३ | ९३ |

कल्याण व मुंबई करिता तसेच सर्व बाजारासाठी ६० पानांचा चार्ट मिळेल. १०० टक्के खात्रीशीर. फक्त सोमवारी मिळेल.

**प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४**


# भाजपच्या सदस्यता नोंदणी अभियानाला उत्स्फूर्त प्रतिसाद

## प्रदेश उपाध्यक्ष धर्मपाल मेश्राम यांनी नोंदविले ५० सदस्य

**नागपूर :** भारतीय जनता पार्टी द्वारे सुरु असलेल्या सदस्यता नोंदणी अभियानाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. भाजपा प्रदेश उपाध्यक्ष ॲड. धर्मपाल मेश्राम यांनी महत्वाची भूमिका नोंदवून सदस्यांची नोंदणी केली.

देशाचे दूरदर्शी नेतृत्व पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात देशाच्या प्रगतीची घोडदौड सुरु आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या पुढाकारामुळे महाराष्ट्र, विदर्भ आणि नागपूरने विकासाची मोठी उंची गाठली आहे. भारतीय जनता पार्टीच्या या विकासाभिमूख नेतृत्वावर विश्वास दाखवून अनेक जण पक्षाचे सदस्यत्व स्वीकारत आहेत.

भाजपा महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष ॲड. धर्मपाल मेश्राम यांच्या विशेष प्रयत्नाने पूर्व नागपुरातील पँथर नगर, तुलसी नगर, नंदनवन, पडोळे नगर, शांती नगर, हिवरी नगर, पवनशक्ती नगर, कुंभार टोली या भागातील सदस्यांनी नोंदणी केली. लालू शाहू, नरेंद्र खोब्रागडे, पंचशीला गजभिये, कुलदीप वरखडे, कपिल वासनिक, विनय गुप्ता, मोसमी वासनिक, रुपचंद गेडाम, आम्रपाली खोब्रागडे, सिद्धांत गायकवाड, राजकुमार गुप्ता, शेषराव गजघाटे, किरण गजभिये, किशोर सायगन, जीत पटेल, उदय पटेल, राम सामंत, विक्रम डुंबरे, अंकित कायरकर, लोकेश मेश्राम आदींनी सदस्यता नोंदणी केली.

प्रदेश उपाध्यक्ष ॲड. धर्मपाल मेश्राम यांनी सर्व सदस्यांचे अभिनंदन केले.

## राशीभविष्य

**मेष :** आज आरोग्य पूर्वीपेक्षा चांगले राहील. आज तुम्ही वेगवेगळ्या पदार्थांचा आस्वाद घ्याल. आजचा दिवस प्रवासात जाईल. कौटुंबिक मौजमस्तीसाठी तुम्ही दूर सहलीचे नियोजन करु शकता.

**वृषभ :** प्रॉपर्टी डीलर्ससाठी आजचा दिवस लाभदायक आहे. आज तुम्ही गरजू लोकांना मदत कराल, ज्यामुळे समाजात तुमची चांगली प्रतिमा सुधारेल. तुम्ही तुमच्या जोडीदाराच्या भावनांचा आदर कराल,

**मिथुन :** कुटुंबातील सर्व सदस्य आनंदी असतील. आज तुम्हाला एखाद्या मोठ्या पार्टीकडून ऑर्डर मिळू शकते. यामुळे आर्थिक बाजू सुधारेल. आज तुम्हाला धार्मिक गोष्टींत रस असेल.

**कर्क :** नाते अधिक घट्ट होईल. कुटुंबात अनावश्यक वाद, भांडणे टाळा. कामाच्या ठिकाणी अडचणींचा सामना करावा लागू शकतो. तुम्हाला एखाद्या मोठ्या कंपनीकडून नोकरीची ऑफर मिळू शकते.

**सिंह :** स्मार्ट काम करून मार्ग मोकळा होईल. व्यवसायावर लक्ष केंद्रित केले जाईल. नफा सामान्य होईल. कामाच्या ठिकाणी अतिउत्साही होऊ नका. साधेपणा राखाल.

**कन्या :** आज तुम्ही प्रियकरासोबत फिरायला जाण्याचा बेत आखाल. गेल्या काही दिवसांपासून सुरु असलेले कौटुंबिक कलह आज मिटतील. नवीन वर्षाची सुरुवात गोड होईल. व्यवसायानिमित्त बाहेर जाण्याचा योग आहे.

**तुळ :** वैयक्तिक संबंध सुधारतील. नातेसंबंध दृढ होतील. मित्रांच्या भेटीगाठी होतील. व्यावहारिकता आणि समजूतदारपणामुळे तुम्हाला यश मिळेल. आर्थिक बाबी आधीसारखेच राहतील. दूरदृष्टी वाढवा.

**वृश्चिक :** जेवणावर नियंत्रण ठेवा. त्यामुळे तुम्हाला त्रास संभावतो. महिलांनी आज स्वयंपाकघरात काम करताना काळजी घ्यावी. कर्ज घेणे टाळा. लांबचा प्रवास संभवतो. वैयक्तिक बाबींमध्ये शुभ घटना होतील.


**धनु :** उद्दिष्टे पूर्ण होतील. प्रेमसंबंधांमध्ये भेटीची संधी मिळेल. प्रियजन आनंदी होतील. महत्त्वाच्या कामात यश मिळेल. कुटुंबात काही शुभ कार्यक्रम घडतील. तुमच्या मनात जे असेल ते सांगता येईल.

**मकर :** आज तुमचे महत्त्वाच्या कामात योगदान असेल. तुमच्या वैवाहिक जीवनात नवीन आनंद येईल. यामुळे तुमचे मन प्रसन्न राहील. आर्थिक स्थिती सुधारण्यास मदत होईल.

**कुंभ :** व्यावसायिक कामात आर्थिक लाभ होईल. राजकारणाशी संबंधित लोक चांगले काम करतील. बेरोजगारांना रोजगाराच्या संधी मिळतील. धार्मिक कार्यात रुची राहील.

**मीन :** आज तुम्हाला नवीन जबाबदारी मिळू शकते. व्यवस्थापनाच्या कामात सक्रिय भूमिका बजावेल. धर्म आणि श्रद्धेने सर्व काही शक्य होईल. चहुबाजूंनी अनुकूलन होईल. सरकारी कामे अनुकूल होतील.

# शब्दकोडे क्रमांक २००८



**आडवे शब्द :-**


१) हाकलून देणे
७) सद्वर्तनी, शीलयुक्त
१०) वधू
११) गोजी, पाडी
१३) पोळी भाजण्याचे पात्र
१४) पंख
१६) कपाची जोडीदार
१७) धुणे
१९) कावळा
२१) वेल
२३) वकिलीचे प्रमाणपत्र
२६) प्रज्ज्वलित, तापलेले
३०) सुंदर युवती
३२) हिंदीत मोठेपणा
३३) दारुचा एक प्रकार
३४) हावरटपणा
३५) रस्ता, मार्ग
३६) दाभाड, तोंड
३७) जिवलग मित्र
३८) वृद्धत्व
३९) नम्र, वाकलेला
४०) बालक, मूल
४१) नाग
४२) जैन साधु
४४) दहा
४६) दया, कीव
४८) रवाळ
५०) सेवक
५१) रम्य
५४) चिमण्यांचा मंजूळ आवाज
५७) मेंढा, अज
६०) मज्जाव
६२) अन्न जळू लागणे
६३) चरण
६४) अपमान
६६) गुणाकार
६७) वेदनेची उसळी
६८) गणपती
७०) गाय
७१) बायको
७३) किंमत
७५) पुष्परस
७६) मृत्तिका पात्र
७९) माशी
८०) रविवासर
८१) शपथ
८२) सडपातळ

**उभे शब्द :-**

२) कानाजवळचा भाग
३) बारीक केस
४) कसोटी, चाचणी
५) टरफल
६) मुख
७) चंद्र
८) सत्ता
९) बारा वर्षाचा काळ
११) अरण्य
१२) वड
१५) पंचवीसाव्या वर्धापन दिवसाचा सण
१८) लसुणाची पाकळी
२०) पुष्कळ
२२) धुंद, मस्त, जहाजातून आणलेला माल
२४) ओलसर हवा
२५) मनसोक्त
२७) फळांपासून केलेले पेय
२८) रक्तवाहिनी
२९) खाऱ्या पाण्याचा समुद्र
३१) चामखीळ
३५) स्तुती
३६) पिता, सीतेचे वडील
३७) पचपचीत
४०) माराची उमटलेली खूण
४३) क्वचित
४५) मंदवासर
४६) कौशल्य
४७) चकणी
४९) कीर्ती, आवाज
५२) बंदी
५३) जावळा
५५) चिकटणारा, लगटणारा
५६) फुटपाथवरील छोटेसे दुकान
५८) ललाट
५९) अभिप्राय
६१) अनेक प्रकार
६४) सुरुवातीला, प्रथम
६५) गुप्तपणे शत्रुची माहिती काढणारा
६६) धरणे, स्वयंपाक घरातील एक चिमटा प्रकार
६७) युक्ती
६९) एक शब्दालंकार
७२) प्रवेशकर
७४) सूर्याचे एक नाव
७५) करपलेला भाग
७७) कुंतल
७८) दोन मैलाचे अंतर

**(उत्तर उद्याच्या अंकात)**

## मागील शब्दकोड्याचे उत्तर



# महासागर

●रविवार,दि.५ जानेवारी २०२५

# अकोला

पान ६


## एजंट व दलालांच्या सोयीसाठी पुरवठा विभागाची महाफूड वेबसाइट दोन महिने बंद

■अकोला,दि.४ (प्रतिनिधी):

गेल्या दोन महिन्यांपासून राज्य शासनाच्या अन्न व नागरी पुरवठा विभागातील 'महाफुड' ही वेबसाइट बंद असल्याने शिधापत्रिकेसंबंधित सर्व ऑनलाइन कामे बंद आहेत. त्याचा राज्यभरातील नागरिकांना मनस्ताप सहन करावा लागत आहे. दलाल व एजंट यांच्या सोयीसाठी ही वेबसाईट क्लोज आहे काय असा प्रश्न जनतेला पडला आहे.

पुरवठा या विभागातून नाव वाढवणे, नाव कमी करणे, दुबार शिधापत्रिका काढणे, आधारसंबंधित कामे, नवीन शिधापत्रिका देणे, शासकीय विभागातून वैद्यकीय उपचारासाठी पुरवठा विभागातून लागणारे दाखलेही मिळत नसल्याने आरोग्यसंबंधित योजनांचा लाभ घेताना अडचणी येत आहेत. अन्न व नागरी पुरवठा विभागातील ही सर्वच कामे ठप्प असल्याने सर्वच तालुक्यांच्या ठिकाणी ग्रामीण भागातून येणाऱ्या नागरिकांचे हाल होत आहेत. काही काळासाठी वेबसाईट चालू असते.

यामुळे काहीजणांची कामे अर्ध्यात खोळंबली आहेत. लोक आपल्या शासकीय कामांसाठी तालुक्याच्या ठिकाणी येतात; पण सर्व्हर समस्या येत असल्याने काम पूर्ण न झाल्याने पुन्हा सात-आठ दिवसांनी या, असे कर्मचारी सांगतात. पुन्हा आले तरी हीच समस्या उद्भवत आहे.

नागरिकांनी पुरवठा विभागातील कर्मचाऱ्यांकडे चौकशी केली असता, वेबसाइट अद्याप चालू नसल्याचे सांगण्यात येते. मात्र, या समस्या निवारणासाठी प्रत्येक तालुक्याच्या स्थानिक विभागाकडून कोणतीही हालचाल दिसत नाही. 'सर्व्हर डाउन असल्याने आम्ही काय करणार?' हीच भूमिका तालुक्यातील प्रत्येक कर्मचाऱ्याची आहे. एकाच कामासाठी तालुक्याच्या ठिकाणी नागरिकांना अनेक हेलपाटे घालावे लागत आहेत.

## स्वाधार योजनेसाठी ऑनलाईन अर्ज करा समाजकल्याण विभागाचे आवाहन

■अकोला,दि.४ (प्रतिनिधी):

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेचे अर्ज ऑनलाईनरीत्या स्वीकारण्यासाठी मोड्युल 'महाआयटी'कडून सुरू करण्यात आले आहे. सुधारित शासन निर्णयानुसार पात्र विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज करावेत, असे आवाहन समाजकल्याण सहायक आयुक्त डॉ. अनिता राठोड यांनी केले आहे.

योजनेद्वारे अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकातील शासकीय वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांना मॅट्रिकोत्तर शिक्षण घेता यावे म्हणून भोजन, निवास व इतर शैक्षणिक सुविधांसाठी आवश्यक रक्कम विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न खात्यात थेट वितरित केली जाते. विद्यार्थ्यांना https://hmas.mahait.org या पोर्टलवर ऑनलाईन अर्ज भरता येतील. अधिक माहितीसाठी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, निमवाडी, पोलीस वसाहत, दक्षतानगर, अकोला येथे संपर्क करावा.

योजनेचे निकष : विद्यार्थी इयत्ता ११ वी, १२ वी किंवा त्यानंतरचे उच्च शिक्षण घेत असावा. विद्यार्थी स्थानिक नसावा. महापालिकेच्या हद्दीपासून ५ कि.मी. परिसरात असलेल्या महाविद्यालयात शिकत असलेले विद्यार्थीही पात्र असतील. अर्ज करताना विद्यार्थी ज्या अभ्यासक्रमात शिक्षण घेत आहे. त्याच्या केवळ लगतच्या मागील वर्षात किमान ५० टक्के गुण किंवा त्या प्रमाणात ग्रेडेशन अनिवार्य आहे. एका शाखेची पदवी किंवा पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी या योजनेचा लाभ घेतल्यानंतर पुन्हा इतर शाखेची पदवी किंवा पदव्युत्तर शिक्षणासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ नाही. इयत्ता १२ वी नंतर पदविका, पदवी अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेणारा अभ्यासक्रम हा दोन वर्षांपेक्षा कमी नसावा. तसेच पदवीनंतर पदव्युत्तर पदवी, पदविका अभ्यासक्रमाचा कालावधी ही दोन वर्षांपेक्षा कमी नसावा.

शासकीय वसतिगृहामध्ये प्रवेशास पात्र असलेला विद्यार्थी स्वाधार योजनेस पात्र ठरतो. व्यावसायिक अभ्यासक्रम पूर्ण झाल्यानंतर बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतला असल्यास स्वाधार योजनेचा लाभ घेता येणार नाही. बिगर व्यावसायिक पदवीनंतर व्यावसायिक पदव्युत्तरला लाभ अनुज्ञेय राहील. योजनेमध्ये अनु. जाती. व नवबौद्ध घटकातील दिव्यांग विद्यार्थ्यांना ३ टक्के आरक्षण असेल. ४० टक्क्यांपेक्षा जास्त दिव्यांग असल्याबाबतचे प्रमाणपत्र अनिवार्य. महिलांसाठी ३० टक्के समांतर आरक्षण किंवा शासन वेळोवेळी निर्धारित करेल त्याप्रमाणे आरक्षण अनुज्ञेय राहील. एका विद्यार्थ्यास जास्तीत जास्त ७ वर्ष या योजनेचा लाभ घेता येईल. सदर योजनेस पात्र विद्यार्थी अनुत्तीर्ण झाल्यास अनुतीर्ण कालावधीमध्ये योजनेअंतर्गत लाभ देण्यात येणार नाही.

व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी एका विद्यार्थ्यास जास्तीत जास्त ८ वर्ष स्वाधार योजनेचा लाभ घेता येईल. कमाल वयोमर्यादा ३० वर्ष इतकी राहील. शिक्षणात खंड पडलेला विद्यार्थी स्वाधार योजनेच्या लाभासाठी पात्र असेल मात्र, खंड हा २ वर्षापेक्षा जास्त असू नये.

## पिंजर येथील ज्वेलर्सचे दुकान चोरट्यांनी फोडले!

■बार्शिटाकळी,दि.४ (प्रतिनिधी):

तालुक्यातील पिंजर गावात चोरट्यांनी २ जानेवारीच्या मध्यरात्रीदरम्यान ज्वेलर्सचे दुकान फोडून सोन्या- चांदीच्या दागिन्यांसह रोख लंपास केल्याची घटना उघडकीस आली. यावेळी चोरट्यांनी दोन दुकानांना लक्ष्य करीत १ लाख २७ हजारांचे दागिने व १० हजार रूपये रोख असा मुद्देमाल लंपास केला. या प्रकरणी पिंजर पोलिसांना ३ जानेवारीला तक्रार दाखल करण्यात आली.

पिंजर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, राहुल गजानन महामुने यांनी ग्रामपंचायतमार्केट पिंजर येथे असलेल्या सिद्धिविनायक अलंकार केंद्र तथा ज्वेलर्स येथे २ जानेवारीला रात्री अंदाजे अडीच ते तीनच्या सुमारास दुकानातील चांदीचे दागिने अंदाजे १ लाख २७ हजार रुपये व रोख रक्कम दहा हजार रुपये अशाप्रकारे १ लाख ३७ हजार रुपयांची चोरी झाल्याची फिर्याद पिंजर पोलिसात दाखल केली. या तक्रारीवरून पिंजर पोलिसांनी कलम ३३१,४,३०५ ए भारतीय न्याय संहितेनुसार अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पिंजर पोलिस स्टेशनचे ठाणेदार गंगाधर दराडे यांच्या मार्गदर्शनाखाली पीएसआय रहाटे पुढील तपास करीत आहेत.

## महाकुंभमेळ्यासाठी आणखी पाच विशेष गाड्या

■अकोला,दि.४ (प्रतिनिधी):

१३ जानेवारी ते २६ फेब्रुवारी दरम्यान उत्तर प्रदेशातील येथे होणाऱ्या प्रयागराज महाकुंभमेळ्यासाठी दक्षिण-मध्य रेल्वे प्रशासनाने अकोलामार्गे आणखी पाच नवीन गाड्या चालवण्याचा निर्णय घेतलाआहे. या सर्व नवीन पाच गाड्या फेब्रुवारी महिन्यात धावणार आहेत. यापूर्वी रेल्वे प्रशासनाने जानेवारी महिन्यात दोन गाड्या चालवण्याची घोषणा केली होती. त्यानुसार अकोलामार्गे महाकुंभमेळ्यासाठी एकूण सात गाड्या उपलब्ध होणार आहेत. दक्षिण मध्य रेल्वेच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, ट्रेन क्रमांक ०७०९९ (नांदेड- पाटणा, विशेष ) १३ फेब्रुवारी रोजी रात्री ११ वाजता सुटेल. नांदेड येथून निघून त्याच तारखेला पहाटे ५ वाजता अकोल्यात पोहोचल्यानंतर प्रयागराज छिकीकडे प्रयाण होईल. त्या बदल्यात गाडी क्रमांक ०७१०० (पाटणा- नांदेड, विशेष) १५ फेब्रुवारी रोजी पाटणा येथून दुपारी ३.३० वाजता सुटेल.याशिवाय गाडी क्रमांक ०७१०१ (औरंगाबाद - पाटणा, विशेष ) ही गाडी १९ आणि २५ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ७ वाजता औरंगाबादहून सुटेल अकोलाहून प्रयागराज मार्गे पाटणा येथे जाईल. त्या बदल्यात गाडी क्रमांक ०७१०२ (पाटणा- औरंगाबाद, विशेष) विशेष) पाटणा येथून २१ आणि २७ फेब्रुवारी रोजी दुपारी ३.३० वाजता सुटेल आणि अकोलामार्गे औरंगाबादला पोहोचेल. काचीगुडा - पाटणा - सिकंदराबाद - पाटणा स्पेशल ट्रेन क्रमांक ०७१०३ ( काचीगुडा - पाटणा, विशेष) काचीगुडा येथून २२ फेब्रुवारी रोजी दुपारी ४.४५ वाजता सुटेल आणि तिसऱ्या दिवशी पाटणा येथे पोहोचेल. गाडी क्रमांक ०७१०४ (पाटणा- काचीगुडा, विशेष) २४ फेब्रुवारी रोजी सकाळी ११.३० वाजता सुटेल आणि २६ फेब्रुवारी रोजी काचीगुडा येथे पोहोचेल. याशिवाय गाडी क्रमांक ०७१०५ (सिकंदराबाद - पाटणा, स्पेशल) ७ फफ्रेब्रुवारी रोजी सुटेल.

## पोलिस वर्धापन दिनानिमित्ताने महिला मेळावा!; महिला सशक्तीकरण, कायदे विषयाची दिली माहिती

अकोट : ०३.०१.२०२५ रोजी पोलीस स्थापना दिनानिमीत्त पोलीस विभागामार्फत अकोट व तेल्हारा तालुक्यातील एकुण १२ शाळा / महाविद्यालय यांनी सत्यम पॅलेस, अकोट येथे महीला सुरक्षा, सायबर क्राईम व पोलीस विभागावर आधारीत देश का रक्षक कार्यक्रमात सहभाग घेतला. व त्यांनी स्पर्धेमध्ये वरील विषयावरील आपले कार्यक्रम सादर केले. तसेच सदर कार्यक्रम हे दि. ०२.०१.२०२५ ते ०८.०१.२०२५ दरम्यान सदर शाळा / महाविद्यालय आपले कार्यक्रम अकोट उपविभागामधे वेगवेगळया ठिकाणी ४४ ठिकाणी सादर करणार आहेत.तसेच वर नमुद शाळा / महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना पोलीस स्टेशनला उपलब्ध असलेल्या वेगवेगळे शस्त्र जसे की, एस एल आर रायफल, कार्बाईन मशीन गन, पम्प ॲक्शन गन, गॅस गन, पिस्टल, गॅस ग्रिनेड अशा वेगवेगळ्या शस्त्रांची विदयार्थ्याना माहीती देण्यात आली तसेच पोलीस विभागाचा ईतीहास, डायल - ११२, सक्षम उपक्रम, सायबर क्राईम, दाम िनी अशा वेगवेगळया विषयाचे बॅनर तयार करून त्याची प्रदर्शनी सादर करण्यात आली व वरील शाळांचे सर्व विदयार्थ्याना सदर विषयावर सर्वागिन माहीती देण्यात आली. सदर कार्यक्रमाचे अध्यक्ष हे मा. श्री बच्चन सिंह, पोलीस अधिक्षक अकोला तसेच श्री मनोज लोणारकर उपविभागीय अधिकारी अकोट, श्री अनमोल मित्तल, सहायक पोलीस अधिक्षक अकोट, श्री सुनिल चव्हाण तहसिलदार अकोट तसेच श्री सुनिल पांडे, पाचार्य श्री शिवाजी महाविदयालय अकोट यांचे हस्ते कार्यक्रमाचे दिपप्रज्वलन झाले तसेच सावीत्रीबाई फुले जयंती निमीत्त त्यांचे प्रतीमेला हार अर्पण करण्यात आले. शाळा/महाविदयालय यांनी सादर केलेल्या कार्यक्रमाचे परिक्षण श्री मनोज लोणारकर एस.डी.ओ. अकोट व श्री सुनिल चव्हाण, तहसिलदार अकोट यांनी केले. प्रथम पारितोषीक सेंट पॉल कॉन्व्हेंट अकोट, व्दितीय पारितोषीक भाउसाहेब पोटे अकोट व तृतीय पारितोषीक लोकम ान्य टिळक उमरा ता. अकोट यांना प्रदान करण्यात आले.सदर कार्यक्रमाकरीता अकोट शहरातील शांतता समीती सदस्य, प्रत्रकार बांधव व प्रतीष्टीत नागरीक तसेच विविध शाळांचे शिक्षक व विदर्याथी असे एकुण ६०० लोकांची उपस्थिती होती. कार्यक्रम यशस्वी करण्याकरीता पोलीस निरीक्षक श्री किशोर जुनघरे, श्री उलेमाले, सपोनि श्री राठोड, श्री ठाकरे तसेच अकोट उपविभागातील सर्व अधिकारी अंमलदार व आर सी पी अंमलदार यांनी परिश्रम घेतले.







## थोडक्यात

### महाराष्ट्रातील मेढपाळांना त्यांच्या मेंढ्या शेळ्या करिता चाराई कुरणे उपलब्ध करुन द्या



**तेल्हारा :** तालुक्यातील अडगांव सर्कल मध्ये दि १/१/२०२५रोजी मेंढपाळ बांधव यांनी अडगाव बु येथे कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता वाडा आंदोलन संदर्भात वाड्यावर मीटिंग बोलावली होती.या मीटिंग ला उपस्थित मेंढपाळ पुत्र आर्मी चे जिल्हा अध्यक्ष डॉ.अर्जुन नामदेवराव महानर डॉ.पंजाबभाऊ हटकर,सरपंच भाऊराव पोकळे,सरपंच गोपाल महानर तसेच मेंढपाळ बांधव मिटींगला उपस्थित मोठ्या संख्येने उपस्थित होते.आज झालेल्या बैठकीत सरकार विरोधात वाडा आंदोलन करण्याचे महाराष्ट्रातील सर्व मेंढपाळ बांधव यांनी ठरविले आहे.बोंदर कारंडे, दसरथ पोकळे,महादेव पोकळे, शहादेव पोकळे,नाना चांदे,देवराव महानर,सोनाजी डोमाले, गंगाराम कोकरे,गजानन डोमाले,चीमा महानर ,भिमराव कारंडे,सोनाजी मदने,बाळु मोरे, त्रंबक पारखे, इत्यादी बहुसंख्येने धनगर समाज उपस्थित होतो.

### डाक विभागाची १३ ते १८ जानेवारीपर्यंत विशेष मोहीम

**अकोट :** येत्या १३ ते १८ जानेवारीदरम्यान प्रवर डाक अधीक्षक गणेश अंभोरे यांच्या आदेशान्वये अकोला डाक विभागाद्वारे विशेष म ोहिमेचे आयोजन केले आहे. या विशेष मोहिमेत प्रामुख्याने आरडी, सेव्हिंग अकाउंट, महिला सन्मान अकाउंट नॅशनल सेव्हिंग सर्टिफिकेट, किसान विकास पत्र, पीएलआय, आरपीएलआय यासारख्या अनेक योजना आहेत. पोस्ट ऑफिसच्या अनेक योजनांना इतर ठिकाणच्या तुलनेने अधिक व्याज आहे. लोकभिमुख सेवा असल्याने लोकांची प्रमुख पसंती ही पोस्ट ऑफिसला लाभणार आहे. त्यासाठी विशेष मार्गदर्शन तथा आढावा बैठक प्रवर डाक अधीक्षक गणेश अंभोरे यांनी अकोट उपविभागातघेतली. यावेळी सहाय्यक अधीक्षक के. के. तायडे, बोचरे, सुधिर मेतकर, दामोदर, इरफान खान, टिकार, राऊत, ढोकणे, मालवे, झामरे, ऋषिकेश साबळे व इतर कर्मचारी उपस्थित होते. यावेळी प्रवर डाक अधीक्षक अंभोरे यांनी जास्तीत जास्त लोकांनी या मेळाव्यादरम्यान खाते उघडून बचतीचा व पोस्टाच्या विविध योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले.

### पातूर येथे आरोग्य तपासणीसह रक्तदान शिबिर उत्साहात



**पातूर :** फाउंडेशनच्यावतीने आरोग्य तपासणी व रक्तदान शिबिराचे आयोजन शहरात करण्यात आले होते. या कार्यक्रमात शहरासह परिसरातील नागरिकांनी सहभाग घेतला होता.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आ. नितीन देशमुख तर प्रमुख उपस्थितीत न. प. चे माजी नगराध्यक्ष हिदायत खान, कमर फाउंडेशनचे हाजी सय्यद कमरोद्दीन, तालुका काँग्रेसचे अध्यक्ष राजेश गावंडे, शहर काँग्रेसचे अध्यक्ष मुख्तार शेख, शिवसेना शहर प्रमुख निरंजन बंड, राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष गुड्डूभाई उपस्थित होते. आरोग्य तपासणी शिबिर डॉ. उल्हास पाटील मेडिकल कॉलेज जळगावकडून घेणयात आले. या आरोग्य तपासणी शिबिरात हृदय विकार, हाडाचे आजार, स्त्रियांचे आजार, अपैनडीस, मधुमेह, मुतखडा, नेत्र, व विविध आजारांच्या तपासण्या डॉ. परितोष (मेडीसीन ), डॉ. प्रजोत (सर्जरी), डॉ. नरेंद्र, डॉ. सुमीत (आर्थो), डॉ. तेजस (स्त्री रोग), डॉ. शुभम (नेत्र रोग), आरोग्य सेवक यांनी केले. तसेच रक्तदान शिबिरात शहरातील युवकांनी रक्तदान केले. यामध्ये डॉ. बीपी, ब्लड, बँकचे डॉ. कासीद खान, टेक्नीशियन जावेद खान, शेख साहीलसह टेक्नीशियन आनंद खंडारे, नर्स रेशमा कुरील यांनी काम पाहिले. या कार्यक्रमाला अनीक पटेल, सै महफुज, चंद्रकांत बारताशे, अनिल निमकंडे, अनिल म्हैसने, मो. हयात जमदार, मो. शारीक, संदीप फुलारी, सै. फाजील, श्रीराम अवचार यांचा सहभाग होता. यशस्वितेकरिता आरीफ शेख, सै. इरफान, सै. जमील, अबरारभाई, सै. हाशम, फिरोज खान, सै. सादीक, सै. हबीब यांनी परिश्रम घेतले.

## पातुरच्या पोलीस ठाण्यात भरली शाळा



■पातूर,दि.४ (प्रतिनिधी):

पोलिस वर्धापन दिनाचे औचित्य साधून पातूरच्या पोलिस ठाण्यात चक्क विद्यार्थ्यांची शाळा भरली. पोलिसांच्या कामकाजची माहिती विद्यार्थ्यांना व्हावी, या उद्देशाने हा अभिनव उपक्रम पातूर पोलिसांनी राबविला. महाराष्ट्र पोलीस विभागाचा वर्धापन दिन संपूर्ण महाराष्ट्रात मोठ्या उत्साहात साजरा होत आहे. याच दिनाचे औचित्य साधून पातुर पोलीस स्टेशनने एका अभिनव उपक्रमाचे आयोजन यावेळी केले. पोलीस हे जनसेवक असून त्यांच्या कामकाजाची माहिती विद्यार्थ्यांना व्हावी, या उद्देशाने पातुर पोलीस स्टेशनचे ठाणेदार हनुमंत डोपेवाड यांनी एका अभिनव कार्यक्रमाची आखणी केली. या कार्यक्रमानुसार विद्यार्थ्यांना पोलीस विभागाच्या दैनंदिन कामांची माहिती व्हावी तसेच पोलीस विभागात वापरणारी शस्त्रे यासंदर्भात मार्गदर्शन विद्यार्थ्यांना देण्यात आले. यावेळी किड्स पॅराडाईज पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांनी या उपक्रमात सहभागी होऊन पोलीस विभागाची माहिती जाणून घेतली.

याप्रसंगी पोलीस स्टेशनचे ठाणेदार हनुमंत डोपेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक मेश्राम यांच्यासह पोलीस कर्मचारी हिम्मतराव दिघोडे यांनी विद्यार्थ्यांना सविस्तर मार्गदर्शन केले. याप्रसंगी किड्स पॅराडाईज पब्लिक स्कूल चे शिक्षक संकल्प व्यवहारे, प्रियंका चव्हाण उपस्थित होते.

## सुनिल वानखडे यांनी ६ व्यांदा कळसूबाई शिखर सर करून केले नववर्षाचे स्वागत

### राज्यातील ५० दिव्यांगांची कळसूबाई शिखरावर ऊर्जा मोहिम

■अकोला,दि.४ (प्रतिनिधी):

उरळ बु येथील गिर्यारोहक, दुर्गप्रेमी,आंतरराष्ट्रीय खेळाडू, सुनिल भाऊराव वानखडे यांनी नववर्षाचे स्वागत कळसूबाई शिखर सहाव्यांदा सर करून केले.

गेल्या १३ वर्षा पासून शिववूर्जा प्रतिष्ठान, छत्रपती संभाजीनगर दर वर्षी नववर्षाच्या स्वागतासाठी कळसूबाई शिखरावर दिव्यांगाच्यासाठी ऊर्जा मोहिमेचे आयोजन करते त्यामधे सुनिल वानखडे यांचा सक्रिय सहभाग असतो.त्यांनी या वेळेस सहव्यांदा कळसूबाई शिखर सर केले.त्यांनी केलेली कामगिरी ही कौतुकास्पद आहे.

त्यांच्या ह्या कामगिरीमुळे अनेक दिव्यांगाना प्रेरणा मिळेल. या मोहिमेत मुंबई,पुणे,बीड,



नाशिक,अकोला,बुलडाणा, सोलापूर,छत्रपती संभाजी नगर,ठाणे,धाराशिव इत्यादी जिल्हातील ५० दिव्यांगांचा समवेश होता.अनोखे सामर्थ्य असणाऱ्या दिव्यंगाना त्याच्या कार्याबद्दल शिवूर्जा प्रतिष्ठान तर्फे दिव्यांग उर्जा पुरस्काराने सन्मानित केले. या ऊर्जा मोहिमे च्या यशस्वीतेसाठी शिवूर्जा प्रतिष्ठान, छ.संभाजीनगर चे अध्यक्ष शिवाजी गाढे, सचिव कचरू चांभारे, जगन्नाथ चोरे,सुनिल वानखडे,जीवन टोपे, किशोर शेवाळे,सागर बोडखे, कल्याण घोलप, अंजली प्रधान यांनी विशेष परिश्रम घेतले.

## बेलखेड येथे सावित्रीबाई फुले जयंती उत्सवात साजरी



■तेल्हारा,दि.४ (प्रतिनिधी):

बेलखेड येथील सावित्रीबाई फुले विद्यालयात सावित्रीबाई फुले जयंती दीपप्रज्वलन व हारार्पण करून विद्यालयाचे मुख्याध्यापक व सर्व कर्मचारी वृंद यांच्याकडून साजरी करण्यात आली.कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री. घाटोळ सर तर महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध व्याख्यानकार स्वप्नील उमाळे शेगांव यांची प्रमुख उपस्थिती ,जेष्ठ शिक्षक गोमासे सर, सोयाम सर, शेगोकार सर,महाले मॅडम, खंडागळे सर,म्हसाळ सर,निमकर्डे मॅडम,वानखडे मॅडम व सर्व शिक्षक उपस्थित होते.सर्व प्रथम सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.आदरणीय घाटोळ सर यांनी विद्यार्थ्यांना जयंतीचे महत्व सांगितले. तसेच तीन दिवसीय उत्सव निमित्त गावामधून प्रभात फ्फेरीचे आयोजन करण्यात आले सांस्कृतिक, क्रीडा, वक्तृत्व स्पर्धा ,आनंद मेळावा,सामान्य ज्ञान स्पर्धा, स्लो सायकल स्पर्धा,कबड्डी, तसेच इतरही खेळांचे आयोजन करुन मेडल,सन्मानपत्र बक्षीक्ष देण्यात आली.सर्व शिक्षकांनी तथा विद्यार्थ्यांनी सावित्रीबाई फ्फुले प्रतिमेला अभिवादन करून,त्यांच्या विचारांवर प्रकाश टाकून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## पातूर येथे क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले जयंती व स्त्री मुक्ती दिन उत्साहात साजरा



■पातूर,दि.४ (प्रतिनिधी):

पातूर येथील कान्होबा स्वयंसहाय्यता महिला बचत गट,पातूर साने गुरुजी कला व सांस्कृतिक क्रीडा बहुउद्देशीय मंडळ व स्व.विनायक राखोंडे प्रतिष्ठान आणि स्वामी विवेकानंद युवती बहू.मंडळ,पातूर यांच्या संयुक्त विद्यमाने दि.०३ जानेवारी २०२५ रोजी दुपारी ०४ वाजता सावित्रीमाई फुले सभागृह कान्होबा चौक पातूर येथे क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांची जयंती व स्त्री मुक्ती दिन आणि बचत गटाचा ६ वा वर्धापन दिन उत्सवात साजरा करण्यात आला.यावेळी या कार्यक्रमाला बचत गटाच्या जेष्ठ महिला श्रीमती रंजनी भेलोंडे, सौ.सुनीता देशमुख व सौ.शोभा फ्फुलारी, प्रिया दैय्या आणि बचत गटाच्या अध्यक्षा पल्लवी मांडवगणे, कोषाध्यक्ष सौ. शारदा तायडे, बचत गटाच्या सदस्या सौ.अनिता तायडे, सौ रंजना तिडके, आरती तायडे, स्वाती भोकरे, नविता खंडारे, पूनम तिडके यांनी क्रांतीज्योती सावित्रीमाई फ्फुले यांच्या प्रतिमेचे पूजन व हार अर्पण करून अभिवादन केले यावेळी बचत गटाच्या अध्यक्ष पल्लवी मांडवगणे यांनी सावित्रीमाई फ्फुले यांच्या जीवन कार्याविषयी व बचत गटाला सहा वर्ष पूर्ण झाले असून ६ वा वर्धापन दिन साजरा करीत आहे अशी माहिती उपस्थित सर्व महिलांना दिली यावेळी कार्यक्रमाचे संचालन ॲड.शुभांगी उमाळे तर आभार प्रदर्शन कु.ज्योती राखोंडे हिने मानले यावेळी क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांची जयंती व स्त्री मुक्ती दिन आणि बचत गटाचा ६ वा वर्धापन दिन उत्सवात साजरी करण्यात आली.

## जवाहर नवोदय'च्या प्रवेश परीक्षेसाठी ६९६७ अर्ज

■अकोला,दि.४ (प्रतिनिधी):

जवाहर नवोदय विद्यालयाच्या प्रवेश परीक्षेसाठी ऑनलाईन अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांना पोर्टलचा वापर करून ॲडमिशन कार्ड डाऊनलोड करता येतील. तसे पोर्टल सुरू करण्यात आले आहे. जिल्ह्यातून या परीक्षेसाठी ६ हजार ९६७ विद्यार्थ्यांनी अर्ज केला आहे. ही परीक्षा एकूण २५ केंद्रांवर होईल. पोर्टलचा https://cbseitms.rci1.gov. in/nvs/adminca पत्ता ॲव असा असून, विद्यार्थ्यांना अर्ज करताना मिळालेला रजिस्ट्रेशन क्रमांक हा आयडी म्हणून व जन्म तारीख पासवर्ड म्हणून वापरून परीक्षा प्रवेशपत्र डाऊनलोड करता येणार आहे. परीक्षार्थ्यांनी १८ जानेवारी रोजी सकाळी १०.१५ वाजता परीक्षा केंद्रावर पोहोचावे. सोबत प्रवेशपत्र, निळा किंवा काळा बॉलपेन, आधारपत्र किंवा शासनमान्य निवासी दाखल्याची छायांकित प्रत नवोदय विद्यालय समिति मज्ञान ब्रह्म आदी कागदपत्रे सोबत ठेवावी लागणार आहेत.


RNINO-46973/1986 महासागर अकोला मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर१-८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, कमला स्केअर, दुर्गा चौक,अकोला येथे प्रकाशित केले. संपादक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक मुख्य कार्यालय फोन ७४४७७३५८५१,९९२२९७००२३+स्थानिक संपादक पुरुषोत्तम बोले फोन ९८८१४८९४७९+(पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांचेवर राहील.)

# कॅलिडोस्कोप



## ट्री ऑफ ४० फ्रूट्स

*बीज तसं फळ , असा आजवरचा विचार आहे. 'शुद्ध बीजापोटी फळे रसाळ गोमटी' असं संतमहात्म्यही सांगून गेले आहेत. मात्र अलिकडेच न्यूयॉर्कमधील सॅम वॅन अकेन नामक संशोधकाने वेगवेगळ्या ४० प्रकारची फळं लगडतील असं एक झाडं लावलं आहे. मुख्य म्हणजे अनोख्या पद्धतीने कलम तयार करण्याचा त्याचा हा प्रयोग १०० टक्के यशस्वी झाला असून या एकाच झाडाला वेगवेगळ्या ४० प्रकारची फळं लगडली आहेत. म्हणजेच हे झाड सफरचंद, आंबा, संत्री, मोसंबी, चिक्कू, चेरी आदी फळांच्या भाराने वाकलं आहे. 'ट्री ऑफ ४० फ्रुट्स' असं त्याचं नामकरण झालं असून सध्या ते अनेकांच्या औत्सुक्याचा विषय ठरतंय.*

## फोटोशूटसाठी अविवाहित मुली प्रेग्नंट!

जगात कधी काय ट्रेंड निघेल काही सांगता येत नाही. आजकाल इतक्या गोष्टी आपल्या आजुबाजूला घडत असतात, की त्या पचवनही कठीण जाते. असाच एक ट्रेंड सध्या सुरू आहे, ज्याच्याबद्दल वाचून नक्कीच धक्का बसतो. असा ट्रेंड पहिल्यांदाच पाहायला मिळत आहे. फक्त फोटोशूटसाठी अविवाहित मुली प्रेग्नेंट होऊ लागल्या आहेत. होय, कोणत्याही रिलेशनशिप अन् लग्नाशिवायच या मुली प्रेग्नेंट होऊन फोटोशूट करत आहे. हा विचित्र ट्रेंड चीनमध्ये सुरू आहे.



चीन देशातील हा विचार करायला लावणारा ट्रेंड सुरू झाला आहे, जो पचनी पडणे खरच कठीण आहे. चीनमधील काही मुली अविवाहित असतानादेखील प्रेग्नेंट राहून फोटोशूट करताना दिसत आहेत. सोशल मीडियावर त्यांच्या या फोटोशूटची जोरदार चर्चा सुरू आहे; पण याचा त्या मुलींवर काहीही परिणाम होताना दिसत नाही.

एका अहवालानुसार, 'सोशल मीडिया'वर काही तरुणी आणि अविवाहित मुली प्रेग्नेंट होऊन फोटोशूट करताना दिसत आहेत. या मॅटर्निटी फोटोशूटमध्ये या मुली 'प्रेग्नेंट' होत नसून बनावट बेबी बंप लावून फोटोशूट करत आहेत. जेन-जींचा हा नवा ट्रेंड पाहून चीनमधील पालकांनादेखील मोठा धक्का बसला आहे. चीनमधील मुलींच्या या फोटोशूटच्या मागे मुलींचा असा तर्क आहे, की त्या अजून काही दिवस लग्न करणार नाहीत; पण त्यांना त्यांच्या प्रेग्नेंसी फोटोशूटमध्ये स्लिम आणि सुंदर दिसायचे आहे. जर या मुली ३० व्या वर्षी प्रेग्नेंट राहिल्या, तर त्यांच्या चेहऱ्यावर सुरकुत्या पडतील; पण २६ व्या वर्षी जर त्यांनी हे फोटोशूट केले, तर त्या आहे तशा तरुण दिसतील.

या विचाराने चीनमधील मुली आधीच त्यांचे फोटोशूट करून घेत आहेत. त्यानंतर जेव्हा त्या प्रेग्नेंट होतील, तेव्हा हेच फोटो त्या शेअर करतील. सोशल मीडियावर नेटकऱ्यांनी या ट्रेंडला प्रचंड ट्रोल केले आहे.

## चार कोटींचे घर, तरीही बेघर!

प्रत्येकाला आपल्या हक्काचे घर असावे असे वाटते. मनासारख्या ठिकाणी, मनाप्रमाणे घर असावे अशी प्रत्येकाची इच्छा असते. त्यामुळे घर घेण्यासाठी लोक आपल्या आयुष्याची पुंजी खर्च करतात. एवढा पैसा खर्च करून घराच्या चाव्या हातात येतात, तेव्हा त्यांच्या आनंदाला पारावार उरत नाही; पण चार कोटींचे घर खरेदी करूनही बेघर असाल तर? धक्का बसला ना? एका दाम्पत्याबाबत असेच काही घडले. चार कोटींचे घर घेतल्यानंतरही हे जोडपे बेघर झाले.

ब्रिटनमध्ये राहण्याऱ्या एका जोडप्याने घरासाठी आपली आयुष्यभराची पुंजी खर्च केली. आपल्या स्वप्नातील घर मिळाल्याने त्यांच्या आनंदाला उधाण आले होते. त्यांना आता कधी आपण नव्या घरात शिफ्ट होतो असे झाले होतं. त्यानुसार ते शिफ्टही झाले; पण शिफ्ट झाल्यावर त्यांना भयंकर पश्चात्ताप झाला. आपले पैसे पाण्यात गेल्याचे त्यांच्या लक्षात आले. असे कधी होईल, असे त्यांना स्वप्नातही वाटले नव्हते. वॉल्टर ब्राऊन आणि त्याची पत्नी शेरॉन यांनी हे घर विकत घेतले होते; पण घर पाहिल्यावरच त्यांना हे घर सोडून जावे लागले. ते म्हणाले, घरात गेल्यावर खिडकी उघडताच आम्हाला समोर कचऱ्याचा प्रचंड ढीग दिसला. घर खरेदी करताना आम्ही कचऱ्याचा ढिग पाहिला होता. याबाबत आम्ही डेव्हलपर्सकडे तक्रार केली होती. त्या वेळी तुम्ही हे घर खरेदी करा. पेमेंट मिळाल्यावर हा कचरा हटवण्याची जबाबदारी माझी राहील असे तो म्हणाला. पण कचऱ्याचा ढिग आहे तसाच आहे. एवढ्या रकमेत या परिसरात घर मिळणे कठीण आहे. एवढेच नव्हे, तर त्या परिसरात साधा पक्का रस्ताही नाही. कच्चे रस्ते आहेत, तरीही आम्ही कमी पैशात मिळते, म्हणून घेतले आणि आमची फसवणूक झाली, असे या जोडप्याचे म्हणणे आहे.




## जिद्दीच्या बळावर...

वयाच्या ७१ व्या वर्षी बहुसंख्य लोक आराम करत असतात. निवृत्तीनंतर आपल्या आवडीनिवडी जपत असतात. कोणी वाचन करतं, कोणी भटकंती करतं. कोणाला इतर काही छंद असतात. पण या वयात बॉडिबिल्डिंगचा विचार कोणीच करत नाही. उतारवयात शरीर साथ देत नसताना शरीरसौष्ठवाकडे कोण वळणार? मात्र सध्या ८२ वर्षांच्या असणाऱ्या अर्नेस्टाइन शेफर्ड यांनी वयाच्या ७१ व्या बॉडीबिल्डिंग सुरू केलं. त्यांच्यात तरुणांनाही लाजवेल असा उत्साह आहे. अकरा वर्षांच्या असताना एका अपघातात त्यांच्या गुडघ्याला दुखापत झाली होती. गुडघ्याचं हाड मोडलं. ते नंतर नीट जुळलंच नाही. यामुळे त्यांचा एक पाय थोडा अधू राहिला. डॉक्टरांनी त्यांना फारसा व्यायाम न करण्याचा सल्ला दिला होता. पण त्यांनी कोणाचं काहीच ऐकलं नाही. ७१ व्या वर्षी त्यांशी भरपूर व्यायाम करून शरीर सुडौल बनवलं आणि बॉडीबिल्डिंगच्या विश्वात प्रवेश केला. पन्नाशीपर्यंत त्या गृहिणीच होत्या. एके दिवशी कुटुंबासोबत फिरायला गेल्या असताना त्यांच्या पतीने त्यांना स्वीमसूट



घालायला सांगितला. त्यावेळी त्यांच्यासोबत असणाऱ्या शेफर्ड यांच्या बहिणीनेही स्वीमसूट घातला. या दोघी एकमेकींकडे पाहून हसू लागल्या. त्या खूपच बेढब दिसत होत्या. मग त्यांनी व्यायाम करण्याचा निर्णय घेतला. मधल्या काळात शेफर्ड यांच्या बहिणीचं निधन झालं. मात्र त्या मागे हटल्या नाहीत. ७१ व्या वर्षी प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी सरावाला सुरूवात केली. सात महिने सराव केल्यानंतर पहिल्या बॉडीबिल्डिंग स्पर्धेत सहभागी व्हायला त्या तयार झाल्या. पहिलीच स्पर्धा त्यांनी जिंकली. आता त्या प्रौढ महिलांना बॉडीबिल्डिंगचं प्रशिक्षण देतात.



## मांसभक्षक रोपटी

काही झाडं मांसभक्षक असतात. कॅनडातल्या शास्त्रज्ञांनी देशातल्या दुर्गम भागात अशा रोपट्याचा शोध लावला आहे. हे रोपटं पालीसारख्या दिसणाऱ्या सॅलामेंडर नावाच्या प्राण्याला खातं. इथल्या ॲल्गॉनकुइन पार्कमध्ये हे रोपटं सापडलं आहे. या पार्कमध्ये विविध प्रजातींची रोपटी आणि प्राणी आहेत. गेल्या दोन वर्षांपासून या परिसरात संशोधन सुरू आहे. युनिव्हर्सिटी ऑफ गुएल्फचे शास्त्रज्ञ संशोधन करत आहेत. त्यांनी कॅनडामध्ये १४४ मांसभक्षी रोपटी पाहिली आहेत. अशाप्रकारे मांसभक्षी रोपट्यांची आजवर कल्पनाच केली गेली होती. मात्र आता अशी रोपटी जगासमोर आली आहेत. पिटफॉला ट्रॅप या नावानेही हे रोपटं ओळखलं जातं. संशोधकांच्या टिमने ऑगस्ट आणि सप्टेंबर २०१८ मध्ये अशा ५८ रोपट्यांचा शोध लावला यातल्या २० टक्के रोपट्यांच्या आत सॅलामेंडरची पिल्लं अडकली होती. काही रोपट्यांमध्ये एकापेक्षा अधिक सॅलामेंडर होते. काही सॅलामेंडर जिवंत होते तर काहींचा तीन दिवसातच मृत्यू झाला होता. नायट्रोजन मिळवण्यासाठी ही रोपटी मांसभक्षक बनली असल्याचं शास्त्रज्ञांचं म्हणणं आहे.



## फी नको, प्लास्टिक बाटल्या द्या

सध्या सगळीकडेच प्लास्टिकमुक्तीसाठी योजना राबवल्या जात आहेत. प्लास्टिकचा कचरा कमी करण्यासाठी बऱ्याच कल्पना लढवल्या जात आहेत. याचाच एक भाग म्हणून नायजेरियातल्या एका शाळेने मुलांकडून फी म्हणून प्लास्टिक बाटल्या घ्यायला सुरूवात केली. त्यामुळे मुलांना दप्तरासोबतच प्लास्टिक बाटल्यांनी भरलेली पिशवीही न्यावी लागते. या बाटल्यांचं वजन केल्यानंतर मिळणारी किंमत त्यांच्या एकूण फीमधून वजा केली जाते. या उपक्रमामुळे कुटुंबावरचा आर्थिक बोजा कमी झाला शिवाय देशही प्लास्टिकमुक्तीच्या दिशेने वाटचाल करू लागला. आफ्रिकन क्लीन अप मोहिमेअंतर्गत हा उपक्रम राबवण्यात येत असून रिसायकलिंग करणाऱ्या संस्थांचं सहकार्यही यासाठी घेतलं जात आहे. इथल्या मॉरिट इंटरनॅशनल स्कूलने यासाठी पुढाकार घेतला आहे. इतर काही शाळांमध्येही अशाप्रकारे प्लास्टिक बाटल्या स्वीकारल्या जातील. आर्थिक बोजा कमी झाल्यामुळे पालकही खूश आहेत. मुलांनाही आता शिक्षण अर्धवट सोडावं लागणार नाही. म्हणजेच एकाच योजनेमुळे दोन लाभ झाले आहेत.

## स्मार्टफोन ठेवा बाजूला!

स्मार्टफोनच्या वाढत्या वापरामुळे लोकांमधला परस्पर संवाद कमी होत चालला आहे. जेवणाच्या टेबलवरही लोक मोबाईलशीच खेळत असतात. कोणी चॅट करत असतं तर कोणी व्हिडिओ बघत असतं.



यामुळे कुटुंब, मित्रमैत्रिणी यांच्यातला संवाद कमी होत चालला आहे आणि विसंवाद वाढत चालला आहे. याबद्दल बरीच ओरड होत असली तरी लोक मोबाईलचा वापर करत रहातात. अमेरिकेतल्या एक पिझ्झा रेस्टॉरंटने यावर एक नामी उपाय शोधून काढला आहे. इथे येणाऱ्या ग्राहकांनी आपला फोन लॉकरमध्ये जमा करायचा आणि मोफत पिझ्झा खायचा अशी ही ऑफर आहे. कंपनी एक पिझ्झा मोफत देते. लोकांमधला संवाद वाढणं गरजेचं असल्यामुळे आम्ही हा उपक्रम सुरू केल्याचं रेस्टॉरंट व्यवस्थापनाचं म्हणणं आहे. काही काळ तरी लोकांनी मोबाईलपासून दूर रहायला हवं. यासाठी त्यांना थोडी प्रलोभनं दाखवणं गरजेचं आहे. या रेस्टॉरंटमध्ये आलेल्या मोठ्या गटाला ही सवलत मिळते. या गटातल्या प्रत्येकाने आपला मोबाईल लॉकरमध्ये जमा करायचा असतो. साधारण तीन आठवड्यांपूर्वी हा उपक्रम सुरू झाला. त्याला चांगला प्रतिसाद मिळतो आहे. लोकांनी मोबाईल न वापरण्याची सवय कायम ठेवावी, असं कंपनीचं म्हणणं आहे. खरं तर मोबाईलचा वापर कमी करायचा असं प्रत्येकाने ठरवायला हवं. मात्र त्यासाठी अशी प्रलोभनं दाखवण्याची वेळ येणं ही धोक्याची घंटा म्हणायला हवी.

## कारवाई कंपनीच्या अंगलट

कंपनीने केलेली कारवाई त्याला महागात पडली. मेट्रो वेबसाइटच्या रिपोर्टनुसार, १८ वर्षांची मुलगी एलिझाबेथ बेनासी एका ब्रिटिश कंपनीत नव्याने भरती झाली होती आणि तिने तिथे मेहनतीने काम केले; मात्र तीन महिन्यांनंतर तिच्यासोबत असे काही घडले, की कंपनीने तिला नोकरीवरून काढून टाकले आणि त्यावर तिने स्पोर्टस्? शूज घालून ऑफिसमध्ये आल्याचे स्पष्ट केले. त्यामुळे तिच्यावर ही कारवाई करण्यात आली.


मुलीला कंपनीचा हा निर्णय मान्य नव्हता. त्यानंतर तिने याबाबत न्यायालयात धाव घेतली. न्यायालयात एलिझाबेथ या मुलीने न्यायाधीशांना सांगितले, की लोक स्पोर्टस्? शूज घालून ऑफिसमध्ये जात नाहीत, हे मला माहीत नव्हते. तथापि, माझ्या या चुकीबद्दल माझ्या बॉसने मला फटकारले आणि माझ्याशी असे वागले. जणू काही मी नोकरदार नसून लहान मुलगी आहे. याशिवाय न्यायाधीशांसमोर जबाब देताना तरुणीने तिथे काम करणारे लोक मला अनेकदा टार्गेट करत असतात, असे सांगितले. तिच्या वयामुळे आपल्याला पीडित बनवले जात असल्याच्या कारणावरुन त्याने कंपनीवर दावा दाखल केला; मात्र त्याची कामगिरी चांगली नसल्यामुळे त्याला नोकरीवरून काढून टाकण्यात आल्याचे कंपनीने न्यायालयात आपले म्हणणे मांडले. दोन्ही पक्षांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर न्यायाधीशांनी मुलीच्या बाजूने निकाल दिला. कंपनीने आपल्या सर्व कर्मचाऱ्यांना समान वागणूक द्यायला हवी, इतर कर्मचारीही स्पोर्टस्? शूज घालून कार्यालयात येत असताना मग एलिझाबेथला तशीच वागणूक का नाही, असे न्यायालयाने विचारले. या प्रकरणात एलिझाबेथला ३२ लाख रुपयांची भरपाई द्यावी, असे आदेश न्यायालयाने दिले.



## हिवाळ्यात पाऊस का पडतो?

दिल्ली-एनसीआरसह देशातील अनेक भागात पाऊस पडत आहे. पावसामुळे थंडी आणखी वाढली आहे. हवामान खात्याने पावसासाठी ऑरेंज अलर्ट जारी केला आहे.

साधारणत: उन्हाळ्यात वाढत्या तापमानात वाढत्या आर्द्रतेमुळे पावसाळी परिस्थिती निर्माण होते; पण डिसेंबर महिन्यात पाऊस का पडतो, असा प्रश्न



पडतो. हिवाळ्यातही पाऊस पडतो; पण तो फारच कमी असतो. यामागेही एक कारण आहे. हिवाळ्यात पडणाऱ्या पावसाला जबाबदार कोण, या पावसाचा फायदा कोणाला होणार आणि कोणाचे नुकसान होणार हे जाणून घेऊया. हिवाळ्यात पाऊस पडण्याचे कारण म्हणजे वेस्टर्न डिस्टर्बन्स. भूमध्य प्रदेशात कमी दाबाचे वादळ निर्माण होते. त्याचे वारे उत्तर-पश्चिम दिशेला जातात आणि वातावरणासोबत पाऊस आणि बर्फवृष्टी निर्माण करणारी परिस्थिती निर्माण होते. धुके वाढते. धुके आणि हिमवर्षाव होतो; परंतु दरवर्षी पाऊस पडतोच असे नाही.

हिवाळयात पडणाऱ्या पावसाचा थेट परिणाम तापमानावर होतो. हिमालयीन प्रदेशातून येणाऱ्या थंड हवेमुळे मैदानी भागात तापमान आणखी घसरते. अशा प्रकारे तापमान घसरल्याने थंडी वाढते. साधारणपणे हिवाळ्यात कोरडेपणा असतो; पण पाऊस पडल्यानंतर आर्द्रतेचे प्रमाण वाढते. त्यामुळे थंडी आणखी वाढते. यामुळेच अशा हवामानात अधिक सतर्क राहण्याचा सल्ला देण्यात आला आहे.

या पावसाचा थेट फायदा रब्बी पिकांना होतो. रब्बी पिकासाठी पाऊस अत्यावश्यक मानला जातो. यामुळे शेतात ओलावा टिकून राहतो. पावसामुळे पोषक द्रव्ये जमिनीत विरघळतात, जी झाडांपर्यंत पोचतात; मात्र मर्यादित प्रमाणात पाऊस पडल्यासच फायदा होतो. पावसामुळे जड कण कमी होतात आणि हवेची गुणवत्ता सुधारते. पावसाळ्यानंतर नद्या आणि तलावांची पाणी पातळी हळूहळू कमी होत जाते. हिवाळ्यात पावसाचे फायद्यांसोबतच काही तोटेही आहेत. विशेषतः डोंगराळ भागात पावसामुळे भूस्खलनाचा धोका वाढतो. वाहतुकीचा वेग मंदावतो. दळणवळणात अडथळे निर्माण होतात हिवाळ्यातील पावसामुळे हवेतील आर्द्रता वाढते, ज्यामुळे धुके अधिक दाट होऊ शकते.



## उंदरांसाठी बांधलं घर

आजच्या युगात प्रत्येक जण स्वत:च्या स्वार्थाचा विचार करतो. या पृथ्वीवर रहाणाऱ्या इतर जीवजंतूंबाबत फारसा विचार केला जात नाही. या पृथ्वीतलावरचे अनेक जीव आज नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. झाडं तोडली जात आहेत. मात्र अशा परिस्थितीतही काही लोक धीर सोडायला तयार नाहीत. ही मोजकी मंडळी पर्यावरण वाचवण्यासाठी झटत असतात. इतरांनाही आधार देतात. ब्रिटनमधला प्रसिद्ध वाईल्ड लाईफ फोटोग्राफर सायमन अशाच काही लोकांपैकी एक. त्यांनी आपल्या घराच्या बागेत उंदरांसाठी घर तयार के लं आहे. इथे राहणाऱ्या उंदरांना ते फळं आणि इतर खाद्यपदार्थ देतात. एके दिवशी बागेत काम करत असताना डेल यांना उंदिर दिसला. तेवढ्यात एक मांजर आलं. हे मांजर उंदराकडे बघत होतं. मांजर उंदराची शिकार करणार असल्याचं बघून त्यांनी घरातून एक बॉक्स आणला आणि उंदरासाठी घर तयार केलं. डेल यांनी उंदराचं नाव जॉर्ज ठेवलं. हा जॉर्ज या घरात रहायला आला. त्यानंतर इतर काही उंदिर रहायला आले. त्यांचं कुटुंब वाढत गेलं. मग डेल यांनी अजून खोल्या तयार केल्या. या खोल्या आतून एकमेकांशी जोडलेल्या आहेत. आता इथे भरपूर उंदिर आहेत. उंदरांचं गावच इथे वसलं आहे.

## भाजपतर्फे सदस्य नोंदणी कार्यक्रमाचा शुभारंभ

# त्यामुळेच मी तीन वेळा मुख्यमंत्री




■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ५ :
भारतीय जनता पक्ष हा जगातील पहिल्या क्रमांकाचा पक्ष असून त्यात वरपासून खालपर्यंत लोकशाही पद्धतीने कामकाज चालते. त्यामुळेच सामान्य कार्यकर्ता हा सर्वोच्च पदापर्यंत पोहोचू शकतो, एक साधा चहा विक्रेता देशाचा पंतप्रधान होऊ शकला आणि मीसुद्धा तीन वेळा मुख्यमंत्री होऊ शकलो ते केवळ आणि केवळ पक्ष आणि कार्यकर्त्यांमुळेच, त्यामुळे पक्षात संघनेला अधिक महत्व आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडवीस म्हणाले.

नागपूरमध्ये रविवारी शहर भाजपतर्फे आयोजित पक्षाच्या सदस्य नोंदणी कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी त्यांच्या हस्ते बुथपातळीवर उत्तमप्रकारे नोंदणी करणाऱ्या काही कार्यकर्त्यांचा सत्कार करण्यात आला. हा धागा पकडून फडणवीस यांनी कार्यकर्ते, संघटना आणि सत्ता याची सांगड कशी घातली जाते व यात कार्यकर्ता हा किती महत्वाचा असतो हे सांगितले.

फडणवीस म्हणाले, भारतीय जनता पक्ष. भाजप हा देशातील पहिल्या क्रमांकाचा पक्ष आहे. ११ कोटी सदस्यांची नोंदणी झाली आहे. बाकी सर्व पक्ष खासगी आहे. कुठल्या तरी कुटुंबाशी त्यांची बांधिलकी आहे. भाजप मात्र कार्यकर्त्यांचा पक्ष आहे. वरपासून खालपर्यंत लोकशाही पद्धतीने येथे नेत्यांची निवड केली जाते.

कार्यकर्त्यांतून नेत्याची निवड केली जाते. त्यामुळेच एक चहा विक्रेता प्रथम गुजरातचा मुख्यमंत्री आणि नंतर देशाचा पंतप्रधान होऊ शकला. मीसुद्धा एक सामान्य कार्यकर्ता म्हणून राजकीय जीवनाला सुरुवात केली. व मुख्यमंत्रीपदापर्यंत पोहोचलो. तीनवेळा या पदावर जाण्याचा सन्मान केवळ कार्यकर्त्यांमुळे मिळाला असे फडणवीस म्हणाले. कार्यकर्त्यांमुळेच भाजपला महाराष्ट्रात सलग तीन निवडणुकांमध्ये शंभरहून अधिक जागा मिळाल्या. याकडे त्यांनी लक्ष वेधले.

### महाराष्ट्रात विक्रमी नोंदणी

भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे.पी. नड्डा यांना दीड कोटी सदस्य करण्याचे आश्वासन दिले आहे. सध्या एक कोटी सदस्य नोंदणी आहे. ती दीड कोटी करणे अशक्य नाही. डिजिटल नोंदणीमुळे हे काम अधिक सोपे झाले आहे. डिजिटल नोंदणीमुळे कार्यकर्त्यांचे संपर्क नंबर पक्षाकडे नोंदवला जातो व त्या माध्यमातून पक्षाची ध्येयधोरणे त्यांच्यापर्यंत पोहचवणे शक्य होते. ादस्य नोंदणीच्या माध्यमातून संपर्क केला जात आहे, त्यापुढची पायरी ही संवादाची आहे, असे फडणवीस म्हणाले.

### नागपूर महानगराचे सात लाखाचे लक्ष्य

नागपूर महानगर भाजपने सात लाख सदस्य नोंदणीचे लक्ष्य निर्धारित केल्याचे पक्षाचे शहर अध्यक्ष बंटी कुकडे यांनी सांगितले. प्रत्येक विधानसभा मतदारसंघातून प्रत्येकी एक लाख आणि संपूर्ण महानगरातून एक लाख असे एकूण सात लाख सदस्य नोंदवण्यात येणार असल्याचेही सांगण्यात आले.

## भाजप बारा वर्षांपासून झुलवत ठेवते आहे...

### रामदास आठवले यांची उघड नाराजी



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ५ :
आम्ही काँग्रेससोबत असताना त्यांनी सहा ते सात विधान परिषदेच्या जागा दिल्या होत्या. भाजप बारा वर्षांपासून फक्त मला मंत्रिपद देते. परंतु, माज्या पक्षाला एकही विधान परिषदेची जागा आणि मंत्रिपद दिले नाही अशी नाराजी केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री रामदास आठवले यांनी येथे माध्यमांशी बोलताना व्यक्त केली.

लोकसभा निवडणुकीवेळी आम्हाला जागा मिळाल्या नाही. विधानसभेत तीन ते चार जागा मिळतील याची अपेक्षा होती. मात्र एकही जागा मिळाली नाही. त्यामुळे कार्यकर्त्यांमध्ये नाराजी आहे, अशी खंत रामदास आठवले यांनी व्यक्त केली.

देवेंद्र फडणीस मुख्यमंत्री झाले. त्याबद्दल त्यांचे अभिनंदन. मात्र त्यांनी अनेकवेळा आम्हाला विधानपरिषद आणि मंत्रीपद देण्याचे आश्वासन दिले. आम्ही विधानसभा निवडणुकीत सांगितले होते की जागा देत नसाल तर आम्हाला मंत्रिमंडळात पहिल्यांदा सन्मान द्या.

मागच्या मंत्रिमंडळ विस्तारावेळी सांगितले होते की, तुम्हाला मंत्रिपद देवू. मात्र अडीच वर्ष मंत्रिमंडळ विस्तार झाला नाही. यामुळे आमच्या कार्यकर्त्यांना संधी मिळाली नाही. आणि आताही मंत्रिमंडळात स्थान दिले नाही, अशा शब्दांत रामदास आठवले यांनी नाराजी व्यक्त केली.

आम्ही प्रामाणिकपणाने महायुती आणि भाजपसोबत बारा वर्षांपासून आहोत. आमचा पक्ष मोठा आहे. मात्र आमच्या पक्षात कुठल्या कार्यकर्त्यांना मंत्रीपद मिळत नाही ही बाब मनाला दुःख देणारी आहे. मंत्रिमंडळ विस्तारात रिपब्लिकन पक्षाचा विचार न केल्याने आमच्या पक्षात नाराजी आहे. आमचा पक्ष तुमच्यासोबत असताना असे करत असाल तर ही बाब गंभीर आहे.

### उमेदवारही त्यांचाच आणि चिन्हही त्यांचेच

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीमध्ये भाजपने आम्हाला काही जागा देणे आवश्यक आहे. नागपूर महानगरपालिकेच्या निवडणुकीमध्येही आम्ही काही जागांची मागणी केली आहे. परंतु, यावेळी आम्हाला निवडणुकीत वाटा मिळाला नाही तर आम्ही स्वबळावर काही जागा लढू आणि अन्य जागांवर भाजपला पाठिंबा देऊ. भाजपने विधानसभेत काही जागा दिल्या. परंतु उमेदवारही त्यांचाच आणि चिन्हसुद्धा त्यांचेच होते. त्यामुळे असे चालणार नाही असे आठवले म्हणाले.

### भाजप आमचा विचार करत नाही

मंत्रिपदासाठी आमची भाजपाध्यक्ष जे. पी. नड्डा आणि अमित शाह यांच्यासोबत बोलणे झाले होते. तेव्हा शाह यांनी देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत बोलण्यास सागितले. फडणवीस यांनी दिलेला शब्द पाळला नाही. आमच्या कार्यकर्त्यांनी महायुतीचे काम केले. त्यामुळे आमची नाराजी आहे. पंतप्रधान मोदी यांचे काम पाहून आम्ही त्याच्यांसोबत आहोत. मात्र भाजप आमचा विचार करीत नाही, अशी नाराजी आठवले यांनी व्यक्त केली.

## जरांगे वैफल्यग्रस्त, त्यांच्या डोक्यात फरक..



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ५ :
मराठा आरक्षणाचे नेते मनोज जरांगे पाटील संतोष देशमुख प्रकरणावरुन आक्रमक झाले आहेत. त्यांनी संतोष देशमुख यांचे कुटुंबिय आणि त्यांचे भाऊ धनंजय देशमुख यांच्या केसाला जरी धक्का लागला तर धनंजय मुंडे यांना रस्त्यावरही फिरू देणार नाही, असा इशारा मनोज जरांगे पाटील यांनी दिला आहे.

यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सरकारमधील राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांनी जोरदार उत्तर दिले आहे. त्यांनी मनोज जरांगेवर जहरी टीका केली आहे. मनोज जरांगे वैफल्यग्रस्त झाले आहेत. त्यांच्या डोक्यात फरक पडला आहे, असे अॅड . आशिष जयस्वाल म्हणालेत.

मनोज जरांगे यांच्या वक्तव्यावर पुढे बोलताना राज्यमंत्री आशिष जयस्वाल म्हणाले, मनोज जरांगे यांच्या डोक्यात फरक पडला आहे. ते वैफल्यग्रस्त झाले आहेत. त्यांच्या बोलण्याकडे कोणी लक्ष देऊ नका, अशा शब्दात जहरी टीका त्यांनी केली आहे.

संतोष देशमुख हत्या प्रकरणाचा तपास योग्य दिशेने सुरु आहे. कायदा आपले काम करणार आहे. यासंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यापूर्वीच स्पष्टीकरण दिले आहे, असे जयस्वाल यांनी म्हटले.

दरम्यान, जरांगे यांच्यावर ज्येष्ठ वकील गुणरत्न सदावर्ते यांनीही टीका केली आहे. मृत व्यक्तीवर राजकारण केली जात आहे. मनोज जरांगे रस्त्यावर फिरु न देण्याची भाषा करत आहे. असे बोलणे असंस्कृतपणा आहे. मनोज जरांगे आणि सुरेश धस यांच्यावर कारवाई होण अपेक्षित आहे.

## पुन्हा घसरली आमदाराची जीभ

■ महासागर प्रतिनिधी, बुलढाणा, दि. ५ :
यापूर्वी अनेकदा वाद निर्माण करणारे वक्तव्य करणारे आमदार संजय गायकवाड यांनी मतदारांना शिव्यांची लाखोली वाहिली आहे. राजस्थानमधील जयपूरमध्ये जाऊन मतदारांसंदर्भात आक्षेपार्ह शब्द वापरले आहेत. मतदारांपेक्षा XXX बऱ्या, मतदारांना फक्त दारू, मटण पाहिजे, मतदार विकले गेले आहेत, अशा आरोप संजय गायकवाड यांनी केला.



आमदार संजय गायकवाड यांचा जयपूर येथे दोन दिवसांपूर्वी सत्कार कार्यक्रम झाला. त्यावेळी बोलताना त्यांनी आपल्याला मतदान कमी मिळाले यामुळे खंत व्यक्त केली.

तुम्हाला फक्त दारू, मटण, पाचशे रुपये पाहिजे. मतदार दोन दोन हजारात विकले गेले, असे म्हणत यांच्यापेक्षा XX बऱ्या अशा शब्दात त्यांनी संताप व्यक्त केला . त्यांचा तो व्हिडिओ आता व्हायरल झाला आहे.

## हा निवडणूक 'जुमला' होता का?


■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ५ :
विधानसभा निवडणुकीच्या आधी आम्ही मराठी भाषेचे कसे तारक आहोत, याचे ढोल वाजवले गेले. मात्र मोदी सरकारने मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्यासंदर्भातला अध्यादेश काढला नाही. तर महाराष्ट्र सरकार देखील त्या संदर्भात पाठपुरावा करताना दिसत नसल्याचा आरोप खासदार संजय राऊत यांनी केला आहे.



मोदींनी ट्विटरवर घोषणा केली आणि राज्यातील मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांनी पेढे वाटले. मात्र, प्रत्यक्षात अजूनही अध्यादेश निघाला नाही. विधानसभा निवडणुकीत मराठी भाषेला अभिजात दर्जा देण्याचा हा केवळ निवडणुकीपूर्ती 'जुमला' होता का? मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याची जी घोषणा मोदी सरकारने केली त्याबाबत नैराश्य दिसत असल्याचा आरोप राऊत यांनी केला.

## अॅड. प्रणव देशमुखला लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्सची पदवी





■ महासागर प्रतिनिधी, यवतमाळ, दि. ५ :
लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स अँड पॉलिटिकल सायन्सेस या विश्वविख्यात विद्यापीठात नुकत्याच झालेल्या दीक्षांत समारंभामध्ये अॅड. प्रणव विवेक देशमुख यास विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. एरिक न्यूमेयर यांच्या हस्ते इंटरनॅशनल सोशल अँड पब्लिक पॉलिसी या अभ्यासक्रमाची पदवी प्रदान करण्यात आली. सदर पदव्युत्तर पदवी त्याने गुणवत्तेसह मेरिटमध्ये प्राप्त केली आहे.

द टाइम्स आणि द संडे टाइम्स गुड युनिव्हर्सिटी गाइडने लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्सला २०२५ साठी यूकेमधील ऑक्सफर्ड आणि केंब्रिज या विद्यापीठांना मागे टाकून सर्वोच्च विद्यापीठ म्हणून स्थान दिले आहे. आजवर या विद्यापीठाने चाळीसहुन अधिक जागतिक नेते व वीस नोबेल पारितोषिक विजेते दिले आहेत.

याच विद्यापिठात १९२३ मध्ये भारत रत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी द प्रॉब्लम ऑफ द रूपी या विषयावर त्यांचा पीएचडी प्रबंध सादर केला होता. दीक्षांत समारंभानंतर अॅड. प्रणवने विद्यापीठातील डॉ. आंबेडकर यांच्या पुतळ्याला श्रद्धांजली वाहून १०, किंग हेन्रीह्लज रोड येथील 'आंबेडकर हाउस' येथे भेट दिली.

अॅड. प्रणवने महाराष्ट्रातील स्वयंसेवी संस्थेच्या प्रशासनासाठी संरचने मधील सुधारणा व कायदेशीर त्रुटींवर प्रकाश या विषयावर आपला प्रबंध सादर केला. या प्रबंधात, त्याने शासकीय कार्यक्षमतेचा अभाव व नियमांतील विसंगतींचे विश्लेषण करून समान स्वयंसेवी संस्थेच्या कायद्याची गरज मांडली आहे.

महाराष्ट्रातील सध्याच्या सामाजिक परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर, सरकारी धोरणांच्या कार्यक्षम अंमलबजावणीसाठी स्वयंसेवी संस्थांचे कार्य गाव पातळीवर नेऊन कसे बळकट करता येईल या बद्दल कारण मीमांसा केलेली आहे.

अॅड. प्रणव याने शालेय शिक्षण फ्री मेथोडिस्ट इंग्लिश स्कूल, यवतमाळ, कनिष्ट महाविद्यालयीन शिक्षण विदर्भ महाविद्यालय, अमरावती, कायद्याची पदवी डि.ई.एस विधी महाविद्यालय पुणे व पदव्युत्तर पदवी टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस, मुंबई येथून पूर्ण केले . अॅड. प्रणव याने नागपूर खंडपीठात उच्च न्यायालयात विविध रिट व सार्वजनिक हित याचिका दाखल करून वंचित घटकांच्या हक्कांसाठी सुद्धा काम केले असून, धोरणनिर्मितीच्या क्षेत्रात सकारात्मक काम करण्याच्या हेतूने त्याने लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स मध्ये जाऊन शिकण्याचा मार्ग पत्करला.

अॅड. प्रणव याने, महाराष्ट्रातील गरजू आणि वंचित घटकांसाठी मोफत कायदेशीर मदत आणि नाविन्यपूर्ण धोरणे अंमलात आणून समाजात सकारात्मक बदल घडवण्याचा मानस व्यक्त केला आहे. अॅड. प्रणव हा यवतमाळ येथील प्रा. डॉ. विवेक देशमुख व प्रा. प्रतिभा देशमुख यांचा मुलगा असून फिल्मफेयर व राष्ट्रीय पुरस्कार विजेते दिग्दर्शक प्रांतिक देशमुख यांचा लहान भाऊ आहे.

## लोकार्थ

### बी आर गोयल इन्फ्रास्ट्रक्चरचा आयपीओ ७ जानेवारी रोजी उघडणार




बी आर गोयल इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड ही रस्ता बांधणी आणि इन्फ्रास्ट्रक्चर प्रकल्पांमध्ये ईपीसी कंत्राटदार आणि बांधकाम सेवा पुरवठादार म्हणून विशेष कार्यरत आहे. कंपनीने ७ जानेवारी २०२५ रोजी तिच्या प्राथमिक सार्वजनिक ऑफरिंगचा अर्थात आयपीओ चा प्रस्ताव ठेवलेला आहे.

कंपनीने ६३,१२,००० इक्विटी शेअर्सच्या ताजा इश्यूद्वारे ८५. २१ कोटी उभारण्याचा उद्देश ठेवलेला आहे. जे बीएसई आणि एसेमी प्लॅटफॉर्मवर सूचिबद्ध केले जाणार आहे. इश्यू आकार ६३,१२,००० इक्विटी शेअर्स असणार आहे. प्रत्येकाचा फेस व्हॅल्यू १० रुपये असून शेअरची किंमत बँड १२८ ते १३५ रुपये शेअर आहे. आयपीओ मधून मिळालेल्या निव्वळ उत्पानांचा वापर भांडवली खर्च, कार्यशील भांडवलाच्या आवश्यकतेसाठी, अधिग्रहण आणि इतर धोरणात्मक उपक्रमांसाठी अजैविक वाढीच्या खर्चासाठी आणि इतर सामान्य कॉर्पोरेट उद्दिष्टांसाठी कंपनी करणार आहे. अँकर ब्रीडिंग ६ जानेवारी २०२५ रोजी सुरु होईल आणि इश्यू ९ जानेवारी २०२५ रोजी बंद होईल. ■ ■ ■

### एमआयसी इलेक्ट्रोनिक्सची उपकंपनी SOA इलेक्ट्रोनिक्स ट्रेडिंग एलएलसी मध्ये गुंतवणूक पूर्ण

एमआयसी इलेक्ट्रोनिक्स लिमिटेड एलईडी व्हिडीओ डिस्प्लेच्या डिझाईन, विकास आणि उत्पादनात जागतिक आघाडीवर असलेल्या कंपनीने दुबईस्थित उपकंपनी सुश्री रडअ इलेक्ट्रोनिक्स ट्रेडिंग एल एलसीजी उपकंपणी इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रॉनिक उपकरणे मध्ये तसेच स्पेअर पार्टस मध्ये उपकंपनी मध्ये 51 कोटींची गुंतवणूक करण्याची घोषणा केली.

अलीकडेच, कंपनीला कंपनीच्या जीपीएस लोकेशन आधारित पब्लिक अॅड्रेस अँड पॅसेंजर इन्फॉर्मेशन सिस्टीम आणि एसी आणि नॉन-एसी रेल्वे डब्यांमधील एल ई डी डेस्टिनेशन बोर्डच्या क्षमतेसह क्षमता मूल्यांकन साठी मान्यता मिळाली आहे. कंपनीने पुढे MICK डिजिटल इंडिया लिमिटेड नावाची पूर्ण मालकीची उपकंपनी समाविष्ट केली. उपकंपनी सर्व प्रकारच्या स्मार्ट मीटर्स, डिजिटल मीटर्स, रूफ माउंटेड एसी पॅकेज युनिट्स, एकात्मिक वीज पुरवठा सिस्टम्स, मिनी कॉम्प्युटर्सचे उत्पादन आणि व्यवहार करेल. मायक्रोप्रोसेसर आधारित प्रणाली आणि संगणक परिधीय असेल.

एम आय सी इलेक्ट्रोनिक्स लिमिटेड ही एल ई डी व्हिडिओ डिस्प्ले, हाय-एंड इलेक्ट्रॉनिक आणि टेलिकम्युनिकेशन उपकरणांची रचना, विकास आणि निर्मिती आणि 1988 पासून दूरसंचार सॉफ्टवेअरच्या विकासामध्ये जागतिक आघाडीवर आहे. ■

### क्वॉड्रंट फ्यूचर टेक लिमिटेडचा आयपीओ ७ जानेवारी पासून खुला

क्वॉड्रंट फ्यूचर टेक लिमिटेड कंपनीने येत्या ७ जानेवारी पासून आयपीओच्या माध्यमातून खुली समभाग विक्री सुरु करण्याची घोषणा केली आहे. आयपीओ ऑफर गुरुवार ९ जानेवारी रोजी गुंतवणुकीसाठी बंद होईल. कंपनीच्या आयपीओद्वारे विक्रीस काढण्यात आलेल्या प्रत्येक समभागाचे फेस व्हॅल्यू रु. 10/- आहे. तसेच आयपीओ विक्रिसाठी प्राईस बँड प्रतिसमभाग रु. २७५/- ते रु. २९०/- निश्चित केल्याचीही घोषणा कंपनीने केली आहे. गुंतवणूकदार किमान ५० समभागांच्या एका लॉटसाठी व त्यापुढे ५० समभागांच्या पटीत गुंतवणुकीसाठी बीड करु शकणार आहेत. प्रत्येक समभागाचे फ्लोअर प्राईस समभागाच्या फेस व्हॅल्यूच्या २७.५ पट आहे तर कॅप प्राईस २९ पट आहे. क्वॉड्रंट फ्यूचर टेक कंपनीचा आयपीओ पूर्णतः फ्रेश इश्यू आहे. म्हणजे कंपनीने नवे शेअर विक्रीस काढले आहेत. त्यातून रु. २,९०० दशलक्ष रुपये भांडवल उभारण्यात येणार आहेत. नव्या शेअरच्या विक्रीतून उभारण्यात आलेल्या भांडवलापैकी रु. १४९७.२२ दशलक्ष रुपये कंपनीच्या स्पेशालीटी केबल डिव्हिजन विभागाच्या दीर्घकालीन खेळत्या भांडवलाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी वापरण्यात येणार आहे. ■

### हाय-टेक पाईप्सने गाठले विक्रीचे सर्वोच्च परिमाण

हाय टेक पाईप्स लिमिटेड भारतातील स्टील ट्यूब्स आणि पाईप्सची आघाडीची उत्पादक कंपनी, आर्थिक वर्ष 25 ला संपलेल्या तिसऱ्या तिमाहीत आणि नऊ महिन्यांतील अपवादात्मक विक्री कामगिरी जाहीर करताना आनंदी आहे.

कंपनीने आर्थिक वर्ष २०२५ च्या तिमाहीसाठी १,२४,२३३ MT ची आतापर्यंतची सर्वोच्च विक्रीची मात्रा गाठली आहे, जी वर्ष-दर-वर्ष २६.१०% ची प्रभावी वाढ दर्शवते.

आर्थिक वर्ष २०२५ ला संपलेल्या नऊ महिन्यांसाठी, विक्रीचे प्रमाण ३,६९ ४१५ MT पर्यंत वाढले, जे ३०.३३% वार्षिक वाढ दर्शवते.

या वाढीमध्ये महत्त्वपूर्ण योगदान कंपनीच्या सोलर टॉर्क ट्यूब्सचा होता, ज्यांनी विक्रीचे प्रमाण वाढवण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. भारतातील सौरऊर्जा क्षेत्राच्या झपाट्याने विस्तारामुळे या उच्च दर्जाच्या उत्पादनांना मागणी वाढत आहे. त्यांच्या टिकाऊपणा, सुस्पष्टता आणि कठोर उद्योग मानकांचे पालन यासाठी ओळखले जाते. मोठ्या प्रमाणात सौर ऊर्जा प्रकल्पांसाठी हाय-टेक पाईप्सच्या सोलर टॉर्क ट्युबला पसंती मिळाली आहे. नूतनीकरणक्षम ऊर्जा क्षेत्रातील भक्कम कामगिरी व्यतिरिक्त, हाय-टेक पाईप्सने पायाभूत सुविधा आणि बांधकामासह इतर प्रमुख क्षेत्रांमध्येही लक्षणीय वाढ नोंदवली आहे. कंपनीच्या विविध उत्पादनांच्या पोर्टफोलिओमध्ये, सामान्य-उद्देशीय स्टील पाईप्सपासून ते विशेष सोल्यूशन्सपर्यंत, त्याला अनेक उद्योगांची पूर्तता करण्यास सक्षम केले आहे, ज्यामुळे बाजारपेठेची स्थिती आणखी मजबूत झाली आहे. ■

: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

## बागेश्वर धामच्या कथेत चेंगराचेंगरी

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ५ :
भिवंडी येथील बागेश्वर धामचे महाराज धीरेंद्र शास्त्री यांच्या सभेत चेंगराचेंगरी झाली. माणकोली ब्लॉकजवळील इंडियन ऑईल कंपनीच्या सत्संग कार्यक्रमासाठी धीरेंद्र शास्त्री आले होते.

आपण स्वतः सर्व लोकांना विभूतीचे वाटप करणार असल्याचे त्यांनी सांगितले. यानंतर जमाव नियंत्रणाबाहेर गेला. चेंगराचेंगरीत अडकलेल्या काही महिलांची प्रकृती खालावली. चेंगराचेंगरी होताच धीरेंद्र शास्त्री निघून गेले.

बागेश्वर धाम महाराज धीरेंद्र शास्त्री शनिवारी भिवंडीतील माणकोली ब्लॉकजवळील इंडियन ऑईल कंपनीत एका कार्यक्रमासाठी आले होते. या कार्यक्रमानंतर आपण विभूती देणार असल्याचे धीरेंद्र शास्त्री जनतेला सांगितले. आधी महिलांनी यावे, मग पुरुषांनी यावे, असे आवाहन त्यांनी केले होते. बाबांकडून विभूती घेण्यासाठी आधी सर्व महिलांनी रांग लावली. महिलांच्या रांगेमागे पुरुष रांगेत उभे होते. विभूतीचे वाटप होत असताना चेंगराचेंगरी झाली.

## गावकऱ्यांनी अनुभवला दोन वाघांच्या झुंजीचा थरार



■ महासागर प्रतिनिधी, नागभीड, दि. ५ :
वाघांची संख्या वाढत असल्याने जंगलक्षेत्र कमी पडत असून अधिवास आणि अस्तित्त्वाच्या लढाईसाठी वाघांमध्ये झुंज पाहायला मिळते. नागभिड वनपरिक्षेत्रालगतच्या ग्रामस्थांनी दोन वाघांमधील झुंजीचा थरार अनुभवला.

नागभिड वनपरिक्षेत्रातील वासाडा मक्ता परिसरात स्थानिक ग्रामस्थांनी दोन वाघांमधील झुंजीचा थरार अनेक गावकऱ्यांनी प्रत्यक्षात अनुभवला. दोन वाघांमध्ये जोरदार झुंज झाली. त्यात एक वाघ यात गंभीररित्या जखमी झाला. घटनास्थळावर रक्ताचा सडा पडलेला होता. ग्रामस्थांनी लागलीच या घटनेची माहिती वनविभागाच्या अधिकाऱ्यांना कळवली.

मात्र, वनविभागाची चमू पोहचेपर्यंत हे दोन्ही वाघ याठिकाणाहून बेपत्ता झाले. जखमी वाघाचा शोध घेण्यासाठी वनविभागाच्या चमुने या परिसरात शोध मोहीम सुरू केली. वाघ जखमी असल्याने परिसरातील लोकांच्या जिविताला देखील धोका निर्माण झाला आहे. कारण जखमी वाघ हल्ला करण्याची शक्यता अधिक असते.

त्यामुळेच वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी स्थानिक गावकऱ्यांना सतर्कतेचा इशारा दिला आहे. नागरिकांनी वाघाच्या मागे जाऊ नये किंवा जंगलात प्रवेश करू नये, असे आवाहन त्यांनी केले आहे.

मानवी जीवितास कोणताही धोका निर्माण होऊ नये आणि जखमी वाघाला लवकरात लवकर जेरबंद करुन त्याच्यावर उपचार करता यावे म्हणून वनविभागाने शोधमोहीम सुरू केली आहे. नागभीड वन परिक्षेत्रातील कक्ष क्रमांक ७५६ मध्ये ही घटना घडल्याचे गावकऱ्यांनी सांगितले.